## प्रकरण ३

# सिद्धरामेश्वर आणि त्यांचे कार्य

दान म्हणून मिळालेल्या जमिनीवर आपले समाजकल्याणाचे कार्य सुरु असताना सिद्धरामांना भूगर्भातून मोठे धन प्राप्त झाले होते असे म्हटले जाते. याचा उल्लेख वर केलेला आहे. एवढी संपत्ती हाती असून देखील सिद्धरामेश्वर जन आणि जनावरे यांवर अवलंबून न स्वत: कार्य करीत होते. त्यांनी स्वत:चे कार्य कधीच सोडले नाही [१] असे सांगितले जाते. तलाव बांधण्यापूर्वी सोन्नलगीमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय अशी काहीही नव्हती. एक विहीर खणावी म्हणजे आलेल्या लोकांच्या पाण्याचा प्रश्न सुटेल म्हणून रुद्रमुनी, बोम्मण्णा यांच्या समवेत सिद्धरामांनी विहीर खोदण्यास सुरुवात केली. प्रथम सिद्धराम कुदळ घेऊन जमीन खणू लागले. नंतर बोम्मय्याही जमीन खणू लागला. दरम्यान काही पोकळ असल्यासारखे वाटले. थोडेसे खोल खणल्यानंतर कुदळ कोणत्यातरी घट्ट वस्तूवर आदळली. तेव्हा तेथे एक भांडे दिसले. त्या भांड्याचे झाकण काढून पाहिले तर सोन्याची नाणी [२] त्यात दिसली. तेव्हा हे धन जमीन दान दिलेल्या चामलादेवीचे आहे असे मानून त्यांनी ते धन चामलादेवीला दिले. पण चामलादेवीने ते परत समाजकार्यासाठी दिले आणि काम पुन्हा जोमाने चालू झाले.

**तलाव :** सोन्नलगीला येणाऱ्या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढू लागली. आलेल्या लोकांसाठी एका विहिरीचे पाणी पुरेनासे झाले. पाण्याची सोय झाल्याशिवाय क्षेत्राची वाढ होणार नाही, या विचाराने मल्लिकार्जुन देवालयासमोरच एक तलाव बांधण्याचा विचार त्यांनी केला. तिन्ही बाजूला टेकडी असून मध्यभागी थोडी खोल जमीन असलेली पाहून या जागी तलाव बांधण्याचा निर्धार सिद्धरामांनी केला. तलावाचे काम प्रथम कुदळ घेऊन स्वत:च सुरू केले. जेव्हा आपल्या हातात कुदळ घेऊन सिद्धरामांनी तलावासाठी खणणे सुरू केले. तेव्हा तेव्हा चार हजार लोकांनी तलावाच्या कामाला सुरुवात केली. [३] समाज कार्याला आठ हजार हात लागले. तसेच राजे महाराजे, मोठे अधिकाऱ्यांनीही येऊन येथील माती उचलून टाकली, असा उल्लेख राघवांक करतात. [४] सिद्धरामांनी त्या वेळी केलेल्या समाजकार्यामध्ये एक विशेष आहे. [५] मोठ्या संख्येत शिष्यगण हाती पहार घेऊन सिद्धरामांचा आणि मल्लिनाथांचा जयजयकार करीत जमीन खणू लागले. तलावासाठी खोदकाम करीत असताना त्या कामगारांना सिद्धराम पैशाच्या पिशवीत हात घालून मजुरी देत असत, ते न मोजताच पैसे देत, पण सर्वांना जेवढे काम तेवढा दाम आपोआपच मिळत असे. हे पाहून सर्वांना आश्चर्य वाटे. त्यामुळे कामगारात मानसिक परिवर्तन घडून येऊ लागले. उत्साह वाढू लागला. सिद्धरामाच्या दृष्टीत उच्च-नीच असा भेद भाव नव्हता. सर्वांना ते

समान भावनेने वागवीत असत. ''आपल्या कर्मानेच माणूस उच्च अगर नीच होत असतो.'' सिद्धरामाचा आदर्श हा फक्त बोलण्यात नसून आचरणातही होता. तलाव खोदण्यामागचा उद्देश म्हणजे पाण्याचा प्रश्न दूर करणे तसेच 'त्रिवेणी संगम' असा हा 'सिद्धरामेश्वर तलाव' असावा. तसेच पशू-पक्षी, कृमी-कीटक यांनाही जीवदान देण्याचा सिद्धरामांचा उद्देश तलावामूळे पूर्ण झाला. अशा प्रकारे मोठ्या वेगाने तलावाचे काम सुरू झाले आणि मोठ्या उत्साहातच ते पूर्ण झाले. सिद्धरामांच्या सदाचाराने परंपरावादी लोकांची सहनशक्ती सीमापार झाली. ते सिद्धरामांची निंदा करीत तरी सिद्धरामांचे कार्य थांबले नाही.

अत्युच्च स्थितीतयोगावस्थेतील सिद्धदेव रोज श्रम करीत असलेले त्यांच्या भक्तांना पाहवत नव्हते. कल्लय्या म्हणाला, 'गुरुदेव, आपण विश्राम करावा, योगी सिद्धपुरुष असलेल्या आपण मठात राहून लोकांना आशिर्वाद देत राहिलात तरी पुरे.' तत्काळ सिद्धराम वदले, ''आपण खायचे अन्न, आपल्या श्रमापासूनच संपादित व्हावे, आपल्या हिश्श्याचे कर्तव्य आपणच पार पाडायला हवे. गुरू म्हणजे फक्त प्रसाद सेवन करणारा नव्हे तर देहातून घाम गाळायला हवा. मठात राहून केवळ जपतप करणे योग्य नव्हे, सर्वांच्या कल्याणाकरता कर्म करणे म्हणजे योग होय. हाच कर्मयोग. योगच कर्म। अहंकाररहित सत्य, शद्ध मनाने लोककल्याणासाठी श्रम करणेच कर्मयोग.[६]

कर्मयोगी म्हणून ख्यात असलेल्या परमयोगेन्द्र सिद्धरामांची 'सदाचारात निष्ठा, सर्वांभूती अनुकंपा ' या त्यांच्या उच्च आणि पवित्र भावनेला अनुसरून सोन्नलगीत आणि चारही बाजूला अडुसष्ठ लिंग स्थापना, आठही दिशेला विघ्नहर्ता गणपतीची स्थापना करून सर्व ठिकाणी रुद्राभिषेक, क्षीराभिषेक, घृताभिषेक, पूजा अर्चना वगैरे यथासांग पार पडत होते, मोठ्या विशाल असलेल्या श्रीगंगेचे म्हणजे तलावाचे (सिद्धदेवानी बांधलेल्या तलावाला आजही काही लोक 'श्रीगंगा' संबोधतात. सिद्धरामाच्या श्रमाने पाणी लागले आणि गुरुशिष्यांच्या दीर्घ श्रमामुळे गंगावतरण झाले. या तलावात गंगा, यमुना, सरस्वती, गोदावरी आदी सर्व अडुसष्ट नद्यांची श्रेष्ठता सामावलेली आहे, असे मानले जाते.)[७] गोड पाण्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटला होता. शिवाय पशुपक्ष्यांच्या सह संपूर्ण सोन्नलगी तृप्तीने भरुन वाहत होती. तरीही मत्सरी स्वभावाच्या, तसेच कर्मठ लोकांकडून अधून मधून कुरापत काढणे चालूच होते.

सिद्धरामदेव आपल्या योगसाधना आणि लोककल्याण-कार्यात, वचनरचना आणि चिंतनात काल घालवीत असत. त्यांची सत्कीर्ती फारच दूरवर पोहोचली. त्यामुळे सोन्नलगीला सदैव भाविक येत. क्षेत्रात सतत गजबज चाललेली असायची. लांब असलेल्या श्रीशैल क्षेत्रास जाण्याऐवजी अभिनव श्रीशैल झालेल्या सोन्नलगीस आणि मल्लिकार्जुनाचे साकार रूप असलेल्या सिद्धरामेश्वरांच्या दर्शनार्थ येणाऱ्या भाविकांची व भक्तांची संख्या वाढू लागली. योगींद्रांच्या अपूर्व प्रभावाने अनेक राजे, महाराजे, मंत्री,

सामंत इत्यादींनी त्यांच्या चरणी धन, संपत्ती, भूमी दान केली. असे अनेक शिलालेखांवरुन कळून येते. असे म्हटले जाते की, राजपुजित असलेल्या योगीनाथांना दूर दूरचे भक्त आपापल्या नगरात यावे म्हणून विनंती करीत. भक्तांच्या हाकेला होकार देऊन वेळोवेळी आपल्या काळ्या घोड्यावर बसून ते संचार करीत असत. कुणीही असो, कोणत्याही जातीचा असो, त्याचे दु:ख, कष्ट पाहताच सिद्धरामांना राहवत नसे. त्यांचे हृदय तळमळत असे. अशांच्या उद्धारासाठी त्यांचे औदार्यपूर्ण हस्त सदैव सिद्ध असत. त्यांच्या अमृत स्पर्शाने अगणित लोकांचा उद्धार झाला. [८]

आता सोन्नलगीच्या परिसरात सिद्धरामांनी अष्टविनायकांची आणि अडुसष्ठ लिंगांची स्थापना केली. १७ देवळे स्थापल्याचा उल्लेख मिळतो. पण त्यास आधार असा काही मिळत नाही. तर मल्लिकार्जुनदेवालय निर्माण झाल्यावर अडुसष्ट लिंग स्थापन करण्याचे कारण काय ? असे एका शिष्याने विचारले असता सिद्धराम उत्तरले, सामान्य लोकांची श्रद्धा, निष्ठा एकाच देवाच्या ठायी वाढावी हाच उद्देश. । म्हाळसा, बीर, मार, धूळकाळ इ. अनेक देवतांच्या तृप्तीस बकरा कोंबडा, बळी देण्याचे सोडून एकाच देवाकडे सर्वांचे चित्त लागावे. वेगवेगळ्या हीन दैवतांकडे लक्ष जाऊ नये जिकडे तिकडे महादेवाचे प्रतीक असलेले शिवलिंगच दृष्टीस पडावे आणि साकार सगुण रूपाने निष्ठा श्रद्धा वाढावी हाच उद्देश आहे. लोकात भक्तीभाव वाढावा. भक्ती केंद्रीभूत व्हावी हीच माझ्या कार्याची पहिली पायरी. सोन्नलगी शिवमय व्हावे अडुसष्ट लिंग हे योगशक्तीचे प्रतीक आहे. म्हणून [९] तसेच आठही बाजूने सोन्नलगीचे रक्षण व्हावे, कोणतीही विघ्ने सोन्नलगीवर येऊ नयेत म्हणून आठही दिशेस सिद्धरामानी अष्टविनायकांची स्थापना केली.

**अष्टविनायकांची नावे**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री विरेश गणपती | - | कुंभारी रोड टॉवरजवळ |
| २. | श्री बेनक गणपती | - | होटगीच्या बाजूला |
| ३. | श्री महांकाळेश्वर गणपती | - | रेवणसिद्धेश्वर मंदिर |
| ४. | श्री करी गणपती | - | देगांवतांडा |
| ५. | श्रीविरकर गणपती | - | देशमुख मळा, सम्राट चौक |
| ६. | श्री वीर कोलाहल गणपती | - | भोगाव मार्डी रोड |
| ७. | श्री मश्रूम गणपती | - | हिप्परगा |
| ८. | श्री शेळगी गणपती | - | शिवानुभव मंगल कार्यालय |

## अडुसष्ट लिंगाची नांवे

| | | |
|---|---|---|
| १. श्री अमृतलिंग | - | श्री सिद्धेश्वर देवालय तलावाच्या पश्चिम तटावर |
| २. श्री पापेश्वरलिंग | - | श्री सिद्धेश्वर देवालय तलावाच्या पश्चिम तटावर |
| ३. श्री पोपेश्वरलिंग | - | श्री सिद्धेश्वर देवालय तलावाच्या पश्चिम तटावर |
| ४. श्री संगमेश्वर लिंग | - | श्री सिद्धेश्वर देवालय तलावाच्या पश्चिम तटावर |
| ५. श्री परमेश्वर लिंग | - | श्री सिद्धेश्वर देवालय तलावाच्या पश्चिम तटावर |
| ६. श्री योगीनाथ लिंग | - | श्री सिद्धेश्वर देवालय तलावाच्या पश्चिम तटावर |
| ७. श्री वज्रेश्वर लिंग | - | श्री सिद्धेश्वर देवालय तलावाच्या पश्चिम तटावर |
| ८. श्री ओंकारेश्वर लिंग | - | श्री सिद्धेश्वर देवालय तलावाच्या पश्चिम तटावर |
| ९. श्री आहेरेश्वर लिंग | - | तलावाशेजारी पश्चिमेस |
| १०. श्री माहेश्वरलिंग | - | तलावशेजारी |
| ११. श्री अकलेश्वरलिंग | - | मंदिर प्रांगण पश्चिम |
| १२. श्री उमेश्वरलिंग | - | संमत्ती कट्टा |
| १३. श्री शिखरेश्वरलिंग | - | महाद्वार |
| १४. श्री आदिलिंगेश्वर लिंग | - | महाद्वार |
| १५. श्री नंदीकेश्वर लिंग | - | महाद्वार |
| १६. श्री आलेश्वर लिंग | - | महाद्वार |
| १७. श्री तेलेश्वरलिंग | - | नॉर्थकोट हायस्कूलनजीक |
| १८. श्री विरेश्वर लिंग | - | डफरीन हॉस्पीटल नजीक |
| १९. श्री ब्रह्मेश्वरलिंग | - | पार्शी बंगला, रेल्वेलाईन |
| २०. श्री कोपेश्वरलिंग | - | हेड पोस्ट ऑफिसजवळ |
| २१. श्री अडकेश्वर लिंग | - | रेल्वे स्टेशन नजीक |
| २२. श्री त्रिपुरेश्वर लिंग | - | रेल्वे स्टेशन नजीक |
| २३. श्री आनंदेश्वर लिंग | - | जुन्या गिरणी आवारात |
| २४. श्री हावगेश्वरलिंग | - | मुरारजी पेठ, माणिक मिल |
| २५. श्री रामेश्वरलिंग | - | मुरारजी पेठ, माणिक मिल |
| २६. श्री नागेश्वर लिंग | - | मुरारजी पेठ, माणिक मिल |
| २७. श्री रामभद्रेश्वर लिंग | - | मुरारजी पेठ, माणिक मिल |

| | | |
|---|---|---|
| २८.श्री होमेश्वर लिंग | - | जुनी गिरणी चाळ नजीक |
| २९.श्री जगेश्वरलिंग | - | चक्रदेव मळा |
| ३०.श्री अनंत नामेश्वरलिंग | - | भोगडे वस्ती, कॅनॉलजवळ (पुणे रोड) |
| ३१.श्री पाशुपतीय लिंग | - | देशमुख मळा, गणेशनगर |
| ३२.श्री शतकेश्वर लिंग | - | चंडक बगीचा, बाळीवेस |
| ३३.श्री यल्लेश्वर लिंग | - | तरटी नाक्याजवळ,बाळीवेस (बुधवार पेठ) |
| ३४.श्री जंबुकेश्वर लिंग | - | मारुती मंदिराच्या (तळघरात) बाळीवेस |
| ३५.श्री जबरेश्वरलिंग | - | मारुती मंदिर, बाळीवेस |
| ३६.श्री जगदेश्वरलिंग | - | मारुती मंदिर, बाळीवेस |
| ३७.श्री बंडेश्वर लिंग | - | सिद्धेश्वर कापड मार्केट, प.मंगळवार पेठ |
| ३८.श्री भद्रेश्वर लिंग | - | सिद्धेश्वर कापड मार्केट, प.मंगळवार पेठ |
| ३९.श्री शेळगी गणेश लिंग | - | साबळे मं. का. पूर्व मंगळवार पेठ |
| ४०.श्री कामेश्वर लिंग | - | साबळे मं. का. पूर्व मंगळवार पेठ |
| ४१.श्री शंकेश्वरलिंग | - | वारद मठासमोर, पूर्व मंगळवार पेठ, शिवानुभव मंगल कार्यालय |
| ४२.श्री पंचमुखी लिंग | - | वारद मठासमोर, शिवानुभव मंगल कार्यालयासमोर |
| ४३.श्री अमोघेश्वरलिंग | - | साखरे वाडा, पूर्व मंगळवार पेठ |
| ४४.श्री सोमेश्वरलिंग | - | मधला मारुती |
| ४५.श्री अहिमुखी ब्रह्मेश्वर लिंग | - | खारीबावडी |
| ४६.श्री ब्रह्मनादेश्वर लिंग | - | मारुती मंदिर |
| ४७.श्री आचलेश्वरलिंग | - | वैद्यवाडा, शुक्रवार पेठ |
| ४८.श्री चिन्हेश्वरलिंग | - | त्रिपुरांतकेश्वर, शुक्रवार पेठ |
| ४९.श्री त्रिपुरांतकेश्वरलिंग | - | त्रिपुरांतकेश्वर, शुक्रवार पेठ |
| ५०.श्री सर्वेश्वर लिंग | - | पंचकट्टा |
| ५१.श्री उमामहेश्वर लिंग | - | कलेक्टर बंगला |
| ५२.श्री नवणेश्वरलिंग | - | गुरुभेट |
| ५३.श्री सिद्धवंतीलिंग | - | होमकट्टा |
| ५४.श्री ज्योतीश्वरलिंग | - | होमकट्टा |

| | | |
|---|---|---|
| ५५.श्री अकलेश्वरलिंग | - | पार्क मैदान |
| ५६.श्री गोमुखीलिंग | - | पार्क मैदान |
| ५७.श्री बाल ब्रह्मेश्वर लिंग | - | शमीवृक्षाजवळ, पार्क |
| ५८.श्री वज्रेश्वर लिंग | - | शमीवृक्षाजवळ, पार्क |
| ५९.श्री उमामहेश्वरलिंग | - | शमीवृक्षाजवळ, पार्क |
| ६०.श्री बालयोगीश्वरलिंग | - | शमीवृक्षाजवळ, पार्क |
| ६१.श्री शमीश्वरलिंग | - | शमीवृक्षाजवळ, पार्क |
| ६२.श्री स्वयेश्वरलिंग (खयेश्वर) | - | बारा बलुती, मुरारजी पेठ |
| ६३.श्री मोळगेश्वरलिंग | - | श्री काळम्मामंदीर, उ.कसबा |
| ६४.श्री कुठारसोमेशलिंग | - | श्री रेवणसिद्धेश्वर मंदिरात |
| ६५.श्री मल्लिकार्जुन लिंग | - | श्री मल्लिकार्जुन मंदिरात, उ.कसबा |
| ६६.श्री आयलेश्वर लिंग | - | श्री मल्लिकार्जुन मंदिरात, उ.कसबा |
| ६७.श्री आनंदेश्वर लिंग | - | श्री मल्लिकार्जुन मंदिरात, उ.कसबा |
| ६८.श्री उमाक्षेत्रेश्वर लिंग | - | श्री मल्लिकार्जुन मंदिरात, उ.कसबा |

वरील ६५ ते ६८ एकूण ४ लिंग एकाच ठिकाणी कसे आले याला इतिहास आहे.[१०]

**अष्टविनायकांची स्थापना :** सोन्नलगीत ६८ लिंगे किंवा तीर्थे स्थापण्यामागे जसे कारण होते तसेच अष्टविनायकांची स्थापना आठी दिशांना करण्याची सिद्धरामांची इच्छा होती. त्यासही एक कथा सांगितली जाते. ती अशी

एकदा परमेश्वरांनी सिद्धरामांना बोलावणे पाठविले. सिद्धराम कैलासला पोहोचल्यावर बोलाविण्याचे कारण विचारले, तेव्हा पार्वतीने सांगितले की, ''ज्या प्रमाणे आम्ही रोज परमेश्वराची पूजा करतो, तसे तू रोजचे रोज मल्लिकार्जुनाची पूजा करीत जा, म्हणजे तुझ्या गावावर कोणतेही विघ्न येणार नाही.'' पार्वतीची ही आज्ञा ऐकताच सिद्धरामेश्वर म्हणाले, '' हे मातोश्री, पूजा कशी करावी ?'' तेव्हा दही, तूप, साखर, सुंठ, जिरे, शेंदीलोण, वेलदोडे आणि मिरे घेऊन त्यांचे दशामृत तयार करून चार कलशांत भरावे. एक कलश सुवर्णकमलांच्या पुष्पांनी भरावा व तेरा कलश स्वर्गातील मंदाकिनी जलाने भरून मल्लिकार्जुनाची षोडशोपचारे पूजा करावी.''

१) **श्री विरेश गणपती** – हा गणपती सिद्धरामेश्वरांनी स्थापन केलेल्या अष्टविनायकांपैकी पहिला गणपती म्हणून ओळखला जातो. त्यामुळे या गणपतीचा मान मोठा मानला जातो. हा गणपती कुंभारी रोड (टॉवरजवळ) (अक्कलकोट रोड)जवळ आहे. हा गणपती पहिला गणपती होय.



२) **श्री बेनक गणपती** – हा गणपती सिद्धरामेश्वरांनी स्थापन केलेल्या अष्टविनायकांपैकी एक होय. हा गणपती होटगीच्या बाजूला असलेला आढळतो. हा गणपती मानाचा व दुसरा गणपती आहे.

३) **श्री महांकळेश्वर गणपती** – शहराच्या बाहेर अतिशय दुर्लक्षित जागेवर वसलेला धुळीमहांकाळ गणपती. सध्या या गणपतीची प्रतिष्ठापना येथील रेवणसिद्धेश्वर मंदिरात कराण्यात आलेली आहे या शतकातच गणपतीची पूजा होऊ लागली. तत्पूर्वी हा गणपती अगदी उघड्यावर पडलेला होता. येथील शिंगारे कुटुंबीय रेवणसिद्धेश्वर मंदिरात पूजा करतात. तेच या गणपतीचीही पूजा करतात. हा गणपती ३ रा गणपती मानला जातो.



४) **श्री करी गणपती** – (देगांवतांडा) - देगाव गावात असलेला गणपती करीगण्ण गणपती. करी म्हणजे हत्ती व गण्ण म्हणजे चेहरा हत्तीचा असा याचा अर्थ सिद्धेश्वर महाराजांनी प्रतिष्ठापना केलल्या अष्टविनायकापैकी हा ४ थ्या क्रमांकांचा गणपती होय. करीम मुल्ला म्हणजेच या भागातले रुढ नाव. करीमबाबा यांच्या शेतात हा गणपती आहे. मंदिरही या करीमबाबांनीच बांधून दिले. सध्या या ठिकाणी आबा रामा साळुंके हे गृहस्थ गणपतीची पूजा करतात.



५) **श्री विरकर गणपती** – हा गणपती सिद्धरामेश्वरांनी स्थापन केलेल्या अष्टविनायकांपैकी पाचवा गणपती होय. हा गणपती देशमुख मळा, सम्राट चौक येथे आहे. हा गणपती पाचवा असल्याने त्यांचे अधिक महत्व आहे.



६) **श्री वीर कोलाहल गणपती** – (भोगाव मार्डी रोड) सोलापूरहून मार्डी - भोगावकडे जाणाऱ्या



रस्त्यावर भोगाव व बाणेगावच्या मध्ये बाणेगावच्या हद्दीत वीर कोलाहल गणपती आहे. सिद्धरामेश्वरांनी स्थापन केलेल्या अष्टविनायकांपैकी हा वीर कोलाहल हा सहावा गणपती आहे. अगदी शांत, मोकळ्या वातावरणात वीर कोलाहल गणपतीचे छोटेसेच मंदिर आहे. बाणेगांव येथील शिवा स्वामी हे रोज या गणपतीची पूजा करतात.

७) **श्री मश्रूम गणपती** – हा गणपती अष्टविनायकांपैकी सातवा गणपती आहे असा मानला जातो. हा गणपती तुळजापूर रोड (हिप्परगा) येथे आहे. आजही संकष्ट चतुर्थीस आणि दर मंगळवारी तेथे गर्दी होत असल्याचे आढळून येते. मंदिर व तेथील मुर्ती अतिशय शोभीवंत व आकर्षक अशी आहे. मंदिरापासून जवळच हिप्परगा तलाव असून परिसर अतिशय रमणीय आहे.



८) **शेळगी गणपती :** एके दिवशी नित्यनियमाप्रमाणे पूजा करीत असताना मेरुपर्वतासारखे रूप धारण करून श्री गणपती सिद्धरामेश्वरांपुढे येऊन उभे राहिले व म्हणू लागले की, 'हे सिद्धरामेश्वरा, मी शेळगीचा गणपती आहे' मला तुमच्या गावात राहण्यास जागा द्यावी.' पण अवाढव्य अशा प्रचंड पुरुषासाठी एवढी जागा नाही असे सिद्धरामांनी सांगितले. त्याच क्षणी त्यांनी लहान रूप घेतले. नंतर सिद्धरामेश्वरांनी गणपतीची स्थापना आपल्या गावी केली व त्यास म्हणाले, ''तुझी स्थापना तर आम्ही केली. परंतु तुझ्या गावचे लोक येऊन तंटा करून तुला घेऊन जातील. पण गणपतीने सोन्नलगी सोडून जाण्यास नकार दिला.



पुढे शेळगीचे लोक दोन - चार दिवसांनी सोन्नलगी येथे आले व सिद्धरामेश्वरांस म्हणाले, 'तुम्ही आमच्या गावाचा गणपती आणला आहे, तो आम्ही परत घेऊन जातो' सिद्धरामांच्या आज्ञेनुसार गणपतीला घेऊन जायला लोक तयार झाले. लोक गणपतीस दोर बांधून ओढू लागले. पण गणपती काही केल्या हलेना. सर्वांनी गणपतीला नंतर घेऊन जाण्याचा बेत केला आणि सिद्धरामांशी प्रसाद मागावा आणि तो न दिल्यास तंटा उपस्थित करावा असे त्यांनी ठरविले. प्रसाद दुसऱ्या दिवशी तयार करण्यासाठी सिद्धरामांनी अन्नामध्ये विष तयार करुन मल्लिकार्जुनास त्याचा नैवेद्य अर्पण केला आणि शेळगीच्या लोकांनाही प्रसाद देऊ लागले. पण त्यांनी तो घेण्यास नकार दिला.[११]

ही कथाही सांगितली जाते.

सोन्नलगी जवळच असलेल्या शेळगी (शेळ्ळीगे - पूर्वी या गावाला शिळ्ळीगे म्हणत) गावात गणपतीची रोज पूजा-अर्चा होत नव्हती. त्या गावात दोन गट पडले होते. त्यामुळे एका गटाच्या लोकांचा असा विचार होता की आपल्या गावातील गणपतीला सोन्नलगीच्या सिद्धरामांच्या क्षेत्रात नेऊन तिथे त्याची स्थापना केल्यास रोज न चुकता अनायासे पूजा अर्चा होईल. आपल्यावर या भरवश्यावर सोन्नलगीला गणपतीची मूर्ती नेण्यात आली. दुसऱ्या गटातील लोकांना राग आला पण नाईलाज झाला. कारण गणपतीची मूर्ती परत आपल्या गावात आणल्यास योगीराजांचा कोप होईल आणि आपल्या गावावर संकट उद्भवेल कोप होईल. या भीतीमुळे विरोधी गट गप्प राहिले. सिद्धरामांनी शेळगी गणपतीच्या समोर

'कामेश्वर' लिंग स्थापन केले (सोलापूरातील मंगळवार पेठेत असणाऱ्या शिवानुभव मंगल कार्यालयात शेळगी गणपतीची मूर्ती असून तेथे रोज पूजा अर्चा चालते.) सिद्धराज योगींनी सोन्नलगीच्या पंचक्रोशीत आठही दिशेला गणपतीची स्थापना केलेली आहे. सोन्नलगीवर विघ्न येऊ नये, गावाचे रक्षण व्हावे या उद्देशाने [12] सिद्धरामांनी स्थापन केलेल्या अष्टविनायकांपैकी शेळगी गणपती हा ८ वा गणपती होय.

वीरशैव धर्माचा पाया ६ षट्स्थल आणि अष्टावर्ण ह्या दोन सिद्धान्तावर आधारित आहे. बाराव्या शतकात सोन्नलगीचे महाशिवयोगी श्री सिद्धरामेश्वरांनी गावाभोवतालच्या वर्तुळाकार परिसरात ६८ शिवलिंगाची स्थापना करुन मुमूक्षूना जणू मुक्तीचा सोपा मार्गच दाखविला आहे. सहा व आठ या अंकात वीरशैव धर्माची अनेक आध्यात्मिक तत्वे व वैज्ञानिक रहस्ये दडली आहेत. अडुसष्ट लिंगाच्या मूळ नावातून जो अर्थ बोध होतो तो समजून घेणे महत्वाचे आहे.

वीरशैव धर्माचे मूळ संस्थापक व आद्य जगद्गुरु १००८ श्रीश्रीश्री रेणुक शिवाचार्य महास्वामीजी लिखित सिद्धान्त शिखामणी या धर्मग्रंथात १०१ लिंग स्थलांचा उल्लेख केला आहे. सिद्धरामांनी अडुसष्ट शिवलिंगाची स्थापना करून ''षडेश्वर्य व अष्ट सिद्धीची'' फले प्राप्त करून घ्यावीत, असे सूचित केले आहे. मकरसंक्रांतीला गड्डा (नव्हे गडाची) यात्रा सुरु होण्यापूर्वी सर्वप्रथम या सर्व ६८ शिवलिंगांना 'यण्णी मज्जन' म्हणजे तैळमर्दनचा लग्नापूर्वीचा एक धार्मिक विधी झाल्याशिवाय कार्यक्रमास आरंभ होत नाही.

६८ लिंगांची स्थापना १२ व्या शतकात झाली तेव्हा सोन्नलगीवर कर्नाटकाच्या कल्याण येथील कलचुरी राजवंशातील धर्मीय बिज्जल याची सत्ता होती. त्यावेळी राजाचा प्रतिनिधी म्हणून नन्नप्पा व त्याची पत्नी चामलादेवी यांच्याकडे सोन्नलगीच्या प्रशासनाची जबाबदारी होती. हे दाम्पत्य धर्माने जैनपंथीय असले तरी त्यांनी सिद्धरामाला गुरु करून घेतले. इतकेच नव्हे तर या गुरुनिष्टेपोटी त्यांनी बिज्जल राजाच्या दरबारी बरीच खटपट करुन सिद्धरामांना त्यांच्या सोन्नलिगीवाडी भोवतालची दहा कोसाएवढी जमीन गुरुदक्षिणा म्हणून अर्पण केली होती. अशाप्रकारे दान मिळालेल्या जमिनीची हद्ददर्शक खूण निश्चित करण्यासाठी उभयतानी सध्या ज्या ठिकाणी पंचकट्टा आहे, त्या मध्यवर्ती ठिकाणापासून सोन्नलगीवाडीच्या आठ दिशेला आठ सवत्स गाई पळवून - संध्याकाळपर्यंत गाई जेवढे अंतर पुढे जातात त्या ठिकाणापर्यंतची भूमी सिद्धरामांना अर्पण केल्याची एक कथा मूळ पुराणात आहे, दान मिळालेल्या जमिनीची हद्द दर्शविणारी खूण म्हणून सिद्धरामांनी सोन्नलगीच्या अष्ट दिशेला गोल वर्तुळाकार हद्द कल्पून थोड्या परंतु सारख्या अंतरावर एकूण ६८ शिवलिंगांची स्थापना केली.

सिद्धरामांनी इ.स. ११८० साली शिवयोग समाधीत प्रवेश केला. परकीय आक्रमणामुळे पुढे कालांतराने त्यांनी स्थापन केलेल्या ६८ लिंगांचे दैनंदिन विधी खंडित झाले. त्यात भर म्हणून परकीयांच्या येथे झालेल्या आक्रमणामुळे राजकय उलथापालथीत ६८ शिवलिंगाचे स्थानांतरही झाले.

यामुळे बहुतेक सर्व (काही अपवाद वगळता) ६८ लिंग सुरक्षिततेच्या दृष्टीने तत्कालीन सिद्धराम भक्तांनी सोन्नलगीत आणून सोईप्रमाणे त्यांचे पनर्वसन केले. यामुळे सध्या ही ६८ शिवलिंगे आपल्या मूळ स्थानांपासून अलग झालेली दिसतात. सिद्धरामांनी लिंग स्थापनेच्यावेळी प्रत्येक शिवलिंगांना, आपल्या शैलीत काही विशेष नावे दिली होती. परंतु त्यांच्या नंतरच्या घालमेलीच्या काळात या लिंगांची नेमकी नावे सुद्धा लोप पावली. तशात ही सर्व शिवलिंगे सारख्याच आकाराची असल्यामुळे कोणत्या लिंगाचे नेमके नाव कोणते? याचा नक्की अंदाज करणे कठीण झाले. यामुळे सिद्धरामांच्या काळातील या शिवलिंगाची जुनी नावे बदलून कोणी तरी त्यांना नवीन नावे दिली असावीत असे अनुमान निघते. काहीही असो, या लिंगांना कोणत्याही नावाने जरी ओळखण्यात आले तरी त्यांचे महत्व तीळमात्रही कमी झालेले नाही.[१३] ६५ ते ६८ ही शेवटची चार लिंगे एकाच ठिकाणी कशी आली याला इतिहास आहे असे म्हटले जाते.

जगद्गुरू रेवणसिद्धेश्वर व जगद्गुरू श्री कपिलसिद्ध पंडिताराध्य यांनी सिद्धरामास गुरू पट्टाभिषेक करण्याचे आयोजिले. त्यावेळेचे संस्थानिक (राजा) नन्नप्पाच्या मदतीने सिंहासन सजवून सोन्नलगी संस्थान बृहन्मठात सिद्धरामास यथाविधी गुरुपट्टाभिषेक केला. षट्स्थल ब्रह्मोपदेश करून 'सार्वभौम शिवयोगी म्हणून तुझी प्रसिद्धी होवो' असा आशीर्वाद त्या दोघांनी दिला. त्यावेळी या समारंभास अनेक राजे, महाराजे, शिष्यवृंद व भक्तवृंद उपस्थित होते. या महोत्सवानंतर सिद्धरामेश्वरांनी या उभय जगद्गुरुंच्या आशीर्वादाने एकाच मुहूर्तावर इतर लिंगाची स्थापना केली असे म्हटले जाते. मूळ पंचाचार्य ज्या लिंगातून उद्‌भवले त्या लिंगाची प्रतिके म्हणून ५, उपसूत्राचार्यांच्या नावाने ६० व मातापित्याच्या नावाने २, आणि आपल्या स्वत:च्या नावाने १ अशी एकूण अडुसष्ठ लिंगाची (तीर्थाची) स्थापना केली गेली.

सिद्धरामांनी सोन्नलगीत १७ देवळे निर्माण केली असा उल्लेख अनेक ठिकाणी आल्याचे दिसते. पण त्या १७ देवळाची नावे काय होती? त्यांच्या चरित्रावरून त्यांनी कपिलसिद्ध मल्लिकार्जुन (श्रीशैल नव्हे) मंदिर निर्माण केल्याचे आणि तलाव निर्माण केल्याचे समजते. भाविकांसाठी या १७ देवळांची नावे व स्थाने मात्र अजूनही समजत नाही.

अडुसष्ट लिंग सिद्धरामांनी स्थापन केली. काही लिंगे स्थापन करण्यामागचे उद्देश आणि कथा[१४] राघवांक रचित 'श्री सिद्धराम चरित्रे' - मराठी अनुवाद या पुस्तकात आढळतात. अशा प्रकारे सिद्धरामाची कीर्ती सर्वत पसरू लागली. सिद्धराम नुसते ब्रह्मचारी नसून ते मोठे योगी होते. असे आत्मविश्वासाचे उद्‌गार सिद्धराम स्वत:च एका वचनात काढतात.

'भक्त झाल्यावर व्हावे बसवण्णासारखा भक्त
जंगम व्हावयाचे झाल्यावर, व्हावे प्रभुदेवासारखा जंगम

भोगी झाल्यास व्हावे ममगुरु चनबसवण्णा सारखा आणि

योगी झाल्यास व्हावे माझ्यासारखा योगी

कपिलसिद्ध मल्लिनाथा'[१५]

त्यांच्या या वचनाची साक्ष म्हणून की काय अनेक कवींनी त्यांना 'योगीकुल चक्रवर्ती' असे म्हटले आहे. पातंजल योगाचा अभ्यास श्री सिद्धरामांनी केला होता असे दिसते. त्यांच्या योगसाधनेची आणि सिद्धीची ख्याती सर्वत्र पसरली आणि देशाच्या विविध भागांतून लोक, त्यांचे भक्तगण अथवा शिष्य म्हणून सोलापूरास येऊ लागले. त्यांच्या सामर्थ्याचा महिमा सर्वत्र सारखा वाढतच राहिला. आपल्या योगसामर्थ्यावर आधारलेले अनेक दैवी चमत्कार त्यांनी केले. आजच्या वैज्ञानिक युगात हे सत्य वाटत नसले तरी काही पुरावे किंवा साधने आजही उपलब्ध दिसतात. अनेक चमत्कारिक कथा, हरिहर व राघवांक यांनीही आपल्या कविता आणि ग्रंथांमध्ये सांगितलेल्या आहेत. हे सत्य धरून चालावे लागेल. काही लिंग स्थापन करण्यावेळची परिस्थिती, चमत्कार, परमेश्वर किंवा स्वर्ग, पाताळ अशा गोष्टी ज्या आपल्याला सत्य वाटत नाहीत पण अशा गोष्टीचा उल्लेख हरिहर आणि राघवांकांनी केलेला आहे व स्थापन झालेल्या लिंगांची नावेही त्यांनी सांगितली आहेत. सर्व जरी सत्य वाटत नसले तरी अनेक लिंगे आजही अस्तित्वात आहेत. यांची साक्ष खाली दिलेल्या अडुसष्ठ लिंगाच्या नावामध्ये दडलेले आढळते.

## अडुसष्ट लिंग

**सिद्धरामांनी स्थापन केलेल्या अडुसष्ट लिंगांची माहिती थोडक्यात खालील प्रमाणे –**



१) **श्री अमृतलिंग (तलावाच्या पश्चिम तटावर):** या लिंगा विषयीची कथा आपण खाली पाहणार आहे. या लिंगांचे पुराणांतर्गत मूळ नाव – अमृतलिंग, सिद्धरामांच्या हस्ते स्थापन करण्यात आलेल्या शिवलिंगापैकी हे पहिले शिवलिंग. त्यांचे फलमाहात्म्य असे - समस्त वीरशैव धर्मीयांनी शिवयोग संजीवनी मोक्षपद प्राप्त करून घेण्यासाठी या अमृत लिंगास श्री गजानन मूर्तीसह अभिषेक व पूजा करावी. या योगे निश्चित कार्यसिद्धी प्राप्त होते.

**अमृतलिंगाची स्थापना –** सिद्धरामांच्या आचरणाने परंपरावादी लोकांची सहनशक्ती सीमापार झाली. ते लोक सिद्धरामांची निंदा करू लागले. 'गुरुमध्ये भेदभाव आहे' असे मुद्दाम म्हणू लागले. सिद्धरामांच्या विरोधात कांही कामगारांची मने कलुषित करू लागले. एक कामगार

मुद्दामच सिद्धेशांना ऐकू जाईल असे मोठ्याने ''गुरुंच्या मनात भेदभाव आहे. आपल्याला हवे असणाऱ्यांनाच प्रसाद देतात बाकीच्यांना नाही'' हे बोलणे एकल्यानंतर योगीराजांनी दुसऱ्याच दिवशी सर्वांसाठी प्रसाद तयार करविला. मल्लिनाथांचा प्रसाद घेण्यास सर्वांना बोलविले. निंदक, दुष्ट, मत्सरी लोक मुद्दाम पाहण्यास आले होते. विशेष प्रसादाचे भांडे चुलीवर शिजत होते. मल्लिकार्जुनाची पूजा आणि ध्यान करून सिद्धराम शिवयोगी त्या ठिकाणी आले. प्रसादाच्या भांड्यावरील झाकण काढताच आतून विषारी वाफ आल्याने जवळ उभे असलेल्यांच्या डोळ्यातून पाणी येऊ लागले, ''हे काय प्रसाद की विष ?'' असे जमलेले लोक आपसात बोलू लागले. तरीही ''लोक हो, मल्लिकार्जूनाचा प्रसाद स्वीकारण्यास पुढे यावे'' असे योगीराज बोलावू लागले. गुरुदेवाठायी अचल श्रद्धा असलेले शिष्यगण पुढे आले. काही दुष्ट मागच्या मागे पळून गेले. कारण प्रसादात त्यांनीच विष घातले हाते.गुरुदेवाच्या श्रद्धा अमृतहस्ताने, त्यांच्या स्पर्शाने विषही अमृत बनते. अशी दृढ श्रद्धा शिष्य समुदायात होती. स्त्री पुरुष, बालवृद्ध प्रसादाचा स्वीकार करुन तृप्त झाले. सर्वांना वाटून झाल्यावर उरलेला प्रसाद भूगर्भात ठेवून त्यावर शिवलिंग स्थापन केले. (आजही तलावाच्या काठावर अमृत लिंगाचे देऊळ आहे. आजही उन्हाळ्यात भक्त भाविक शिवलिंगावर दहीभात चढवितात.) अनेक वेळा विरोधक गुरू सिद्धरामांच्या विरोधात काही ना काही बातमी पसरवीतच होते. तलाव बांधण्याचे काम चालूच होते.[१६] हेच लिंग सिद्धरामेश्वरांनी स्थापलेल्या ६८ लिंगांपैकी पहिले लिंग होय.

२) **श्री पापेश्वर लिंग :** (तलावाच्या पश्चिमेस) पुराणांतर्गत मूळ नाव – श्री सोमशेश्वर लिंग. पाप पुण्याचा प्रेरयिता परमेश्वरच आहे. खरा ज्ञानी या दोहोपासून अलिप्त राहून आत्मोद्धार साधतो व बहुजनाकृत कर्माचे बीज भाजून जन्ममरणाचा फेरा चुकवितो. हे या लिंगाचे पूजनाचे सार आहे.



३) **पोपेश्वर लिंग –** (तलावाशेजारी पश्चिमेस) पुराणातंर्गत मूळ नाव – श्री सिद्धेश लिंग सर्वाच्या अंतर्यामी बसून बोलावयास लावणाऱ्या कूटस्थ प्रभूला पीपेश्वर म्हटले आहे. तो दिसत नाही. मात्र शब्दांतून प्रगट होतो. शेवटी शब्दही त्याच्याच ठायी मौन पावतात. याासठी मौनाचे जीवनात फार मोठे महत्व आहे.



४) **श्री संगमेश्वर लिंग** – (तलावाच्या पश्चिमेस) पुरांणातर्गत मूळ नाव – श्री भीमेश लिंग चैतन्य देणाऱ्या शक्तीला आत्मा म्हणतात. आत्म्याची ओळख प्रत्येक साधकाला आपल्या सद्गुरुकडून होते. परमात्म्याची अनुभूती योगाद्वारे होते. यास्तव योग म्हणजेच जीवा-शिवाचा संगम होय, हा या लिंगाचा संदेश आहे.[१७]



५) **श्री परमेश्वर लिंग** – (तलावा शेजारी पश्चिम तटावर श्री सिद्धेश्वर देवालय आवारात) पुराणांतर्गत मुळ नाव – श्री विश्वेश लिंग. विवेचन – सर्वाभूती विश्व आहेच. ईश्वर माझा व मी ईश्वराचा असा भाव देहात भिनला तर दोघातील अंतर दूर होऊन एकात्म भाव वाढतो. निराकार जीव साकार होऊन भक्त व भगवान एकरूप पावतात. यालाच ऐक्यस्थल म्हणतात. सर्वात्मता हेच परमेश्वर लिंगाचे सार आहे.



६) **श्री योगीनाथ लिंग** – (तलावा शेजारी पश्चिम तटावर श्री सिद्धेश्वर देवालय आवारात) मूळ नाव– श्री पुराणेश लिंग. योग म्हणजे जिवात्मा व परमात्मा यांची भेट. यासाठी सद्गुरुंची कृपा फार महत्वाची असते. साधकाला गुरुकडून स्वरूपाची ओळख झाल्यानंतर खऱ्या साधनेला सुरुवात होते. मगच जीव योग्याचा योगीनाथ बनतो. हाच योगीनाथ लिंगाचा आदर्श आहे.



७) **श्री वज्रेश्वर लिंग** – (तलावा शेजारी पश्चिम तटावर श्री सिद्धेश्वर देवालय आवारात) पुराणांतर्गत मूळ नांव - श्री पचछ कथालेश लिंग. विवेचन - परमेश्वर वज्रासारखा कठोर असला तरी त्याचे हृदय मात्र कोमल व करुणामयी असते. एखादेवेळी ईश्वर जरी भक्तावर रागावला तरी सद्गुरु मात्र आपल्या शिष्यांना सांभाळून घेतात. म्हणून सद्गुरु शिवापेक्षा श्रेष्ठ आहे. प्रसंगी भक्ताचे प्रारब्ध देखील बदलण्याची ताकद त्यांच्याजवळ आहे. यास्तव शिव आणि सद्गुरु ही एकाच नाण्याचे दोन बाजू आहे. वज्रेश्वर लिंग हे त्याचे प्रतीक आहे.



८) **श्री ओंकारेश्वर लिंग** –(तलावा शेजारी पश्चिम तटावर श्री सिद्धेश्वर देवालय आवारात) पुराणांतर्गत मूळ नांव - श्री काष्टकेश लिंग. ॐ (ओम) हा परमात्म्याचा प्रथम विस्तार असून ते परब्रह्ममय नाद स्वरुपी अक्षर आहे. साधक जेव्हा समाधीत स्वरूप अशी एकरूप होतो. तेव्हा हा ओंकारध्वनी त्याला ऐकू येतो. मगच मायारूपी कोलाहालातून त्याची सूटका होते. शेवटी तो अनंत अशा अथांग स्वरूपी आनंद सागरात बुडून विलय पावतो. व ओंकाराशी एकरुप होतो. हीच ओंकारेश्वराची प्रेरणा आहे. [१८]



९) **श्री आहेश्वर लिंग** – (तलावा शेजारी पश्चिम तटावर श्री सिद्धेश्वर देवालय आवारात) पुराणांतर्गत मुळ नांव - श्री षंडगेशलिंग. विवेचन - आपण झोपेत असलो व आपल्याला उठविण्यासाठी कोणीतरी हाक मारली तर आपण त्याला उत्तरादाखल 'ओ' म्हणतो अर्थात तो 'ओ' म्हणणारा म्हणजेच (आत्मा) आहेश्वर. तोच आपल्याला जागवतो. आहेश्वर लिंगाच्या नामोच्चारातून अ+आ ही मूळ बीज मंत्ररूपी अक्षरे नादरूपाने प्रकटतात व जागे करतात. हेच या लिंगाचे वैशिष्ट्य आहे.



१०) **श्री माहेश्वरलिंग** – (तलावाशेजारी) पुराणांतर्गत मुळ नाव-षदडिष लिंग. विवेचन - वीरशैवांना माहेश्वर (जंगम) गुरू लिंगदीक्षा देतात. दीक्षार्थी प्रथम सद्गुरूला शरण जातो. व त्यांच्या शिकवणुकीप्रमाणे वागण्याची (आचरणाची) शपथ घेतो. दीक्षार्थीच्या अंगाला भस्म लावून कानात सद्गुरू षडाक्षरी मंत्र फुकतात व लिंग पूजा कशी करावी याचे प्रात्यक्षिक दाखवितात. त्यांच्याबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी वरील लिंगाच्या माध्यमाने पूजन केले जाते.



११) **श्री आकलेश्वरलिंग** – (तलावाशेजारी मंदिर प्रांगण) विवेचन - योगाद्वारे प्रकट होणारी शक्ती. ही एक कलाच आहे. जप - तप अनुष्ठान इ. क्रियेद्वारे जो साक्षात्कार साधकाला प्राप्त होतो त्याचे समर्थपणे आकलन करून घेण्याच्या शक्तीसुध्दा एक विशिष्ट प्रकारची कलाच आहे. कलेचा हा प्रकार म्हणजे शिवाचीच एक लिला आहे. अशा कलेच्या



माध्यमातून धर्मतत्वाचे आकलन करून घेतल्याशिवाय खरा साक्षात्कार होत नाही. आकलेश्वर लिंग हे शिवकलेचेच एक प्रतीक आहे.

१२) **श्री उमेश्वरलिंग** - (संमत्ती कट्टा) श्रीच्या अक्षतेची जागा. विवेचन - 'उमा आणि माहेश्वर' ही अनुक्रमे 'पार्वती व शिव' यांचेही निगडित आहे. 'जेथे शिव शक्ती, जेथे शक्ती तेथे शिव' असे समीकरण पुरातन काळापासून प्रचलित आहे. आपल्या डोळ्याला हे विश्व दिसण्यापाठीमागे शिव व शक्ती यांचीच प्रेरणा कारणीभूत आहे. उमेश्वर म्हणजे उमापती. हा या सर्व विश्वाला व्यापून राहिलेला स्वामी आहे. त्याची जाणीव लिंग रुपाने पूजा केल्यामुळे स्मरणात राहते.



१३) **श्री शिखरेश्वरलिंग** – (श्री सिद्धेश्वर मंदिराच्या महाद्वार) विवेचन - शिखर म्हणजे पूर्चत्वाचे प्रतीक. त्याशिवाय मंदिराला शोभा नाही. तद्वत आत्म स्वरूपावर आरुढ झालेले श्रेष्ठ महात्मे शिवज्ञानाशिवाय शोभून दिसत नाहीत. ज्ञान म्हणजे खरी मुक्ती. ज्ञान सद्गुरू कडून प्राप्त करुन घ्यावे लागते. सद्गुरु हे मंदिराच्या शिखराप्रमाणे उंच आहेत. शिखरेश्वर लिंग हे ज्ञानी गुरुचे प्रतीक आहे.[१९]



१४) **श्री आदिलिंगेश्वर लिंग** –(श्री सिद्धेश्वर मंदिराच्या महाद्वाराजवळ) मूळ नाव - हिरक दिगंबरेश लिंग. विवेचन - प्रत्येक वस्तूंचे मूळ शोधीत निघालो तर शेवटी आपल्याला कोठे ना कोठे तरी थांबावेच लागणार. या विश्वाच्या उत्पत्ती मागे कोणीतरी एक प्रथम महापुरुष आहे हे निश्चित. 'जेव्हा नव्हते चराचर, तेव्हा होता परमेश्वर।' हिमालयातील कैलास पर्वताच्या दुर्गम शिखरावर आदिलिंगाचे मूळ स्थान आहे. तेथे सामान्य माणूस पोहोचणे शक्य नसल्यामुळे त्याचे प्रतीक म्हणून सिद्धरामांनी हे लिंग स्थापले.



**आदिलिंगेश्वर लिंगाची स्थापना** – सिद्धरामेश्वर कोणालाही घाबरत नव्हते. चमत्कार बघून डगमगत नव्हते. अशा प्रकारे दिवस चालले होते आदिलिंगेश्वर लिंगाची स्थापना करण्या मागची एक कथा सांगितली जाते ती अशी,

सिद्धरामेश्वरांची एकदा प्रदक्षिणा चालली होती. त्यावेळेस, परमेश्वरांनी हा कोणासच भीत नाही म्हणून त्यांच्या पुढे येऊन त्यांना अलिंगन दिले आणि माझ्याबरोबर चालावे असे

सांगून त्यांना ब्रह्मलोक, विष्णुलोक, यमलोक अनेक ब्रह्मांडे दाखविली तसे शिवलोकात नेऊन गयापुरीत नेले व तेथे परमेश्वरांना पाच मुखांपासून ते कोट्यावधी मुखे आहेत असा चमत्कार दाखविला. तरी ते घाबरले नाहीत. उलट हे असेच चालू दे असे सांगितले. तेव्हा परमेश्वरांनी एकदम चोहोकडे गाढ अंधकार पाडला आणि आपण लिंगरूप घेऊन बसले. हा चमत्कार सिद्धरामेश्वरांनी पाहताच त्यांनीही बेत केला की आपणही लिंगरूप घ्यावे. त्यांच्या मनातील बेत परमेश्वरांनी ओळखला. आणि जर याने लिंगरूप धारण केले तर ज्या कार्यासाठी याला आपण निर्माण केले ते कार्य बंद पडेल असे समजून त्यांना आपले खरे रूप तेथेच दाखविले. आणि सोन्नलगीपासून वायव्य दिशेस चार कोसावर आदिलिंग भेटेल असे सांगितले. आणि ते स्थापण्यास सांगितले. सिद्धरामेश्वर सोन्नलगीत परत आले आणि मल्लिकार्जुनाचे दर्शन घेतले. आपल्या शिष्यांना, शिवाय अनेक स्त्रियांच्या हातात पंचारती देऊन आदिलिंग आणण्यास तयार झाले. गावापासून सुमारे चार कोस गेल्यावर त्याच ठिकाणी आदिलिंग आहे हे आपल्या तपाच्या सामर्थ्याने जाणून स्त्रियांकडून पंचारती ओवाळली आणि पृथ्वीची प्रार्थना करून आडपडदा धरला. तोच पृथ्वी दुभंगून आदिलिंग वर आले. सिद्धरामेश्वर ते लिंग पाहू लागले आणि त्यांना गयापुरीच्या लिंगात जशी अनंत मुखे दिसली होती त्याचप्रमाणे यातही दिसू लागली. मग भक्तिभावाने ते पूजून रथात, ठेवून विघ्न येऊ नये म्हणून अर्ध्या वाटेतच रथ सोडून सर्व शिष्यांना मी येईपर्यंत पुन: रथ जुंपू नये असे सांगून सिद्धरामेश्वर गावाकडे आले. तिकडे शिष्यांनी सिद्धरामेश्वर येण्यापूर्वीच आदिलिंग घेऊन जावे असा विचार करून रथास बैल जुंपून रथ चालवण्यास आरंभ केला. परंतु रथ काही केल्या हालेना. बैलांना मारून मारून सर्व बैल मरून गेले व त्यांचे प्राण मल्लिकार्जुनाचे देवळात जेथे सिद्धेश्वर पूजा करण्यस बसले होते तेथे येऊन मल्लिकार्जुनाकडून मुक्ती मिळविण्यासाठी प्रयत्न करू लागले. सिद्धरामेश्वरांची पूजा झाल्यावर ते सर्व प्राण धरून रथाकडे आले. तेथे आल्यावर त्यांनी ज्याचे त्याचे प्राण प्रत्येक बैलाच्या शरीरात घालून त्यांना जिवंत केले आणि त्यांना रथास पुन: मोठ्या थाटाने गावाकडे घेऊन आले. आदिलिंग घेऊन आल्यावर त्याची स्थापना जेष्ठ शुद्ध १४ स करण्याचा बेत केला. परंतु स्थापना करतेवेळेस दूध, दही वगैरे मिसळून अभिषेकासाठी पंचामृत तयार करतात तसे न करता कैलासहून खास अमृत आणण्याचा बेत सिद्धरामेश्वरांनी केला नंतर बारा वाजण्याच्या आत अमृत घेऊन येतो असे सांगून ते कैलासला निघाले.[२०] कैलासला गेल्यानंतर परमेश्वरांनी त्यांना अमृत पाताळ लोकात आहे असे सांगून पाठवून देऊन त्यांची परीक्षा घेतली. या परीक्षेत सिद्धरामेश्वर पूर्ण उतरले आणि परमेश्वरांचा आशीर्वाद घेऊन अमृत घेऊन ते मृत्यूलोकात

दिलेल्या वचनानुसार परत आले. सिद्धरामेश्वरांच्या आगमनाने वाजंत्री वाजली, वाद्ये वाजली. अभिषेकाची सर्व तयारी तर आगोदरच झालेली होती. अशा प्रकारे सिद्धरामांनी आदिलिंगावर अमृताचा अभिषेक सुरू केला. त्याची शास्त्रोक्त स्थापना झाली. या अभिषेकमुळे आदिलिंग तृप्तावले.

आदिलिंग म्हणजे पृथ्वी, आप, तेज, वायू, गगन, चंद्र, सूर्य, अहंकार याहून जे अतीत ते [२१] आदिलिंग, वेदवादातीत आहे.

१५) **श्री नंदीकेश्वर लिंग** – (श्री सिद्धेश्वर मंदिराच्या महाद्वारात) मूळ नांव - श्री मुसंडी ब्रम्हेश लिंग.



विवेचन - प्रत्येक शिवमंदिरात नंदी हा शिवासमोर असतोच. नंदी शिवाचे वाहन. शिवाचे दर्शन घेण्याआधी प्रथम नंदीचे दर्शन घ्यावे लागते. यासाठी त्याला प्रतिपरमेश्वर असे म्हणतात. जीवात्मा व शिवात्मा यांच्यातील तो सांधा आहे. शिव व पार्वती यांच्या विवाहप्रसंगी दक्ष प्रजापतीने या दोघांची कैलास पर्वतावर नंदी वाहनावरून मिरवणूक काढली होती. मकरसंक्रांतीच्या यात्रेत देवाच्या काठ्यांना नंदीध्वज (नंदीकोल) म्हणून संबोधतात.

१६) **आलेश्वर लिंग** – (श्री सिद्धेश्वर मंदिराच्या महाद्वार) मूळ नांव-श्री शैरिष लिंग. विवेचन - 



'आलय' म्हणजे मंदिर, आलेश्वर तथा आलयेश्वर लिंग म्हणजे देहरूपी देवालयात दडून बसलेला अंतरात्मा होय. त्याचे प्रतीक म्हणजेच आलेश्वर. परिपूर्ण परमात्म्याचा परमअंश देहातच आहे. 'देह व देवालय' हे श्रुती वचन कन्नड शिवशरणांनी आपल्या वचनांतून सांगितले आहे. आलेश्वर लिंग हे त्याचे प्रतीक आहे.

१७) **श्री तेलेश्वरलिंग** – (नॉर्थकोट हायस्कूलनजीक) पुराणांतर्गत मूळ नाव- श्री जरत्कंथेश लिंग. विवेचन - 



संस्कृत भाषेत स्नेह म्हणजे 'तेल' असे म्हटले आहे. तेलेश्वर लिंग हे स्नेहाचे प्रतीक आहे. देहातील मीपणा गेला म्हणजे मनुष्य परमेश्वराच्या अगदी जवळ जातो. परमेश्वराच्या प्रेमाला पान्हा फुटतो मगच परात्पर वस्तुंची ओढ लागते. देह ही नुसती आत्मस्वरूपावर पांघरलेली शाल आहे. 'आत्म्यास ओळखा व त्याच्याशी स्नेह करा' हाच या लिंगाचा संदेश.

१८) **श्री विश्वेश्वर लिंग**–(डफरीन हॉस्पीटल नजीक) मूळ नांव- श्री पंचवर्णेश लिंग. विवेचन –आकाशातील ग्रह व तारे आपआपल्या ठिकाणी कार्यरत असतात. त्याचे मुख्य वैश्विक कारण म्हणजे त्यांच्यात असलेली ''प्राणाकर्षण'' शक्ती होय. तीच शक्ती विश्वाला तारुन नेते. विश्वेश्वर लिंग हे विशालतेचे. प्रतीक आहे.[२२]



१९) **श्री ब्रह्मेश्वरलिंग** – (पार्शी बंगला, रेल्वेलाईन, सोलापूर) पुराणांतर्गत मूळ नांव - श्री कुठार सौम्येश लिंग. विवेचन - सृष्टीच्या रचनेसाठी परमेश्वरालाप्रथम ब्रह्माची उत्पत्ती करावी लागली. सृष्टीच्या आरंभी सर्वत्र पाणी होते त्याला वेदात 'हिरण्यगर्भ' असे म्हटले आहे. हा हिरण्यगर्भ म्हणजे बह्मतत्व. हे लिंगजल तत्वप्रधान असल्यामुळे सिद्धरामांनी पाण्याच्या सान्निध्यात त्याची स्थापना केली होती. परंतु पुढे याचे स्थानांतरण झाले आहे....



२०) **श्री कोपेश्वरलिंग**– (स्टेशन जवळ, जुन्या हेड पोस्ट ऑफिसशेजारी)मूळ नांव - श्री शृगींशलिंग. विवेचन - शिवाला त्रिनेत्रधारी असे एक नाव आहे. शिवाने क्रोधाने आपला तिसरा डोळा उघडला तर पृथ्वीवर महाप्रलयास प्रारंभ होतो. त्यासाठी त्याला कोपेश्वर असेही एक विशेष नाव दिले असावे. शिवाशी जवळीक साधून त्याचे प्रेम संपादन करावयाचे झाल्यास साधकाने प्रथम आपले आचार विचार शुद्ध ठेवण्याची गरज आहे. शिवप्रकोप घालविण्याचा हा एक उपाय आहे. ''सदाचारवे स्वर्ग, अनाचारवे नरक'' असे शरण (संत) वचन प्रसिद्ध आहे.



२१) **श्री अडकेश्वर लिंग** – (रेल्वे स्टेशन नजीक) स्टेशनजवळील धर्मशाळेपाशी जे आडकेश्वराचे देऊळ आहे त्यातील लिंगास हाटकेश्वर असे म्हणतात. व पुराणात त्याचे नाव श्री मसणीश लिंग असे आहे. विवेचन - आदि - मध्य - अंत या वैश्विक स्थितीशी निगडीत असलेला परमात्मा प्रलयानंतर शांत होऊन ब्रह्मांडाचा नकाशा गुंडाळून घेतो व पुन्हा उत्पत्तीच्या वेळी तो उघडतो. अनंत कोटी ब्रह्मांडाचा नायक हाच एक शक्तीशाली महालिंग आहे. तो सर्वात असूनही नसल्यासारखे अदृश्यावस्थेत स्थित असतो. अडकेश्वरल लिंगाद्वारे हाच प्रत्यय येतो.



२२) **श्री त्रिपुरेश्वर लिंग** – (रेल्वे स्टेशन नजीक, सोलापूर) मूळ नांव - श्री लोहेश लिंग. त्रिपुर म्हणजे शब्दार्थाप्रमाणे तीन लोक. स्वर्ग - मृत्यू - पाताळ लोक अशी त्यांची नावे आहेत. या तिन्ही लोकांना भेदून परमेश्वराच्या निकट जाण्यासाठी साधकाला अर्चना, प्रार्थना, ध्यानधारणा या तीन गोष्टींची फार गरज आहे. या तिन्ही क्रियेच्या माध्यमातून सद्गुरुच्या मार्गदर्शनाखाली निश्चितच देवाच्या समीप जाता येते. या अवस्थेत साधक स्वत:च लिंगस्वरूप होतो. [२३]



२३) **श्री आनंदेश्वर लिंग** – (जुन्या गिरणी आवारात) मूळ नाव - श्री गोणी कंथेशलिंग. विवेचन - या जगात आनंद मिळविण्यासाठी सर्व जीव अहोरात्र धडपडत असतात. आनंद प्रपंचातही मिळतो व परमार्थातही मिळतो. परंतु प्रपंचात मिळणारा आनंद व समाधान क्षणिक असतो. पण या उलट परमार्थातून मिळणारा आनंद कायम स्वरूपाचा मोक्षदायी असतो. वरील लिंगाच्या नावातून हाच अर्थ ध्वनित होतो.



२४) **श्री हावगेश्वरलिंग** – (मुरारजी पेठ, कल्पना टॉकीज शेजारी) मूळनांव - श्री चामरिश लिंग. विवेचन - कन्नड भाषेत 'हावग' म्हणजे पादुका असा होतो. सद्गुरुचे पाद प्रक्षाळण करून राहिलेल्या पाण्याचे प्राशन वीरशैवांना अतिशय महत्वाचे मानले आहे. सोन्नलगीत सिद्धरामांनी आपल्या शिष्यासह श्रमदान करून खोदलेला तलाव व त्यातील पवित्र पाणी म्हणजे एक प्रकारे 'श्री' चे पवित्र पादोदकच आहे. यासाठी भाविक लोक सिद्धेश्वर तलावाला 'तीर्थ' म्हणतात.



२५) **श्री रामेश्वरलिंग** – (मुरारजी पेठ, कल्पना टॉकीज शेजारी) मूळ नांव - श्री नवणीक्राटेश लिंग. विवेचन - सर्वांच्या अंतर्यामी वास करणारा राम हा स्वत: परमात्म्याचा परमअंश आहे. 'राम' या दोन अक्षराचा 'सोऽ ह' मंत्रासारखा उपयोग करतात. राम मंत्राच्या जपाने वाल्या कोळीचा 'वाल्मिकी ऋषी' झाला. रामनावामुळे पाण्यात दगड तरले. शीळा होऊन पडलेली अहिल्या सजीव (सचेत) होऊन तिचा उद्धार झाला. शिवयोगी सिद्धरामांच्या नावात सुद्धा राम आहेच.





BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

२६) **श्री नागेश्वर लिंग–** (मुरारजी पेठ, कल्पना टॉकीजच्या मागे) मुळ नांव- श्री कोवरेश लिंग



विवेचन - योगाभ्यासाने साधकाची कुंडलिनी शक्ती जागृत होते. मूलाधार चक्रातून अधोमुखी असलेली ही सर्पाकार आकाराची कुंडलिनी शक्ती 'ऊर्ध्वमुखी होऊन मस्तकातील सहस्तार चक्रात प्रवेश करते. तेव्हा या प्रक्रियेला पांतजल महर्षींनी आपल्या पातंजल योगशास्त्र ग्रंथात 'कुंडलिनी शक्तीची जागृती' म्हटले आहे, मकर संक्रांतीच्या शेवटच्या दिवशी सिद्धेश्वर महायात्रेत श्रींच्या पहिल्या नंदीध्वजाला - नागफणा बांधून त्याला सजवितात. श्रींच्या उत्सवमूर्तीच्या पितळी मुखवट्यावर पाच फण्याच्या नागाचा मुखवटा आहे. नागेश्वर लिंग त्याची स्मृती जागवितो.

२७) **श्री रामभद्रेश्वर लिंग–**(मुरारजी पेठ,कल्पना टॉकीज शेजारी) पुराणांतर्गत मूळ नांव- श्री कुक्षकंथाहेश लिंग.



विवेचन - पुराण कालापासून राम, भद्र ही नामदर्शक खास विशेषणे प्रिय, देवतासमान, शूर, विर व आदर्शवत माणसांच्या नावापुढे लावण्याची प्रथा होती. उदा. दशरथी राम, परशुराम, बलराम, त्याचप्रमाणे भद्र वीरभद्र वगैरे निवडक नाम-विशेषणे महापुरुषांच्या नावापुढे लावण्याची प्रथा दिसून येते. सिद्धरामांच्या नावात सुद्धा 'राम' आहेच. सिद्धरामांच्या नाम जपामुळे सामान्य भक्त सुद्धा 'भद्र' बलवान होऊन भवसागर तरून जाण्यास समर्थ बनतो.[२४]

२८) **श्री होमेश्वर लिंग** – (जूनी गिरणी चाळ नजीक) मुळ नांव : त्रिगुणीश लिंग. विवेचन -



अहंकाराचा पशू प्राणवायूच्या दोरीने बांधून मनाच्या वधस्तंभाकडे न्यावा, तिथे त्याला ज्ञानरूपी अग्नीच्या साह्याने जाळून भस्म करावे. काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या षड्रीपुंची आहुती होमेश्वर लिंगापुढे द्यावी हीच प्रेरणा या शिवलिंगापासून घ्यावी. या उदात्त हेतूने सिद्धरामांनी या लिंगाची स्थापना केली आहे.

२९) **श्री जगेश्वर लिंग** – (श्री चक्रदेव यांचे शेतमळ्यात)



मूळ नांव : श्री स्वर्ण भांडेश लिंग. विवेचन : या अनंत अमर्याद विशाल ब्रह्मांडाचा खरा नियंत्रक परमेश्वर

एकटाच आहे. विश्वाच्या अफाट पसाऱ्याची उत्पत्ती करणारा, त्याचे पालन पोषण करणारा आणि शेवटी सर्व विश्व आपल्या उदरात सामावून घेणारा तोच एकटा जगजेठी, या जगाचा महास्वामी आहे. माणसाच्या मनात अस्तिकतेची भावना जागविणारे हे लिंग सिद्धरामांनी निरंतर जनजागृती व्हावी यासाठी स्थापिले आहे.

३०) **श्री अनंतनामेश्वर लिंग :** (भोगडे वस्ती, कॅनॉलजवळ पुणे रोड)

मुळ नांव : श्री सिंहिशलिंग. विवेचन : शिव एकच परंतु त्यांची नावे मात्र अनेक आहेत. प्राचीन काळापासून 'शिवसहस्त्र नामवली' प्रसिद्ध आहे. ऋषीमुनींनी अनेक उपमा देऊन अलंकारिक शब्दांनी त्याचे रसभरीत वर्णन केले आहे. भगवद्पाद श्री आदिशंकराचार्यांनी आपल्या सर्व मठात श्री चंद्रमौळेश्वर शिवलिंगाची स्थापना करून सत्यम्-शिवम्-सुंदरम् या मधुर शब्दात शिवस्तवन केले आहे. श्री अनंत नामेश्वर लिंग त्याचे एक प्रतीक आहे.



३१) **श्री पशुपतिय लिंग** : (श्री देशमुख यांच्या शेतात)

मुळ नांव : श्री त्रिपुरांतकेश्वर लिंग. विवेचन : प्राचीन काळापासून शिवाला पशुपती नाथ म्हटले जाते. कन्नड भाषेत नंदीला बसवण्णा म्हणतात. एका पशूच्या नावात बसव ही तीन अद्याक्षरे असल्यामुळे या नावात फार मोठा अर्थ भरला आहे. 'ब' हे अक्षर ब्रह्मदेवाचे प्रतीक आहे, 'स' या अक्षरापासून सदाशिव (महेश) हे नाव व्यक्त होते. 'व' हे अक्षर वासुदेव विष्णूचे नाव ध्वनित करते. अशा प्रकारे बसव ही तिन्ही अक्षरे मिळून त्यातून ब्रह्मा, विष्णू, महेश, या तीन देवतांची नावे बनतात. तेव्हा नंदीसह या पशुपतीय शिवलिंगाचे पूजन केल्यास ब्रह्मा, विष्णू, महेश ह्या तिन्ही देवाचे पूजन केल्याचे पुण्य पदरात पडते.



३२) **श्री शतकेश्वर लिंग :** (चंडक बगीचा, बाळीवेस)

मूळ नांव : श्री योगीनाटीश लिंग. विवेचन : शतकानुशतके चालत आलेल्या विश्वाच्या रहाट गाडग्यात शंभर या आकड्याला एक विशिष्ट अर्थ आहे. कलियुगात सर्वसामान्य माणसाचे आयुष्य १०० वर्षाचे कल्पिले आहे. त्याच्या कालखंडाचे चार भाग करून पहिल्या पंचवीस वर्षात ब्रह्मचर्य पाळून विद्याभ्यास करणे, पुढे पंचवीस ते पन्नास वर्ष वयापर्यंत



गृहस्थाश्रमी होऊन संसार करणे, पन्नास ते पंच्याहत्तर कालापर्यंत वानप्रस्थाश्रमी होऊन सार्वजनिक कार्य करणे व पुढे पंच्याहत्तर ते शंभर वर्षापर्यंत विरक्त होऊन संन्यासाश्रम स्वीकारणे. अशी भारतीय संस्कृतीची परंपरा आहे.[२५]

३३) **श्री यल्लेश्वर लिंग :** (तरटी नाका पोलीस चौकी, बाळीवेस)



मुळ नांव : श्री ओंकार शिखरेश लिंग. विवेचन : यल्लेश्वर लिंग हे व्यक्ती वाचक नाव आहे. सिद्धेश्वर पुराणात यल्लेश्वर नावाच्या मृत भक्तास सिद्धरामानी आपल्या योग सामर्थ्याने पुन्हा जिवंत केल्याची कथा आहे. त्याच्या स्मृती प्रीत्यर्थ सिद्धरामांनी वरील नावाचे लिंग स्थापन केले आहे.

३४) **श्री जंबुकेश्वर लिंग :** (बाळीवेस मारुती मंदिराचे तळघरात)



मुळ नाव : श्री राप्य कडकेशलिंग. विवेचन : सिद्धरामांनी सोन्नलगीतील अठरा पगड जातीच्या आपल्या भक्तांसाठी, प्रत्येक जातीच्या कुलदेवतेचे एक मंदिर स्वखर्चाने बांधून दिले होते. अशी एकूण सोळा मंदिरे सोन्नलगीत सिद्धरामांनी बांधल्याची कथा पुराणात आहे. मादर (मोची) समाजाचे कुलदैवत श्री जंबुकेश्वर आहे. त्यांचे नावाने वरील नावाचे एक शिवलिंग सिद्धरामांनी स्थापिले आहे.

३५) **श्री जबरेश्वर लिंग :** (बाळीवेस मारुती मंदिराजवळ)



मुळ नांव : श्री अमृत कुंडेशलिंग. विवेचन : सर्व शक्तीमान परमेश्वराच्या इच्छेशिवाय झाडाचे पान देखील हालत नाही. म्हणून त्याला स्मरणे हे मानवाचे आद्य कर्तव्य आहे. अहोरात्र परमेश्वराचे स्मरण (चिंतन) केल्याने दैवी संपत्ती वाढते. विस्मरणाने विपत्तीत भर पडते. जबरेश्वर लिंगाच्या पूजनाने भक्तजनांचा आत्मविश्वास वाढतो.

३६) **श्री जगदेश्वर लिंग :** (बाळीवेस मारुती मंदिराजवळ)



मुळ नांव : श्री सुरगीश लिंग. विवेचन : मानवाच्या अंत:करणाला लागलेली मुक्तीची तहान भक्ती खेरीज भागणार नाही. म्हणून साधकाने भक्तीची कास सोडू नये.

कलियुगात भक्तीमुळेच भगवंत प्रसन्न होतो. अखिल जगाचे पालन करणाऱ्या दयाळू जगदीश्वराचे ऋण, त्याची भक्ती करूनच फेडावे हीच जगदेश्वर लिंगाची प्रेरणा आहे.

३७) **श्री बंडेश्वर लिंग :** (श्री सिद्धेश्वर कापड मार्केट) मूळ नाव - श्री भस्मकामेश लिंग. विवेचन - या लिंगाचे नाव ''बंदेश्वर लिंग'' असावे असे काही जुन्या काळातील ज्येष्ठ वडीलधाऱ्या सिद्धेश्वर भक्तांचे मत आहे. बंडेश्वर हे चुकीचे नाव कुणाच्या तरी अनावधानामुळे रुढ झाले असावे. कन्नड भाषेत बंड म्हणजे 'आलो' असा अर्थ ध्वनित होतो. 'मी आलो' असा भक्तीभाव भक्ताने व्यक्त करावा अशी प्रेरणा या शिवलिंगाद्वारे मिळते.[२५]



३८) **श्री भद्रेश्वर लिंग –** (सिद्धेश्वर कापड माकेट, प. मंगळवार पेठ) पुराणांतर्गत मूळ नाव - श्री मृत्कंथेश लिंग. विवेचन - पौराणिक काळी (प्राचीन काळी) दक्ष यज्ञात अपमानित झालेल्या पार्वती होम कुंडात उडी घेऊन सती गेल्याची कथा प्रसिद्ध आहे. त्यावेळी भगवान शंकराच्या शिवगणाचा सेनापती 'भद्र' नावाचा एक वीर पुरुष होता. त्याने शिवाच्या आज्ञेवरून हिमालय पर्वतावरील दक्ष प्रजापतीच्या यज्ञावर हल्ला करुन दक्ष राजाला ठार केले. व सतीच्या आत्माहुतीचा बदला घेतला. त्यामुळे भगवान शिवाने आपला सेनापती भद्र याच्यावर खूष होऊन त्याला वीर अशी पदवी दिली. तेव्हापासून भद्र 'वीरभद्र' नावाने ओळखला जाऊ लागला. त्याची आठवण कायम राहावी म्हणून सिद्धरामांनी भद्रेश्वर लिंगाची स्थापना केली.



३९) **श्री शेळगी गणेश लिंग –** (सावळे,मं.का. पूर्व मंगळवार पेठ, शिवानुभव मंगल कार्यालय) पुराणांतर्गत नांव - श्री मुसली सर्वेश लिंग असे आहे. विवेचन - सिद्धरामांनी सोन्नलगीत स्वहस्ते सात गणेश मुर्तीची स्थापना केली आहे. आठवा (अतिथी गणपती) सोन्नलगीच्या शेजारी असलेल्या शेळगी या गावातून आलेला आहे. शेळगी गावात गावकऱ्यांकडून नीट पूजा-अर्चा व देखभाल होत नसल्यामुळे सिद्धरामांची कीर्ती ऐकून त्याकाळी हा गणपती सोन्नलगीत आश्रय मिळावा म्हणून सिद्धरामांच्याकडे आला. श्रीनी त्याची विनंती मान्य करून या गणपतीला सोन्नलगीत जागा



दिली. अशी कथा सिद्धराम पुराणात आहे. यामुळे आठव्या गणपतीला शेळगीचा अतिथी गणपती असे नाव आहे. सध्या भक्तजनतेत शेळगी गणेश या नावाने प्रसिद्ध आहे.

४०) **श्री कामेश्वर लिंग –** (साबळे, मं.का, पूर्व मंगळवार पेठ, शिवानुभव मंगल कार्यालय) पुराणांतर्गत मूळ नाव - श्री परशमी खड्गेश लिंग. एकदा भगवान शिवशंकर अरण्यात एकांतपणे तपस्येत मग्न असताना कामदेव व त्यांची पत्नी रती हे दोघे त्यांची तपस्या भंग करण्यासाठी तेथे आले व त्यांच्यावर कामशरांचा



(बाणांचा) मारा केला. त्यामुळे भगवान शंकराची एकाग्रता भंग होऊन त्यांच्यात तप साधनेत व्यत्यय आला यामुळे तिसरा डोळा उघडून कामदेवास जाळून भस्म केले अशी पुराणात कथा आहे. त्याची आठवण म्हणून कामेश्वर लिंगाची स्थापना केली

४१) **श्री शंकेश्वर लिंग –** (वारद मठासमोर, पूर्व मंगळवार पेठ शिवानुभव मंगल कार्यालयासमोर) पुराणांतर्गत मूळ नाव - श्रीराम भद्रेश लिंग. विवेचन - श्री लंकेश्वर लिंग (सत्ययुग) या नावाचा अपभ्रमंश होऊन पुढे याचे नाव शंकेश्वर लिंग असे पडले आहे. परंतु पुराणांतर्गत या लिंगाचा राम - भद्रेश्वर (रावण) या मूळ नावाचा संदर्भ (सूत्र) पाहता या विधानास पुष्टी मिळते. रामायणात सीतेचा शोध



घेण्यासाठी मारुतीने जेव्हा दक्षिण सागरावर झेप घेतली तेव्हा त्याला चारी बाजूने निळ्याशार पाण्याने वेढलेली, शंखासारख्या शुभ्र आकाराची रावणाची सुंदर लंका दृष्टीस पडली. तेथे सीतेचा शोध घेतल्यावर तिची मुक्तता करण्यासाठी रामाने रावणाबरोबर युद्ध करण्याची तयारी केली. परंतु रावण कट्टर शिवभक्त असल्यामुळे शिवाकडून त्याला अनेक वर प्राप्त झाले होते. त्यामुळे रावण असुरात अजिंक्य गणला जात असेल. श्रीरामांनी त्याचा पराभव करण्याकरिता सागर तटावर एक शिवलिंग स्थापन करण्याचे ठरविले.शिवाला प्रसन्न करणे हा त्यांचा हेतू होता. विशेष म्हणजे या लिंगाची स्थापना करण्यासाठी त्यांनी खुद्द रावणालाच पाचारण केले शिवप्रेमाच्या पोटी त्याने रामाची विनंती मान्य केली. तेव्हा या अद्वितीय घटनेची स्मृती कायम राहावी म्हणून हे लिंग स्थापन केले. प्राचीन काळी श्री रामभद्रेश व श्री कलियुगात श्री रामेश्वर या नावानेसुद्धा हे लिंग प्रसिद्ध आहे.[२७]

४२) **श्री पंचमुखी लिंग –** (शिवानुभव मंगल कार्यालयासमोर) जुने नाव श्री परम पवनेश लिंग. विवेचन- परमेश्वराला पंचमुखीश्वर असेही म्हणतात. वीरशैव धर्माच्या पाच संस्थापकांची उत्पत्ती

याच पाचमुखातून झाली अशी मान्यता आहे. १) सद्योजात मुखातून, श्री रेणूक शिवाचार्य (रंभापुरीमठ) २) वामदेव मुखातून, श्री मरुळाराध्य शिवाचार्य (उज्जयिनी पीठ) ३) अघोर मुखातून श्री एकोरामाराध्य शिवाचार्य (केदारपीठ) ४) तत्पुरुष मुखातून श्री पंडिताराध्य शिवाचार्य (श्रीशैल पीठ) ५) ईशान मुखातून श्री विश्वाराध्य शिवाचार्य (श्री काशीपीठ) वरील लिंग हे जगद्गुरू पंचार्यांचे प्रतीक म्हणून सिद्धरामांनी स्थापन केले आहे.



४३) **श्री अमोघेश्वर लिंग (अमुगीदेवी लिंग )–** (साखरेवाडा, पूर्व मंगळवार पेठ) पुराणांतर्गत मूळ नाव - दंती जंबुकेशलिंग. विवेचन - सिद्धराम हे नाथपंथीय परंपरेतील एक सिद्धयोगी म्हणूनही प्रसिद्ध होते. त्यांचे काळी श्रीशैल पर्वतातील कदली वनात 'अमोघसिद्ध' या नावाचे एक वयोवृद्ध सिद्धपंथी सत्पुरुष प्रसिद्ध होते. अमोघ सिद्धाकडून सिद्धयोगाची साधना शिकण्यासाठी सिद्धरामांनी त्यांना सोन्नलगीत पाचारण केले होते. त्यांनी तलाव खननाच्या वेळीही सिद्धरामांना मार्गर्शन केल्याचे त्यांचे अनुयायी सांगतात (कदाचित ही दंत कथा असण्याची शक्यता आहे.) हल्ली अमोघसिद्धाची समाधी डफरीन चौकात ज्ञानप्रबोधिनी हायस्कूलच्या शेजारी आहे. परंतु त्यांच्या नावाने स्थापन केलेले लिंग मात्र सध्या लांब अंतरावर आढळून येते यामुळे पुराणांतर्गत ४३ क्रमांकाकडील या जुन्या मूळ लिंगाच्या नावाचा अर्थबोध होत नाही. हे दुसऱ्या प्रकारे अशाप्रकारेही सांगितले जाते.



अमुगीदेवी लिंग (अमोघेश्वर लिंग) - योगीराजांच्या पुढाकाराने हजार लग्ने एकाच दिवशी लागणार असल्याची बातमी चोहीकडे पसरली. निरनिराळ्या गावातून गरीब वधुवरांच्या जोड्या तयार होऊ लागल्या. लग्नासाठी धान्य, पैसे इत्यादी जमा होऊ लागले. सोन्नलगीत राहणाऱ्या प्रत्येकाच्या घरी एकेक पोती साळ अगर गहू प्रसादासाठी (जेवणासाठी) तयार करण्यास देण्यात आले. सोन्नलगीतच राहणाऱ्या शरण अमुगीदेव यांच्या घरीही एक गव्हाचे पोते दळण्यास देण्यात आले. अमुगीदेव व त्यांची पत्नी रायम्मा उभयता निष्ठावंत साधक होते. इष्टलिंग नसलेल्यांची सेवा ते करीत नसत. अशी बातमी सिद्धरामांच्या कानापर्यंत गेली. तेव्हा सिद्धराम रागाने म्हणाले,'आमच्या गावाची सेवा करण्यास नकार देणारांनी आमच्या गावात राहू नये.' काहींनी अमुगीदेवांना ही गोष्ट कळविली, दुसऱ्याच दिवशी अमुगीदेव आणि त्यांच्या पत्नी

रायम्मा सोन्नलगीहून बसवण्णांच्या कल्याणला जावयास तयार झाले. घरातील सर्व सामानांची बांधाबांध झाली. सामानाचे तीन गाठोडे झाले. तेव्हा रायम्मा एक आणि अमुगीदेवांनी एक गाठोडे घेतले तेव्हा अमुगीदेव म्हणाले, 'तिसरे गाठोडे सिद्धरामाचा गुरु मल्लय्या वाहून आणेल, त्याची आम्हाला का चिंता? तो भक्तांचा दास असल्याचे दाखवील चल आपण निघू' असे म्हणून ते कल्याणला निघाले.

उभयता चालत कल्याण जवळील 'शिवपूर' या गावी पोहोचण्यापूर्वीच तिसरे गाठोडे तेथे पोहोचले होते. हे पाहून आपण येथेच राहावे अशी देवाची इच्छा आहे असे समजून ते दाम्पत्य तेथेच राहू लागले. दुपारी मल्लिकार्जुनाची पूजा करुन ध्यानस्थ असताना 'शरण अमुगीदेवांना सोन्नलगीहून पाठविले याबद्दल मला वेदना झाली आहे. माझ्या भक्ताचे दु:ख-वेदना ही माझी वेदना।' हे शब्द ऐकू आले. सिद्धरामांनी जाणले की, शरण अमुगीदेव सामान्य नव्हते. त्यांचा आपणाकडून अपमान झाल्याची चूक त्यांना कळून आली. असे म्हटले जाते की, (सोलापूरातील कसबा गल्लीत असलेल्या देवालयातील मल्लिकार्जुन लिंगाच्या पिंडीवर जरा खोलगट भाग असल्याचे आजही दिसून येतो.) [२८] त्या शरण दाम्पत्याला शोधत सिद्धराम घोड्यावर बसून शिवपूराला आले. आपण शरणांचा अपमान केल्याबद्दल क्षमा याचना करू लागले. परत सोन्नलगीस चलण्याबद्दल विनम्र भावे विनवू लागले. 'शरण पुढे ठेवलेले पाऊल परत मागे ठेवीत नाहीत.' असे स्पष्टपणे सांगून अमुगीने योगीराजांची सांत्वना करुन त्यांना परत पाठविले. (सोलापूरात संक्रांतीच्या सणादिवशी सिद्धरामांच्या नंदीध्वजाची मिरवणूक होत असते. मिरवणूकीत नंदीध्वजापूर्वी भगवा कपडा आणि पांढरे केस अडकविलेला ध्वज असतो. तो अमुगीदेवांचे स्मारक असल्याचे संशोधकांचे मत आहे.[२९] अमूगीश्वर (अमोघेश्वर) लिंग हे ६८ लिंगापैकी एक लिंग आहे.

४४) **श्री सोमेश्वर लिंग –** (मधला मारुती) मुळ नाव : रजु कंथेश लिंग वरील लिंगाच्या प्रचलित नावाबद्दल विशेष सांगावयाचे झाल्यास श्री सोमेश्वरलिंग या नावाचे सिद्धरामांनी स्थापन केलेले याच नावाशी साम्य असलेले दुसरे शिवलिंग असल्याचे आढळून येते. हल्ली रेवण सिद्धेश्वर मंदिराच्या प्रांगणात असलेल्या क्रमांक ६४ च्या लिंगाचे नावसुद्धा श्रीकुठार सोमलिंग असे असल्याची शक्यता आहे. गुजरात प्रांतात सोरटी सोमनाथाचे मंदिर ज्योतिर्लिंगाचे प्राचीन तीर्थस्थान म्हणून प्रसिद्ध आहे.



४५) **श्री अहिमुखी ब्रह्मेश्वर लिंग –** (खारीबावडी, शुक्रवार पेठ) मुळ नांव - श्री महिषीश लिंग. विवेचन - अहिमुखी ब्रह्मेश्वर लिंग हे जल तत्व प्रधान लिंग असल्यामुळे त्याचे मंदिर पाण्यातच बांधावे लागते. सध्या शुक्रवार पेठेत खारी बावडी (करिबावी) या नावाने ओळखल्या



जाणाऱ्या जागी आठशे वर्षापूर्वी सिद्धरामांनी स्वहस्ते वरील लिंगाची स्थापना केली. भारतात ब्रह्मदेवाचे प्राचीन मंदिर यु.पी. प्रांतात अजमेरजवळ सुफीसंत ख्वाजा मैयुद्दीन चित्तीसाहेब यांच्या दर्ग्यापासून १६ कि.मी. अंतरावर पुष्करकुंड (तीर्थ) येथे एका जलाशयात आहे सिद्धरामांच्या काळी दळणवळणाची साधने अपुरी असल्यामुळे सर्वसामान्य भाविकांना तेथे जाणे फार अवघड होते. यासाठी त्यांनी आपल्या सोन्नलगी क्षेत्रातच वरील ठिकाणी अहिमुखी ब्रह्मेश्वर लिंगाची स्थापना करुन भाविकांची सोय केली. पुढे ६८ लिंगात याची गणना झाली. गेली ५० वर्षे हे शिवलिंग काही कारणाने अज्ञातवासात भूगर्भात मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडले गेले होते. परंतु महाराष्ट्र वीरशैव शिवा संघटनेच्या सोलापूर शाखेने यासाठी मोठे तीव्र धार्मिक आंदोलन करून सर्व सिद्धेश्वर भक्तांना दर्शनासाठी हे लिंग खुले करून दिले. त्यांच्या प्रयत्नामुळेच आज सर्वांना या लिंगाचे दर्शन घडत आहे.[३०]

४६) **श्री ब्रह्मना (शे) श्वर लिंग –** (शुक्रवार पेठ, मारुती मंदिर) मुळ नाव : श्री जठरेश लिंग.

विवेचन- ब्रह्मदेवाचे स्थान मानवाच्या मस्तकात आहे. ब्रह्मांडातील सर्व वस्तू व प्राणिमात्रापेक्षा ब्रह्मदेवाचे आयुष्य सर्वात जास्त असल्याचे वेदाने म्हटले आहे. यापूर्वी अनंतकोटी वेळा ब्रह्मांडाची उत्पत्ती झाली आणि महाप्रलय होऊन शेवटी सर्व काही नष्ट झाले असल्याची माहिती



सुद्धा वेदात आहे. आरंभी परमपिता परमेश्वराने ब्रह्मदेवाची उत्पत्ती करून त्यांच्यामार्फत विश्वाची उत्पत्ती केली व विष्णुदेवामार्फत विश्वाचे पालन पोषण करण्याची व्यवस्था केली. शेवटी तो भगवान शिवशंकराच्या हस्ते विश्वाचा संहार (नाश) घडवून आणतो. असा परमेश्वरी संकेतच आहे. सर्वात शेवटी महाप्रलयाच्या आधी ब्रह्मदेवाचाही अंत होतो. असे वेदाचे ब्रह्मवाक्य आहे. सिद्धरामानी ब्रह्मना (शे) श्वर लिंगाद्वारे ब्रह्मदेवालाही मृत्यू असून शेवटी तो देखील नाश पावतो असे सूचित केले आहे.

४७) **श्री अचलेश्वर लिंग –** (शुक्रवार पेठ, वैद्यवाडा) मूळ नाव : नटनटादिलिंगेश लिंग विवेचन – या विश्वातील कोणतीही वस्तू स्थिर नाही सूर्य, चंद्र, तारे व अब्जावधी आकाशगंगा अफाट अशा अमर्याद वेगाने अंतरिक्षाच्या प्रचंड पोकळीतून सुसाटपणे भ्रमण करीत आहेत. आपण राहतो या जगातील भू – भागावरील सर्व वस्तूमान आपणासह स्थिर असल्याचा आपणास भ्रम (भास) होतो पण ते सर्व खोटे आहे. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे आपल्या अंतर्यामी असलेल्या मनाचा वेग तर या सर्वापेक्षा जास्त वेगाने इकडे तिकडे सारखा भ्रमंती करीत असतो. परंतु वरून मात्र आपणास सर्व अचल असल्याचा भास होतो. आपल्या ऋषिमुनींनी एकटा परमेश्वर मात्र सर्व काळात आपल्याच ठायी समाधी अवस्थेत ध्यानमग्न, शांत व स्थिर असतो असे म्हटले जाते. यास्तव साधकांनी सद्गुरु मार्फत योगाभ्यासाच्या द्वारे ध्यानमुद्रा व समाधिविद्या अवगत करून घ्यावी असे म्हटले आहे. या क्रियेची योग परमपिता परमेश्वराच्या निर्विकार अशा स्वरूपात एकरूपता साधून स्थिरत्व प्राप्त करावे. अशी प्रेरणा या लिंगाद्वारे सिद्धरामांनी आपल्या भक्तांनी दिली आहे.



४८) **श्री चिन्हेश्वर लिंग –** (शुक्रवार पेठ, वैद्य वाड्याजवळ) मूळ नांव : श्री ललाटेश लिंग विवेचन – आपल्या पृथ्वीवर मानवाचे पदार्पण होऊन सुमारे वीस लाख वर्षे झाली असल्याचे जीवन शास्त्रज्ञ सांगतात. आरंभीच्या अतिप्राचीन काळी जेव्हा मनुष्याच्या मेंदूची जशी वाढ झाली तशी त्याची जिज्ञासाही जागृत झाली. त्या काळचा मानवी समाज विश्वाच्या अफाट पसाऱ्याकडे पाहून भयापोटी / श्रद्धेपोटी हे सर्व निर्माण करणाऱ्या एका सर्व शक्तिमान देवताच्या चिन्हाची पूजा करू लागला. विचारांती त्याला विश्वातील सर्व प्राणि मात्राची उत्पत्ती स्त्रीच्या योनीतून व पुरुषाच्या जननद्रियाद्वारे होते, अशी त्यांची प्रारंभी धारणा झाली. तेव्हा त्याने आपल्या आराध्य दैवतास योनी व लिंगाचा आकार दिला. (परंतु याबद्दल विद्वानामध्ये तीव्र मतभेद आहेत.) अशा प्रकारे कोणतेही चिन्ह (मूर्ती) माणसाच्या श्रद्धेचा विषय बनतो हे सिद्धरामानी या चिन्हेश्वर लिंगाद्वारे सुचित केले आहे.[३१]



**४९) श्री त्रिपुरांतकेश्वर लिंग –** (शुक्रवार पेठ) मूळ नाव - श्री व्यघ्र शतकेशलिंग. विवेचन - पौराणिक



काळी भगवान शंकरानी त्रिपुरांतकेश्वर या असुराचा वध केल्याची कथा पुराणात आहे. आपल्या अंत:करणात मन बुद्धी व चित्त अशा तीन मनोविकारांचे स्थान आहे. या सर्वांवर आत्म्याचे नियंत्रण असते. परंतु योगाभ्यासाशिवाय आपणास त्याचे ज्ञान व भान होत नाही. ज्याप्रमाणे धुळीने माखलेला आरसा स्वच्छ केल्यावर निट प्रतिबिंब पडते. त्याप्रमाणे आत्मारुपी आरसा आपण ईश्वराचे ध्यान व चिंतन करून शुद्ध ठेवावा. यामुळे परमेश्वराचे दर्शन होणे सुलभ होते. सिद्धरामानी या ऐतिहासिक व आध्यात्मिक गोष्टीचे साधकाला भान रहावे यासाठी वरील लिंगाची स्थापना केली आहे.

**५०) श्री सर्वेश्वर लिंग –** (पंचकट्टा) मूळ नाव : श्री कंबाल कपिलेश लिंग. विवेचन - परमेश्वराला सर्वेश्वर असेही एक नाव आहे. गड्डा मैदानात प्रवेश करताना सुरूवातीला पंचकट्टा म्हणजे



सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटीचे हंगामी यात्रा कार्यालय दृष्टीस पडते. या स्थानाचे एक विशेष म्हणजे याच्या पश्चिमेस रस्त्याच्या पलीकडे जवळच काही अंतरावर दोन भव्य दगडी दीपमाळा दिसतात. प्रत्येक दीपमाळेत एकूण २७ दगडी माठ्या दिव्याच्या पणत्या आहेत. या दीपमाळेवर श्रीच्या यात्राप्रसंगी, श्रावणमासात दर सोमवारी व महाशिवरात्रीच्या पर्व काळात दिवे लावण्याची प्रथा आहे. (पण याकडे आता लक्ष दिले जात नाही.) या दोन्ही दीपमाळेच्या मधोमध रस्त्यावर उभे राहून पश्चिम दिशेस पाहिल्यास तेथून थेट सिद्धरामाचे दर्शन सहजपणे घेता येते. या ठिकाणाचे महत्व ओळखून सिद्धरामानी येथे एक शिवलिंगाची व लहान नंदीची स्थापना केली. सागरातील दीपस्तंभाप्रमाणे सर्वेश्वराचे येथून दर्शन घडते.

**५१) श्री उमा महेश्वर लिंग –** (कलेक्टर बंगला) मूळ नाव : श्री भगिनीष लिंग. विवेचन - पौराणिक



काळापासून देवी देवतांच्या नावापुढे प्रथम त्यांच्या पत्नीचे नाव लावण्याची आहे. उदा. सीताराम, राधेश्याम, त्याप्रमाणे शिवपार्वती तथा उमा महेश्वर असे नामोच्चार करण्याची प्राचीन परंपरा आहे. यावरून सिद्धरामानी भारतीय संस्कृतीत 'स्त्री' चे महत्व किती मोठे आहे हे या लिंगाच्या नामोच्चरातून दाखविले आहे.

३२

५२) **श्री नवणेश्वर लिंग – (गुरुभेट – जिल्हा परिषद जवळ)** मूळ नांव : श्री लोचनकेश लिंग. विवेचन : सिद्धरामेश्वर ८ वर्षाचे असताना आपल्या घरातील गाई शेतात चरावयास घेऊन जात असत. त्यावेळी त्यांची माता सौ. सुग्गलादेवी सिद्धरामांना भूक लागल्यावर खाण्यासाठी म्हणून नवणीअक्की म्हणजे राळ्याच्या तांदळाचा भात व दही अशी शिदोरी बांधून देत असे. बालसिद्धराम आपल्या शेतात गेल्यावर इतर



मुलांप्रमाणे खेळत न बसता मातीचे शिवलिंग तयार करून त्याची पूजा करीत असत व त्यानंतर राळ्याच्या तांदळाच्या भाताचा नैवेद्य दाखवून तो सर्व मुलांना वाटून नंतर आपण त्याचे सेवन करीत असत. या घटनेची स्मृती राहावी या हेतूने सिद्धरामांनी वरील लिंगाची स्थापना केली.

५३) **श्री सिद्धवंती लिंग – (होमकट्टा)** मूळ नांव : श्री जालकंथेश लिंग. विवेचन : 'सिद्धवंती' हे एका कुंभार कन्येचे नाव आहे. ती दिसण्यास अतिशय सुंदर व वृत्तीने अतिशय भक्तीशील होती. तिचे लग्न न झाल्यामुळे अद्याप कुमारी होती. सिद्धरामांविषयी तिला अतिशय आदर वाटत असे. ती दररोज भल्यापहाटे सिद्धरामांच्या मठात येऊन स्वेच्छेने तिथली साफसफाई करून जात असे. सिद्धरामांची व तिची जेव्हा प्रथम मठात भेट झाली तेव्हा तिने मठात येऊन सेवा करण्यामागचा उद्देश सांगितला. भक्तीने सिद्धरामांवर तिचे मन बसले होते. ती त्यांच्याशी विवाह करू इच्छित होती. परंतु सिद्धराम



योगी असल्यामुळे तिच्या विनंतीस त्यांनी नकार केला पण तिची उत्कट भक्ती पाहून आपल्या योगदंडाबरोबर लग्न करून घेण्यास संमती दिली. तीच परंपरा आज सोलापूरात आठशे वर्षापासून सुरू आहे.

५४) **श्री ज्योतीश्वरलिंग – (होमकट्टा)** मूळ नाव : श्री कौपीनेश लिंग. विवेचन : दर वर्षीच्या मकरसंक्रांतीच्या यात्रेत होम मैदानावर त्याकाळी हजारो दीपज्योती लावून आरास करीत असत. अद्यापही ती प्रथा चालू आहे. होम झाल्यावर दुसऱ्या दिवशी यात्रेप्रीत्यर्थ आकर्षक दारुकामाची आतिषबाजी करतात. त्यामुळे तिथला सारा परिसर प्रकाश ज्योतीने न्हाऊन निघतो. येथील होम व दारुकामास प्रारंभ करण्या अगोदर वरील लिंगास ताजी हिरवी फळे, हिरवी साडी, हिरवा चुडा व



अलंकाराने सतीची पूजा करतात. या घटनेची स्मृती कायम राहावी यासाठी वरील लिंगाची यात्रेत पूजा अर्चा केली जाते.

५५) **श्री अकलेश्वर लिंग – (पार्क मैदान)** मूळ नांव : श्री पापभैत्रीश लिंग. विवेचन : कन्नड भाषेच्या शब्दकोशात 'अकल' या शब्दाचा अर्थपूर्ण संबंध असा सांगितला आहे; सिद्धरामाच्याकाळी सर्व सोन्नलकर कन्नड भाषिक होते. कन्नड ही त्यांची बोली भाषा



असल्यामुळे सहज आकलन होईल अशा शब्दात अध्यात्माचा अर्थ विशद करून सांगत असत. परमेश्वराशी जवळीक साधून त्याच्याशी पूर्ण संबंध प्रस्थापित करणे हे प्रत्येकाला किती आवश्यक आहे याचे नितांत महत्व आपल्या भक्ताला समजावे व नेहमी त्याचे स्मरण व्हावे या हेतून सिद्धरामांनी वरील अकलेश्वर लिंगाची स्थापना केली आहे.[33]

५६) **श्री गोमुख लिंग –** (पार्क मैदान) मूळ नांव - श्री पाशुपतेश लिंग. विवेचन - भारतीय संस्कृतीत गाईला सर्व पशूत अतिशय पवित्र मानले आहे. देवीदेवतांच्या मंदिरातील गर्भगृहातील मूर्तीचे प्रक्षालन (स्नान) केल्यानंतर सांडले गेलेले पाणी पायदळी तुडविले जाऊ नये याची फार दक्षता घेतली जाते. कारण ते पाणी



पवित्र तीर्थ मानून भाविक मोठ्या श्रद्धेने प्राशन करतात. हे पवित्र पाणी मंदिराच्या गाभाऱ्याबाहेर आणून गार्यीच्या मुखाच्या आकाराच्या एका दगडी रचनेतून वाहते ठेवतात. ही प्रथा आजतागायत सर्व भारतीय मंदिरात आहे. हिमालय पर्वतात गंगा नदी ज्या स्थानातून प्रथम बाहेर पडते. त्याला प्राचीन ऋषीमुनींनी गोमुख असे संबोधले आहे. तीच प्रथा सर्व भारतीय मंदिरात चालू आहे. गोमुखाचे महत्व अबाधित व कायम राहावे म्हणून सिद्धरामांनी वरील नावाचे शिवलिंग स्थापन केले आहे.

५७) **श्री बालब्रम्हेश लिंग –** (पार्क मैदान, शमी वृक्षाजवळ) मूळ नांव : श्री बाल वृषभेष लिंग. विवेचन- प्रारंभी पृथ्वीवर सर्वत्र हिरण्यगर्भ म्हणजे पाणीच पाणी होते, असे वेदात वर्णन आहे. सृष्टीचे निर्माण करण्यासाठी परमेश्वराने आपल्या इच्छाशक्तितून पाण्यात उगवणाऱ्या कमलपुष्पातून (बाल) ब्रह्मदेव प्रकटले. पुढे



त्यांच्यावर जगाच्या निर्मितीचे काम सोपविण्याची गोष्टही वेदात आहे. अशाप्रकारे 'कमल'

पुष्पांच्या कुशीत जन्मलेल्या ब्रह्मदेवाचे बालपण एकट्या परमेश्वराशिवाय कोणाला माहीत असणार ? सध्या ज्या ठिकाणी शमी वृक्षाजवळ हे शिवलिंग आहे तो भाग पूर्वी तलावाच्या, खंदकापैकीच होता. त्याकाळी तिथल्या पाण्यात खूप कमळाची झाडे होती व त्यांना भरपूर फुले यायची. सिद्धराम या कमळ फुलांनीच मल्लिकार्जुनाची पूजा करीत असत. तेव्हा कमळफूल, ब्रह्मदेव व परमेश्वर स्वरूप मल्लिकार्जुन प्रभू यांचा त्रिवेणी अन्योन्य पौराणिक संबंध व सान्निध्य लक्षात ठेवून सिद्धरामांनी त्यांच्या स्मरणार्थ वेदकाळाची स्मृती कायम असावी म्हणून वरील लिंगाची स्थापना केली आहे.

५८) **श्री वज्रेश्वरलिंग**–(पार्क मैदान, शमीवृक्षाजवळ) मूळ नाव– श्री गोचरेशलिंग विवेचन– पृथ्वीवरील सर्व खनिज पदार्थात 'वज्र' म्हणजे हिरा हा अतिशय कठीण, तेजस्वी, स्वयंप्रकाशी. तो अति मौल्यवान पदार्थ म्हणून गणला जातो. प्राचीन काळातील ऋषी - मुनींनी योग शास्त्राचा अभ्यास करून वज्रकाया



या नावाची एक योगसिद्धी प्राप्त करून घेतली होती. रामायण काळात ही सिद्धी हनुमंत, महाभारत काळात पंडुपुत्र भीम यांनी योगसाधनेद्वारे आपले शरीर वज्रासम कठीण (वज्ररूप) करून घेतले होते अशी कथा आहे. सिद्धरामांनी सध्याच्या भुईकोट किल्ल्यात कपिलसिद्ध मल्लिकार्जुन शिवलिंगाखाली वज्रेश्वर नामक एका स्वयंभू शिवलिंगात (वज्रकपाटात) स्वेच्छेने शिवयोग समाधी घेतली आहे याबद्दल पुराणात उल्लेख आहे. तरीसुध्दा याबद्दल पुराणातील माहितीपेक्षाही जास्त पुरावा किल्ला परिसरातच भरपूर प्रमाणात आजही उपलब्ध आहे. तरी सुध्दा याबद्दल आणखी संशोधन होणे जरूरीचे आहे. विशेष म्हणजे सिद्धरामंनी लिंगावर लिंग स्थापन केले आहे. असे कवी राघवांकाचार्यांनीच खुद्द आपल्या पुराणात नमूद केले आहे. त्याचा प्रत्यय या ठिकाणी प्रत्यक्ष पाहावयास मिळतो. यास्तव वज्रेश्वर लिंगाच्या नावाची स्मृती कायम म्हणून या लिंगाची स्थापना झाली आहे.[३४]

५९) **श्री उमामाहेश्वर लिंग** – (पार्क मैदान, शमीवृक्षाजवळ) पुराणातील नाव श्री दशमुखेशलिंग. विवेचन - सिद्धरामानी स्थापन केलेल्या ६८ लिंगांपैकी ५१ व्या क्रमांकाच्या लिंगाचे नाव सुध्दा 'उमामहेश्वर लिंग' असेच आहे. तेव्हा एकाच नावाच्या दोन लिंगातील नामसदृश्यामुळे अनेक भक्तांच्या मनात गोंधळ निर्माण



होण्याचा संभव आहे. सत्ययुगात 'पुलस्य' ऋषीचा पुत्र रावण, हा महातपस्वी कट्टर शिवभक्त

होता. त्याला शंकराकडून अनेक वर मिळाले होते. रावण अतिशय विद्वान व दशग्रंथी महापंडित होता त्यामुळे त्याला 'दशानन' किंवा 'दशमुखी' रावण असे नाव होते. रावण हा इतका ज्ञानी तपस्वी होता तर त्याने परस्त्रीचे अपहरण का केले? असा प्रश्न प्रत्येकांच्या मनात असे. परंतु वास्तवात तसे नसून रावण सीतेला आपली मानस कन्या मानीत अशीही कथा वाल्मिकी रामायणातच आहे. तेव्हा त्याच्या उदात्त विचाराची स्मृती कायम राहावी या हेतूने सिद्धरामांनी त्याच्या नावे हे लिंग स्थापन केले आहे.

६०) **श्री बाल योगीश्वर लिंग –** (पार्क मैदान, शमी वृक्षाजवळ) मूळ नाव : श्री नीलगगनेश लिंग.



विवेचन- बालसिद्धेश्वर आपले आराध्य दैवत मल्लयाच्या दर्शनासाठी वेडेपिसे होऊन घरात कोणासही न सांगता श्रीशैलला जाणाऱ्या यात्रिकरुंबरोबर श्रीशैल पर्वतावर गेले. त्यावेळी त्यांचे वय अवघे आठ वर्षाचे होते. श्रीशैलमध्ये मोठ्या प्रयासाने त्यांची त्या काळचे जगद्गुरु १००८ श्रीश्रीश्री मल्लिकार्जुनमहास्वामीजींशी भेट झाली. तेव्हा त्यांनी तेथेच श्रींच्या आश्रमात राहण्याचा निश्चय केला. आश्रमात राहून त्यांनी संस्कृत भाषा, चारवेद, अठरा पुराणे, आगम - निगम, व्याकरण व काव्य इ. शास्त्राचे अध्ययन करून त्यात आश्चर्यकारक प्राविण्य मिळविले. त्यानंतर जगद्गुरुंनी त्यांना वीरशैव धर्मातील प्रथेप्रमाणे इष्टलिंग दीक्षा दिली. अल्पावधीतच त्यांची इतकी प्रगती झाल्याचे पाहून सर्वजण त्यांना 'बालयोगी' असे म्हणू लागले. राघवांकाचार्य रचित कन्नड सिद्धराम पुराणात ही माहिती सविस्तरपणे वाचावयास मिळते. सिद्धरामांनी आपण बालपणात अनुभवलेल्या सर्व गोष्टींची (प्रसंगांची) स्मृती कायम राहावी या हेतूने श्रीशैल जगद्गुरुच्या प्रेरणेने वरील शिवलिंगाची स्थापना केली आहे.

६१) **श्री शमीश्वर लिंग–**(पार्क मैदान, शमी वृक्षाजवळ) मूळ नांव श्री गुहाग्र होमेश लिंग.



विवेचन- सिद्धेश्वर तलावाच्या पश्चिमेस किल्ल्याच्या दक्षिण तटाजवळ खंदकाशेजारी शमीच्या झाडाचे जुने स्थान आहे. शमीच्या वृक्षाच्या ढोलीत पांडवांनी वनवासात असताना आपली सर्व शस्त्रास्त्रे लपवून ठेवल्याची कथा महाभारतात आहे. यानंतर सुमारे ४४०० वर्षानंतर बाराव्या शतकात सिद्धरामांच्या अवतारकाळात राघवांकाचार्य कवीने आपल्या सिद्धराम पुराणात सोन्नलगीत असलेल्या एका जुन्या शमी वृक्षाचा उल्लेख केला आहे. बालवयातच यात्रेकरुंबरोबर मल्लयाच्या

शोधार्थ निघालेल्या सिद्धरामांचे कालांतराने श्रीशैल जगदगुरुंच्या आश्रमात सर्व शिक्षण पूर्ण झाल्यानंतरसुद्धा ते परत सोन्नलगीत स्वगृही जाण्यास तयार नव्हते. परंतु जगद्गुरुंनी त्यांना तू परत जा, मी तेथेच एका शमीच्या झाडाखाली लिंगरूपाने वास करीन अशी त्यांची समजूत घातल्यावर ते सोन्नलगीस परत आले. तेथे आल्यावर त्यांनी जगद्गुरुंच्या आश्वासनाची सत्यता पडताळण्यासाठी शमीच्या झाडाखालच्या जमिनीचे खनन केले तेव्हा आश्चर्य म्हणजे त्या ठिकाणी भूगर्भात दडलेले एक मोठे सुंदर शिवलिंग दृष्टीस पडले. त्याखाली त्यांना द्रव्य सुद्धा भरपूर मिळाले, असे राघवांक कवीने वर्णन केलेले आहे. सिद्धरामांनी हे लिंग जमिनीतून बाहेर काढून त्यावर एक सुंदर, भव्य, दगडाचे कोरीव शिवमंदिर बांधले. या लिंगाचे नाव त्यांनी कपिलसिद्ध मल्लिकार्जुन लिंग असे ठेवले. या ऐतिहासिक घटनेची कायम स्मृती म्हणून त्यांनी या शिवलिंगाची स्थापना केली.[३५]

६२) **श्री स्वयेश्वर लिंग –** (मुरारजी पेठ) : मूळ नांव - श्री स्व (ख) येश्वर लिंग, विवेचन - देवस्थान बोर्डावर या लिंगाचे नांव स्वयेश्वर असे लिहिले आहे. परंतु काही विद्वानांच्या मते हे नाव चुकीचे (अपभ्रंश झालेले) आहे. 'ख' म्हणजे खगोल-ब्रह्मांड असा संस्कृत भाषेत अर्थ ध्वनित होतो. अनंत कोटी ब्रह्मांडाचा स्वामी (ईश्वर) अशा अर्थी हे नाव आहे. परमेश्वराचे स्वसामर्थ्य दर्शविणारे हे लिंग ६८ लिंगाच्या मालिकेत स्थापन केले आहे.



६३) **श्री मोळगेश्वर लिंग –** (उत्तर कसबा, काळम्मादेवी मंदीर) : मूळ नाव: श्री केशकंथेश लिंग विवेचन- सिद्धरामांच्या आश्रमात मोळगी मोरय्या या नावाचे एक विरक्त शरण राहत होते सिद्धरामांवर त्यांची फार भक्ती होती. शरण मोळगेश दररोज जंगलात जाऊन आश्रमात अन्न शिजविण्यासाठी लाकडे गोळा करून आणत असत. नंतर राहिलेल्या लाकडाचे भारे बांधून त्याची बाजारात विक्री करीत असत. अशा प्रकारे श्रम करून त्यावर आपली उपजीविका करीत असे. यावरून त्यांचे नाव मोळगी मोरय्या असे पडले होते. यांनी हे प्रथम काही दिवस बसवकल्याण येथे महात्मा बसवेश्वरांनी स्थापन केलेल्या 'अनुभव मंटप' या धर्म संसदेत राहून अध्यात्माची साधना केली होती. 'कायकवे कैलास' (श्रम हाच स्वर्ग) या बसव धर्माच्या घोषवाक्यावर त्यांची प्रामाणिक निष्ठा होती. त्याचप्रमाणे त्यांची दिनचर्या होती. सिद्धराम जेव्हा बसवकल्याणला महात्मा बसवेश्वरांच्या



भेटीस गेले होते तेव्हा मोळगी मोरय्यासुद्धा त्यांच्या बरोबर बसवकल्याणला गेले होते अशी माहिती मिळते. त्यांची समाधी पंढरपूरजवळ असलेल्या पुळूज या गावात आहे. सिद्धरामांनी आपल्या जीवलग मित्रांच्या स्मृतिप्रीत्यर्थ वरील शिवलिंगाची स्थापना केली आहे.

६४) **श्री कुठार सोमेश्वर लिंग :** (श्री रेवणसिद्धेश्वर मंदिर) : मूळ नांव श्री लगुडेश लिंग



विवेचन : ६८ लिंगांच्या यादीत ४४ व्या क्रमांकाचे सोमेश्वर नावाचे एक लिंग आहे. परंतु थोड्या नाम सादृश्याखेरीज या लिंगांच्या त्याच्याशी काहीच संबंध नाही. श्री कुठार सोमेश्वर म्हणजे हातात पशु किंवा कुऱ्हाड (कुठार) नामक शस्त्र धारण केलेले भगवान शिवशंकर असे या लिंगाचे नाव आहे. भगवान विष्णूने परशुराम अवतारात शंकराची तपश्चर्या करून त्यांच्या कडून 'पाशुपत' नामक महासंहारक अस्त्र प्राप्त करून घेतले होते. या पौराणिक घटनेची स्मृती म्हणून सिद्धरामांनी त्यांच्या नावाने वरील शिवलिंगाची स्थापना केली आहे.

६५) **श्री मल्लिकार्जुन लिंग :** (श्री मल्लिकार्जुन मंदिरात) : मूळ नांव श्री शिथिलिंग.



विवेचन : क्रमांक ६५ ते ६८ पर्यंतची चार लिंगे एकत्रित मल्लिकार्जुन मंदिराच्या प्रांगणात आहेत. हे शिवलिंग म्हणजे छोटासा सिद्धरामांचा एक परिवारच आहे. ही लिंगे या ठिकाणी एकत्र कशी आली, तर सिद्धरामांच्या आज्ञेवरून किल्ल्याच्या आतील देवालयाच्या गाभाऱ्यात एका शिवलिंगाची स्थापना करून त्याचे 'कपिलसिद्ध मल्लिकार्जुन लिंग' असे नाव ठेवले व माहितीप्रमाणे सिद्धरामांनी येथे लिंगावर लिंग स्थापले. या लिंगाच्या खाली भूमिगत असलेले लिंग म्हणजेच वज्रेश्वर लिंग होय. हेच लिंग नंतर सापडले.

**६६, ६७, ६८** हे चारही लिंगे क्र. ६५ च्या लिंगाबरोबरच स्थापिलेली आहेत. चारही लिंग म्हणजे सिद्धरामांचा परिवार समजला जातो.[३६]

## कांही कथा

१) **पांडुरंग देवस्थान :** कित्येक देवदेवतांचा वास सोन्नलगीत आहे असे म्हटले जाते. अष्टविनायक, ६८ तीर्थे, मल्लिकार्जुन मंदिर इत्यादींची माहिती आपण पाहिली आहे. विठ्ठलाच्या मंदिराबाबतही एक अख्यायिका सांगितली जाते. तसेच वारकरी संप्रदायाच्या पुरातनते संबंधी आणखी एक धागा नुकताच दंतकथेच्या माध्यमातून उजेडात आला आहे. यात ऐतिहासिक व लेखी पुरावा नसला, तरी जी वास्तवता आहे त्याचा अर्थ कसा लावणार? एका अत्यंत वयोवृद्ध शैव सांप्रदायीकाकडून हा धागा मिळाला आहे.

श्रीज्ञानदेवाच्या कुळी, श्री ज्ञानदेवांच्या पूर्वी पाच-दहा पिढ्या पंढरीची वारी व उपासना होती. श्रीज्ञानदेवांचे आजोबा गोविंदपंत व साध्वी निराबाई श्री गहिनाथांचे अनुग्रहीत होते. श्री गोविंदपंत व साध्वी या पंढरीच्या वारकरी होत्या. 'निराईस प्रेम गहिनीनाथें' अशा शब्दांत संत नामदेवांनी श्री गहिनीनाथ व निराबाई यांच्या गुरु शिष्य नात्याचे वर्णन करताना म्हटले आहे. बार्शी-सोलापूर मार्गे पंढरीला जाताना अगोदर चंद्रभागा ओलांडावी लागते. श्री. गोविंदपंत आणि निराबाई खांद्यावर पताका घेऊन पायी वारी करत पंढरीला जाताना त्यांचा मुक्काम सोलापूर येथे पडला. हा काळ अंदाजे आठशे वर्षापूर्वीचा आहे. त्यावेळी सोलापूरला शिवअवतारी श्रेष्ठ महाशिवयोगी श्री सिद्धरामेश्वर होते. तेव्हा शिवालयाभोवती तलाव खोदकाम चालू होते, त्यांची अवस्था 'अगा योगी जो म्हणिजे। तो देवांचा देव जाणिले।' अशी होती. या तळ्याकाठी असणाऱ्या एका झाडाखाली श्री गोविंदपंत व निराबाई मुक्कामासाठी थांबले, तळ्याचे खोदकाम पाहण्यासाठी फेरफटका मारताना, श्री सिद्धरामेश्वर महाराजांना हे वृद्ध दांपत्य दिसले. सोबतची पताका पाहून हे वारकरी आहेत हे त्यांनी ओळखले. थोरांचे मन आकाशाएवढे व्यापक असते. ते त्या जोडप्यापाशी गेले. ''खालारा धावे पाणी ।'' ही वारकऱ्यांची सहज स्वाभाविक वृत्ती असते.त्या दोघांनी श्री सिद्धरामेश्वरांना नमस्कार केला. तेव्हा सिद्धरामांनी त्यांची चौकशी केली. विचारपूस करून त्यांना शिधा दिला. राहण्यासाठी जागेची व्यवस्था केली आणि हळुवारपणे म्हणाले,''बाबा, तुम्ही दोघे वृद्ध आहात, पायी चालत केवढे हे कष्ट झेलता? उन्ह, वारा, पाऊस, थंडी यांचीही आपणांस पर्वा नाही. निवाऱ्याची व्यवस्था नाही, अन्न कोठे मिळेल, याची कल्पना नाही, एवढ्या गैरसोयी असूनही त्या पंढरीच्या पांडुरंगाची केवढी ओढ तुम्हांला आहे '' पुढे श्री सिद्धरामेश्वर महाराज म्हणाले, ''बाबा कशाला पंढरीला जाता?, आम्ही तुम्हांला

येथेच त्या दयाघनाचे, श्री पंढरीरायाचे दर्शन घडवितो.'' त्या जोडप्यांना आनंद झाला. त्यांचा हा आनंद जगावेगळा होता. त्यानंतर श्री सिद्धरामांनी श्री पंढरीरायास पाचारण केल्यावर वारकऱ्यांचे पंचप्राण साक्षात प्रभू 'विटेवरी रामचरण साजिरे' या रूपातच श्रीविठ्ठल सिद्धेश्वर तलावाशेजारी उभे राहिले. श्री गोविंदपंत व निराबाई यांना त्यांच्या दर्शनाने अत्यानंद झाला.[३७] आणि आपले जीवन कृतार्थ झाल्याचा भाव मनी दाटला. (आजही शिवयोगी सिद्धरामेशाचे मुख्य देवालय असलेल्या समाधी मंदिराच्या उत्तर दिशेला विठ्ठलाचे देऊळ आहे.) गोविंद भट्ट गहनीनाथ हे महाराष्ट्रातील थोर संत शिरोमणी ज्ञानेश्वरांचे आजोबा होते. विठ्ठलाची पूजा करण्याचे भाग्य पाठक घराण्यास लाभले आहे.[३८] यामध्ये १) कै. नथोपंत गणेश पाठक २) कै. भिकाजी नथोपंत पाठक व आज प्रकाश भिकाजी पाठक (इ. स. १९६१) यांच्या कडून विठुरायाची सेवा केली जाते.[३९]

२) **काळव्वाला प्राणदान :**

काळव्वाला दिलेले प्राणदान. या कथेविषयी वेगवेगळी माहिती आहे. बोम्मीशेट्टी असे नाव शिवयोगी सिद्धराम चरित्रांमृतामध्ये दिले आहे. तर अण्णाबम्मय्या असे नाव बोम्मीशेट्टी ऐवजी सोलापूर श्री महाशिवयोगी सिद्धरामेश्वर सचित्र चरित्रामध्ये आहे. ती कथा अशी -

सिद्धरामेश्वरांच्या सेवेत लागलेल्या अण्णाबोम्मय्याची परीक्षा घेण्याचे सिद्धरामांनी ठरविले, आणि इकडे बोम्मय्याच्या बायकोला (काळब्बी) किंवा काळव्वाला श्वानाने चावा घेतला पण बोम्मण्णाच्या सेवेत काही फरक पडला नाही. त्याचे कार्य रोजच्या प्रमाणेच चालू होते. बोम्मण्णा घरी परत येताच सर्वजण रडायला लागले. पण बोम्मण्णा बायकोपाशी आला आणि म्हणाला 'सिद्धरामेश्वरांनी दिलेला प्रसाद मी घेऊन आलो आहे, उठ'. असे म्हणताक्षणी ती उठून बसली.[४०] तिला पाहून सर्वांना आनंद झाला आणि सिद्धरामेश्वरांची सर्वांनी मिळून प्रार्थना केली (श्री सिद्धरामेश्वराच्या देवळासमोर तलावाच्या पूर्व किनाऱ्यावर जे लहान देऊळ आहे तेच अण्णाबोम्मय्याचे)[४१]

३) **यल्लेशला गंजी पाजली :**

एक जंगम दांपत्य सिद्धरामांची सेवा करीत होते. त्यांना एक मुलगा झाला. त्याचे नाव यल्लेश. यल्लेश हुशार होता. तो सर्वांना मदत करी. सिद्धरामांना पूजेत मदत करी. फुले, बिल्वपत्रे आणून देत असे. पण त्याला सारखा ताप येत होता. अनेक औषधे करुनही तो बरा होईना [४२] किती वेळा पाणी पाजले तरी त्याला समाधान होईना. तेव्हा त्याची आई गंजी पाजल्यास दाह कमी होईल म्हणून स्वयंपाक घरात गेली. पण ती परत येईपर्यंत यल्लेशचा प्राण गेला होता. नंतर

ही बातमी सिद्धरामांना समजली. माता यल्लेशला सिद्धरामा जवळ घेऊन आली आणि म्हणू लागली, 'मी त्याला पाजण्यासाठी गंजी केली होती पण तो ती न पिताच मेला.' तेव्हा सिद्धरामांनी ती गंजी आणविली आणि ते भांडे हातात घेऊन 'यल्लेशय्या एवढी गंजी घे' असे म्हणताच तो हात पुढे करून गंजी प्याला व पाण्याची गुळणी करून नंतर त्याने प्राण सोडला. सिद्धराम म्हणाले,'यापुढे मी काही करु शकत नाहीं. बाकी सर्व मल्लिकार्जुनाच्या हातात आहे.' पण ही कथा आणि हा चमत्कार सर्वत्र पसरला आणि गावोगावचे लोक सिद्धरामांकडे येऊ लागले. ही एल्लेशची कथा डी. एल. नरसिंहाचार्यांनी वर्णिलेली आहे.[४३] (बाळे वेशीपासून जो रस्ता पुण्याकडे जातो त्याच्या उजव्या बाजूस जे देऊळ आहे तेच यल्लेश्वराचे,तरटी नाक्या जवळचे)[४४]

तलावाचे काम चालू असताना अनेक कामगार तेथे काम करीत होते. त्यांची राहण्याची व्यवस्था करण्यात आली होती. भुकेलेल्यासाठी अन्नछत्र, तृषितांसाठी जागोजागी पाणपोईची व्यवस्था केली होती. या अन्नछत्राचे कार्य आजही सिद्धरामेश्वर देवळात चालू आहे. सिद्धरामांच्या साधनेचे दोन मुख्य उद्देश 'एक साकारात निष्ठा' दुसरे म्हणजे 'सर्व जीव राशीत अनुकंपा ' नेत्र दोन असले तरी दृष्टी एकच असते. सामान्य जनाच्या मनी धार्मिक भाव जागृत करणे. दुसरे म्हणजे पशुपक्षी, कृमी कीटक, मुंगीपासून हत्तीपर्यत सर्व जीव राशीत दया, अनुकंपा. हे दोन मुख्य उद्देश होते. दीन, दलित, दु:खितांसाठी त्यांचे मन तळमळत होते. तीळतीळ तुटत होते. सिद्धरामांचे श्रेष्ठत्व सीमित न राहता चारही दिशेला त्यांची कीर्ती पसरु लागली. दुरदुरून राजे, महाराजे, सामंत, मोठे अधिकारी येऊन सिद्धरामांचे दर्शन घेऊन त्यांच्या कार्यासाठी धन, संपत्ती, भूमी, धान्य इत्यादी साहाय्य करून जात असत.[४५] त्या काळात हजार लग्न लावल्याचा उल्लेखही आढळतो.

**४) कल्लयाचे लग्न आणि हजार लग्न :**

सिद्धरामांचे सामाजिक कार्य, अणि वचन रचनेचे कार्य चालू असतानाच सिद्धरामांचे शिवानुभव ऐकण्यास येणाऱ्या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढू लागली.

एके दिवशी कल्याणहून बसवतत्व प्रचारासाठी आलेले पिता व पुत्री शिवानुभव ऐकण्यास आले होते. तेव्हा हे पिता - पुत्री बसवण्णांचे वचन गाऊ लागली. हे पाहून सर्वांनी त्यांना सोन्नलगीत राहण्याची विनंती केली. त्या पुत्रीची शालीनता, स्वभाव, मुग्धता पाहून कल्लय्याच्या मनी तिच्याबद्दल आकर्षण वाटू लागले. पण हे गुरुदेवा पुढे कसे सांगावे याची त्याला भीती वाटू लागली. पण सिद्धरामांनी कल्लय्याच्या मनातील भाव ओळखला होता. तेव्हा त्यांनी एक वचन रचले आणि ते कल्लय्यास वाचायला दिले.

वचन - ''भक्ताचे मन स्त्रीवर गेल्यास विवाह करून एकरूप व्हावे,
भक्ताचे मन दगड मातीवर गेल्यास घर विकत घ्यावे,
भक्ताचे मन धनसंपत्तीवर गेल्यास कष्ट करुन मिळवावे...
... कपिलसिद्ध मल्लिकार्जुन''
(सिद्धराम वचन संपुट, वचन नंबर ६१२)[४६]

तेव्हा या वचनातून गुरुंकडून त्याला परवानगी मिळाली. कल्लय्याच्या लग्नाबरोबरच इतर अनेक गोरगरिबांची लग्ने लावण्याचा संकल्प असल्याचे सिद्धरामांनी सांगितल्यावर सर्वांना आनंद झाला. सामूहिक लग्न संकल्पना चालू करणारे मूळ पुरुष योगीवर्य सिद्धरामच होत.[४७]

हजार लग्नाची कल्पना करताच सर्वजण तयारी लागले. मल्लिकार्जुनाचे कोठीत सर्व सामान तयार ठेवण्याची तजवीज करावयास सांगितली. सामान म्हणजे तांदूळ, गव्हाचे पीठ, तूप व गव्हले वगैरे होय. सिद्धरामांनी मल्लिकार्जुनाचा प्रसाद गावोगावी पाठविला. सर्व लोकांनी आज्ञेप्रमाणे सामानाची तजवीज केली. कितीतरी मैलावरून लोक येऊ लागले. अनेक जणांनी अनेक प्रकारे मदत केली. शिव-शंभूच्या लग्नाच्या वेळेस ज्याप्रमाणे मंडप तयार केला होता. त्याप्रमाणे मांडव तयार करण्यात आला. अनेक देवदेवतांची चित्रे काढली होती. सडा टाकून गावभर रांगोळी काढली होती. मंडपाला कळस, आरसे लावले होते. गोंडे व झालरी लटकाविल्या होत्या आणि दवंडी पिटवली की, अनेकजणांना सिद्धरामेश्वरांनी नायक नरकातून बाहेर काढले आहे व त्यांची मुक्ती करण्यासाठी बारा हजार खंडी तूपाचा अभिषेक करण्याचा व हजार लग्ने लावण्याचा उपक्रम राबविला जात आहे. तरी लग्नाचे वधू व वर आणि सोयरे यांना बरोबर घेऊन सर्वांनी यावे.'' अनेक देशांतून लोक आले. आणि १५ शुद्ध वैशाखास लग्न लावण्यास तयारी झाली. वाजंत्री वाजू लागले. गाणी सुरू झाली. हाटकेश्वरास व क्षेत्रातील सर्व लिंगाना सूत गुंडाळून नंदीच्या केसाची चोरी करून आदिलिंगेश्वरावर बांधली व अभिषेक केला. आणि सर्व रीतीनुसार हजार लग्ने मोठ्या उत्साहात पार पडले.
(हाटकेश्वर म्हणजे स्टेशनजवळील धर्मशाळेपाशी जे आडकेश्वराचे देऊळ आहे. त्यासच हाटकेश्वर असे म्हणतात. पुराणात हाटकेश्वर असे नाव आहे.)

## अल्लमप्रभूंचे आगमन

वरील सर्व चमत्कार आणि कार्य चालले तेव्हा तलावाचे काम अजून चालू होते. तेव्हा अल्लमप्रभूंचे आगमन सोन्नलगीत झाले. ते असे व्योमकाय सिद्धपुरुष. अल्लमप्रभुदेव कांतियोगी बसवण्णांची कीर्ती ऐकूण कल्याणकडे निघाले होते. जाण्याच्या वाटेवरच योगीपुरुष सिद्धरामांची ख्याती आणि योगसामर्थ्य याबद्दल समजले. घडत असलेल्या अद्भुत अलौकिक घटना याबद्दल, तसेच असाध्य रोग बरे केलेले, आंधळ्यांना दृष्टी, पांगळ्यांना पाय, संतती नसलेल्यांना संतती देत असलेले परमेश्वराचे अवतारच सिद्धदेव आहेत अशी त्यांच्या भक्तांची भावना होती. आर्त भावनेने शरणागत झालेल्यांना मागितलेले देणारे चिंतामणी, कामधेनू , कल्पतरूच होते- सिद्धरामदेव !''

तलाव मजबूत करण्यासाठी, दगड फोडण्याचे काम चालू होते. तेव्हा तेथे एक संन्यासी आला. भगवी कफनी घातलेला, वर जटा बांधलेली, छातीवर दाढी पसरलेली, तेजस्वी डोळे. तो संन्यासी तलावाच्या काठावर उभे राहून लोकांना तुमचा मोठा 'वड्डु' कोठे आहे असे विचारले. (वड्डु दगड फोडणारा) तेथे असलेले 'वड्डरु' कामगार त्या जोग्याकडे रागाने पाहून परत आपल्या कामात गुंतले, तरी तो संन्यासी त्यांना चिडविण्यासाठी सारखे वड्डु वड्डु म्हणून सिद्धरामांची चौकशी करू लागला) गुरूंची निंदा कामगारांना ऐकवेना म्हणून ते हातातील दगड त्या जोग्याकडे फेकू लागले पण... पण एकही दगड त्या जोग्याला लागेना म्हणून सर्वांना आश्चर्य वाटले. काहीजण गुरू सिद्धरामांकडे गेले. त्या कामगाराकडून, झालेली हकिकत सिद्धरामांना कळली. सिद्धरामांचे शिष्य राग आणि अपमानामुळे कापत होते. त्या जोग्याला धडा शिकविण्याची विनंती ते गुरुकडे करु लागले. मग त्यांची भक्ती बघून त्यांचे मन कळवळले.[४१]

मागे एकदा असाच एक कुटिल खर्पर जोगी आलेला, आणि अपमानित होऊन जीव वाचविण्यासाठी पळून गेलेला सिद्धरामांना आठवला. मग शिष्यांची वेदना न पाहवल्यामुळे त्यांच्या अंतरातील अग्निशक्ती जागली. डोळे विस्फारले आणि तेजोमय असलेले डोळे लाल झाले. सिद्धरामही तलावाच्या काठी आले. अनेक दगड त्या जोग्याच्या सभोवती पडले होते. पण एकही त्याला लागला नव्हता. सिद्धरामही तेथे गेले आणि जोग्याच्या नजरेला नजर मिळाली, तेव्हा त्यांच्या बालपणात शेतात गेल्यावर भेटलेल्या मल्लय्याला भेटल्यासारखे वाटले. अगदी जवळ गेल्यावर आपले अग्नी किरण त्या जोग्याच्या अंगी शिरले, तरी कोणतेही परिणाम होत नसल्याचे पाहून सिद्धराम चकित झाले. त्याने आपल्या अंगठ्याने अग्नी घासून विझविलेला पाहिला तेव्हा सिद्धरामाला जाणीव झाली की, आलेला जोगी सामान्य नव्हे. त्यांचे वर्णन तसेच कपाळावरील भस्म धारण, इष्टलिंग, रुद्राक्षांच्या माळा, दोन्ही

मनगटावर रुद्राक्ष कंकण, एक हाती कमंडलू दुसऱ्या हाती योगदंड, हे सर्व पाहून समोर असलेले महातेजोमूर्ती अल्लमप्रभुदेव असल्याचे सिद्धरामांनी जाणले. तेव्हा सिद्धराम नतमस्तक झाले. तेव्हा अल्लमप्रभू म्हणाले,'आता कळले ना सिद्धरामय्या।' (सिद्धरामानी कठोर अष्टांग योगसाधना केल्यामुळे त्यांना अणिमा, लघिमा, गरिमा आदी अष्टसिद्धी प्राप्त झाल्या होत्या. योगातील अत्युच्च स्थिती, अवस्था प्राप्त झाल्यामुळे त्यांना 'तृतीय नेत्र' सिद्धी प्राप्त झाल्याविषयी त्यांची वचनेच प्रमाण आहेत.)

"सर्वांना दोन डोळे असलेले जग जाणतो
मला तीन डोळे असलेले जग जाणतो" (सि.व.सं.नं. १३६२)[१०]

नंतर सिद्धरामांनी प्रभूंची क्षमा मागितली. अल्लमासह सिद्धराम आपल्या मठाकडे निघाले. कल्लय्या आणि बोमण्णा हा अद्भुत प्रसंग पाहून प्रभुदेवांच्या चरणी नतमस्तक झाले. सर्वजण तलावाच्या मध्यभागी असलेल्या मठात आले आणि सिद्धरामांनी प्रभूदेवाची पादपूजा केली. हे त्यांनी आपल्या वचनातून (सिद्धराम वचन संपुट नंबर १०४० मध्ये) सांगितलेले आहे. सिद्धरामाविषयी भक्तांच्या आणि शिष्याठायी सिद्धरामांची असलेली भक्ती, श्रद्धा जाणून प्रभूदेवांना आश्चर्य झाले. प्रभूदेवांनी सिद्धरामांना आलिंगन दिले. सिद्धरामांची अनेक वचनेही प्रभूदेवांनी वाचली. सिद्धरामांनी रचना केलेली वचने ऐकून प्रभू संतुष्ट झाले. 'सिद्धरामय्या बसवादी शरणाप्रमाणे वचनरचना करण्यास केव्हापासून सुरुवात केलीस ? ' असे संभाषण सिद्धराम आणि प्रभूदेवांमध्ये झाले.

सिद्धराम प्रभुदेवासह क्षेत्र-प्रदक्षिणेसाठी निघाले. क्षेत्राच्या सभोवती स्थापन केलेली अडुसष्ट लिंगे, आठही दिशेला असलेली गणपतीची मंदिरे, विशाल तलाव, समोरच मल्लिकार्जुनाचे भव्य देवालय, दासोहं मंदिर इत्यादी आपण केलेल्या लोककल्याण कार्याचे विवरण सिद्धराम अभिमानाने सांगत होते. सिद्धराम बोलत होते. पण प्रभुदेवांनी, ते करीत असलेल्या कार्याबद्दल एकदाही एकही शब्दाने आपली प्रतिक्रिया व्यक्तवीली नव्हती. सिद्धरामांनी शेवटी न राहून विचारले, "देवा। मी आजपर्यंत करीत असलेले लोककल्याणकार्य आपल्याला आवडले नाही का? याविषयी आपण एका शब्दानेही बोलत नाहीत?" तेव्हा सिद्धरामांच्या विनंतीवरून "सिद्धरामय्या। तुझी साकाराठायी निष्ठा, सर्वभूती सर्व जीवात्म्यावरील अनुकंपा हा भाव विश्वविशाल असा आहे हे मला भावले, याला कुणीही नकार देणार नाही. पण यालाही एक परिमिती असावी. व्यक्ती कितीही समर्थ असला तरी, त्याच्यांकडून लोकोपकारक कार्य किती दिवस चालणार ? तो देहधारी असे पर्यंत त्याच्याकडून परोपकार होईल पण पुढे? त्याने देह सोडल्यानंतर लोकांची काय गत होईल? तो नसला तर लोकांतील लीला स्थगित होते काय? या दृष्टिकोनातून विचार करावा सिद्धरामा। तुझी साकार पूजा, भूतदया, भावनेच्या ओघात स्वरूपज्ञान विसरलास का? त्यांनी या वचनातून -

"अन्न देऊन, गोड बोलून, पाणपोई ठेवून
तलाव बांधल्यास, मरणानंतर वर स्वर्ग मिळेल
पण शिवाचे, परमात्म्याचे सत्यदर्शन घडणार नाही
गुहेश्वरास जाणलेल्या शरणाला कोणतीही फलपदवी नाही."

(प्रभूदेव वचन संपुट नं. ७६८)

असे सांगितले. "कर्मयोगाच्या आवेगात अंतिम ध्येय असलेले स्वस्वरूप ज्ञानास विसरू नये. हा कर्मयोग आत्मज्ञानास साधन आहे. पण ती परमसिद्धी नव्हे सिद्धेश। तलाव बांधल्यास कालांतराने नाश होणार. तर आपल्या देहातच स्थिर असलेले तलाव बांधून त्यात परमानंदाचे जल भरावे" स्वतः बांधलेल्या तलावाचे वर्णन प्रभुदेवांनी (प्रभुदेव वचन संपुट नं. १२३६) मध्ये केले आहे.[११]

आपल्या कार्याची चर्चा चालू असताना परमात्मा हा सर्वांठायी वसलेला आहे या भावनेने लिंग प्रतिष्ठापना केली. अज्ञानीजनांना धर्ममार्गावर आणण्यास देवालय बांधले. लोकांना चकित करण्यासाठी नव्हे. त्यानंतर प्रभूंनी सिद्धरामांच्या मनातील संशय दूर करण्याचा प्रयत्न केला तरी संशय मिटला नव्हता. योगी असला तरी काय, त्याचे शरीर विनाकारण झिजू नये. कायक, शरीर श्रम हे अवश्य हवेच. योगी असला तरी एकांतात राहून सदैव योगसाधनेतच गुंतणे सिद्धेशांना मान्य नव्हते. सामान्य जनतेत राहून कार्य करींत लोकांना सन्मार्गावर चालवीत त्यांचा उद्धार करणे हे योग्याचे कर्तव्य आहे, अशी भूमिका होती. प्रभू म्हणाले, "दानधर्म केल्यास देव परमात्मा इहलोकी सुख संपत्ती देतो, पण मुक्ती लाभणार नाही हे स्पष्टपणे जाणून घ्यावे सिद्धरामय्या।" सिद्धरामांनी विचारले,' कर्म कोणते अन् अकर्म कोणते? श्वासोच्छ्वास करणेही कर्म नव्हे का? आपण धारण केलेल्या इष्टलिंगाची पूजा, हे कर्म नव्हे का? स्थावरलिंगाची पूजा हे कर्म झाल्यास इष्टलिंगाची पूजा हे अकर्म का?" जशी योगसाधना मुख्य आहे तसेच शरीरश्रम, नित्यकायकही प्रमुखच आहे अशी भावना होती सिद्धरामाची। उक्ती आणि कृती एकरूप झालेले जीवन होते सिद्धरामांचे। साकार निष्ठेकडेच त्यांची ओढ होती. मनातील शंका, संदेह नाहीसे झाले नव्हते. याला प्रभुंचे उत्तर मनोज्ञ असेच होते. 'साकार धरावे, लिंगच आपण होऊ शकणार नाही', असे प्रभुदेवांचे बोलणे ऐकून ,'आपण बांधलेले देऊळ, प्रतिष्ठापना केलेले लिंग सोडण्याचे कारण काय? ' तेव्हा हा प्रश्न ऐकून अल्लमांनी जाणले की, 'स्थावर लिंग आणि इष्टलिंग हे एकच असल्याचा' सिद्धरामाचा समज आहे. म्हणून सिद्धरामांच्या मनातील संशय, भ्रम दूर करण्यास प्रभुदेवांचे वचन (प्रभुदेव वचन सं. नं. ९४८) यात स्पष्ट होते.[१२]

विचारात व्याकुळता नसून, मन, भाव, ज्ञान डोळ्यात अणून अंतरंग-बहिरंग न जाणता अनिमिष शरण (अनिमिष म्हणजे डोळ्याची उघडझाप न करता, अर्धोन्मीलित दृष्टीने इष्टलिंगाकडे एक टक पाहणे)

असे ऐकता इष्टलिंगा बद्दल अधिक विवरण ऐकावे अशी प्रबल सिध्दरामांना इच्छा झाली. त्यांनी (सिद्धरामवचन संपुट नं. १०७०)[५३] या वचनातून त्यांना इष्टलिंगाबद्दल विवरण सांगण्यास विनंती केली. सिद्धराम म्हणाले, ''तुमचे विद्वत्तापूर्ण बोल ऐकून माझ्यातील अज्ञानाचे आवरण विरून गेले. संशयाचा भ्रम दूर झाला. मी धन्य झालो. करस्थलावरील इष्टलिंगात मन एकरूप, समरस होण्याच्या या तुमच्या तत्वास मी स्वाधीन झालो, मी शरण आलो. जीव शिवात लीन होण्याचे तत्व मज सांगून रक्षण करावे। साकारास धरून निराकाराकडे जाण्याचा मार्ग कृपा करून मज दाखवावा प्रभु।'' सिद्धरामांचे तन, मन, हृदय भरून आल्याने एक एक शब्द त्यांच्या सावकाशपणे मूखातून येत होते.

बालपणी श्रीशैलमध्ये घडलेल्या दर्शनाने झालेल्या प्रभावापेक्षा अल्लम प्रभुदेवांच्या दर्शनाने, चिंतन-मंथनाने सिद्धराम अधिक प्रभावित झाले होते. सिद्धरामांच्या मनाची उत्सुकता, तीव्रता जाणून प्रभुंनी विचारले,'सिद्धरामय्या। आपण बसवण्णांच्या कल्याणला जाऊ या का ?' प्रभुंच्या मुखातून कल्याण आणि बसवण्णा ऐकून सिद्धरामाच्या अंतरात हर्षाचा, आनंदाचा झरा उफाळून आला. अनेक लिंगांची स्थापना, त्यांचा उद्देश यामागील कथा असे अनेक प्रकार आपण यात पाहिले. तसेच अनेक चमत्कारही सिद्धरामांनी केले असे पाहिले. त्यामागील काही कथा अशा प्रकारे आहेत.

१) सिद्धराम मठासमोर बसले असता एक बिल्लेश बोम्मय्या नावाचा माणूस दोन-तीन वर्षे झाले सोन्नलगीत राहतो अशी माहिती त्यांना मिळाली. काही लोक त्याला शोधत तिथे येऊन पोहचले बोमय्या सिद्धराम जवळ काम करीत होता. तो त्या लोकांचे पैसे बुडवून आला होता असे लोकांचे म्हणणे होते. सिद्धरामांनी त्याला आपल्या कष्टातून थोडे थोडे पैसे जमा करून देणाऱ्यांचे पैसे परत द्यावयास सांगितले. दुसऱ्याचे पैसे बुडविणे चांगले नव्हे तेव्हा बिल्लेश पैसे घेतल्याचे नाकारू लागला. तेव्हा न्यायनिवाडा करण्यास बिल्लेशाला लोक चावडीकडे नेऊ लागले. रस्त्यात गेल्यावर सर्वांना चुकवून बिल्लेशाने जवळच असलेल्या योगलिंगाच्या देवळात जाऊन आपल्याजवळील चाकू पोटात खुपसून जीव दिला.[५४]

२) **खर्परजोगी :** सिद्धरामांचा कीर्तीपरिमल चारी दिशांना घुमत होता. त्यांची योगी-अवस्था, योगी कुलचक्रवर्तीच्या दर्जाची होती. त्यांची आकाशव्याप्त दृष्टी सर्व काही जाणू शकत होती. अष्टमहासिद्धी सिद्धरामांना साध्य झाल्या. पण पतिव्रतेचे सद्गुण जारिणीला ऐकवत नाहीत. पुण्यमयी साधूचा आचार पाहून पातकी कष्टी होत असतो, असा काहीसा खेद जोगी खर्परांच्या पोटी सामावला. जोगी खर्पर हे कुटील विद्येचे सागर होते. सिद्धरामांची सिद्धी मातीत मिळविण्यासाठी पाणउतारा करण्यासाठी सोलापूरी आले. इकडे सिद्धरामेश्वर भूतांची करुणा

पोटी घेऊन कार्य करित होते. त्यांना मुक्तीचा लोभ नव्हता. एवढ्यात त्या यज्ञदेवाचा नाश करण्यासाठी खर्पर जोगी सिद्ध झाले. त्यांनी अक्षता हाती घेऊन त्या मंत्रून यज्ञकुंडीत टाकल्या तो तात्काळ पर्जन्य वर्षू लागला. अग्नी शीतल झाला. यज्ञशाळा जळाने भरून गेली. यज्ञसामुग्रीही जळाच्या प्रवाहाबरोबर वाहून गेली. सिद्धरामांच्या पूजेत विघ्न आल्याने तो शांतिबाह्य महापुरुष अशांत बनला. कारण सिद्धांना पूजेतील विक्षेप हे मरणच वाटते. शंकराने तृतीय नेत्र उघडावे. त्रिपुरास दग्ध करावे तसेच येथे घडले. खर्परादी जोगी निमिषार्धात होमाग्नीने दग्ध झाले.'[५५]

३) **पंचलोह गोळ्याचा चमत्कार :** सिद्धगुरुंच्या आज्ञेवरून तलावाच्या काठावर एक कट्टा बांधण्यात आला. (हा कट्टा आजही तलावाच्या काठावर असून त्याला सम्मती कट्टा असे म्हणतात.) येत्या सोमवारी गुरुदेव अलौकिक चमत्कार करून दाखविणार असल्याची बातमी चोहीकडे पसरली. हे पाहण्यास मोठ्या संख्येने लोक जमा झाले. सिद्धरामांनी आपल्या दुपारच्या पूजेसाठी देवालयाच्या गाभाऱ्यात जाऊन दार लावून घेतले आणि दोन तास उलटले तरी दार उघडले नाही. बाहेर उभे असलेले कल्लय्या, बोम्मण्णा व इतर भक्त गुरुंची प्रतीक्षा करीत होते. काही वेळाने ते बाहेर आले. त्यावेळी दैवी तेजाने त्यांचे मुख प्रकाशित झाले होते. लोक आश्चर्याने पाहत होते. ते हळूहळू कट्ट्यावर चढले. त्यापूर्वीच एक पंचलोहयुक्त गोळा विस्तवात चांगला तापविण्यात आला होता. तो लालबुंद झाला होता. नंतर सिद्धरामांनी तो तापविलेला गोळा आपल्या हातावर ठेवण्यास लोहाराला सांगितले. सर्वजण आश्चर्याने बघू लागले. तेव्हा थरथरत्या हातांनी लोहाराने सिद्धरामाच्या आज्ञेनुसार तो लालबुंद झालेला गोळा सिद्धरामांच्या हातावर ठेवला. लोक श्वास रोखून हा प्रकार पाहत होते.

आपल्या हाती विस्तवासारखा वाटणारा पंचलोहाचा गोळा धरून सिद्धराम म्हणाले, 'निष्ठायुक्त भक्तांना हे सोन्नलगी अभिनव श्रीशैल सुक्षेत्र। हा तलाव सर्व तीर्थसमान श्रीगंगा इथेच। मल्लिकार्जुनांचा निरंतर वास आहे। असे हात उचलून सर्वांच्या साक्षीने सांगतो, मी बोललेले खोटे असल्यास माझे हात जळावे. आता तरी माझ्यावर विश्वास ठेवा.' कपिलसिद्ध मल्लिकार्जुना साक्षीने 'इदं इदं सत्यं सत्यं' अशी पाच वेळा घोषणा दिली. हे अलौकिक अत्यद्भुत दृश्य उभे असलेले लोक स्वत:लाच विसरून पाहत होते आणि मग सिद्धरामांचा जयजयकार गगनाला भिडला. शिष्याच्या कळवळून केलेल्या विनंतीवरून त्यांनी तो गोळा खाली फेकला. तो जमिनीवर पडला तेव्हा जमिनीवरील गवत त्यामुळे जळू लागले.'[५६]

# अनुभव मंटप

'कल्याणमध्ये बसवेश्वरांनी समानतेच्या पायावर नित्यनूतन अशा समाजरचनेचे कार्य हाती घेतलेले आहे. ते समाजाच्या सर्वच क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन घडवीत आहेत. जात, पात, मत, पंथ, धर्म, वर्ण, अधिकार, लिंग, वय यांकडे लक्ष न देता. कुणाचेही मन देवासाठी कातर व्हावे. आचारविचार शुद्ध, स्वच्छ आहेत. बसवण्णा स्वत: प्रधानमंत्री असूनही त्यांच्याकडे अहंभाव नाही. इष्टलिंग दाता, भक्ती भांडारी बसवण्णा इष्टलिंग धारण केलेले सर्वच ''संगमनाथा'' असा श्रेष्ठ भाव त्यांच्या ठायी आहे. बसवण्णांनी स्थापन केलेल्या अनुभव मंटपात पुरुषांसोबत स्त्रियांनाही समान स्थान दिलेले आहे. सर्वजण त्यागी, क्रियाशील, स्वानुभव सिद्ध असून बोलल्याप्रमाणे वागणारे कायकातच कैलास जाणणारे आहेत. सर्व शरण एकत्रित येऊन चिंतन-मंथन करून षटस्थलांचा सुलभ मार्ग दाखवतात.' असा उपदेश प्रभूंनी सिद्धरामांना केला. तेव्हा सिद्धरामांनी कल्याण आणि बसवण्णा यांना भेटण्याचा आग्रह आपल्या वचनातून करतात.

'' देवा। तुमची करस्थलाची श्रेष्ठता तुमच्यात राहू दे;
करस्थल नको, परस्थलही नको कोणतेही नको आहे.
कपिलसिद्धमल्लिकार्जुना तव कृपेने; संगम बसवण्णांचे—
श्रीचरण दावितां या गोष्टीला मी तुमच्या स्वाधीन झालो,
बसवण्णा, कल्याण, दाखवून मज वाचवावे माझ्या देवाच्या देवा।''

आणि अभिनव श्रीशैल बनलेल्या सोन्नलगी क्षेत्रातील सर्व जबाबदारी आपला शिष्य हाविनहाळ कल्लय्याकडे सोपवून सिद्धराम अल्लमप्रभूदेवासह कल्याणच्या प्रवासाला निघाले. तसेच चर्चेमध्ये शेवटी स्थावर लिंगपूजा यापेक्षा इष्टलिंगाची पूजा करावी याबाबत सांगत असताना अल्लमप्रभू व सिद्धराम यांच्यामधला खूप मोठा संवाद 'शून्य संपादने' या नावाच्या कन्नड महाकाव्याच्या तृतीय उपदेशात ग्रंथित झाला असून तो बोधपर तसाच मनोवेधक आहे. या परिसंवादाच्या अखेरीस सिद्धराम प्रभूदेवाना शरण जातात आणि लिंगांग सामरस्याचे ज्ञान मिळवून द्यावे असे त्यांना विनवतात. तेव्हा अल्लमप्रभू कल्याण (आजचे बसवकल्याण) च्या अनुभव मंटपाच्या व्यापक ध्येयवादाची, शिवतत्वांची जाणीव करून द्यावी व मंटपाच्या सदस्यांचा म्हणजे शिवशरणांचा सत्संग लाभावा म्हणून प्रभूदेव सिद्धरामांना कल्याणला घेऊन जाण्यास तयार होतात.[४७] या अनुभव मंटपात स्त्रीचे स्थान पुरुषाच्या बरोबरचे होते. पण त्या वेळेच्या काळात हे अगदी अवघड काम होते. कारण तेव्हा स्त्रीला समाजात अगदी दुय्यम स्थान होते किंवा तिला केवळ भोगवस्तू समजले जाई.

सिद्धरामाच्या प्रारंभिक जीवनामध्ये कल्पिलेल्या मल्लिकार्जुन साक्षात्काराने सिद्धरामांवर झालेल्या प्रभावापेक्षही न संपणारे व्यापक प्रभाव अल्लमप्रभूंच्या दर्शनाने झाले.[५८] या प्रभावांचे वर्णन राघवांकानी सिद्धराम चरित्रामध्ये केले आहे. तसेच हरिहरांनीही आपल्या लेखनाद्वारे वर्णिलेले आहे. हे विषय 'शून्य संपादने' व 'प्रभुलिंगलिले' या संकलनामध्ये स्पष्टपणे असल्याचे आढळून येते.[५९] अल्लमप्रभूंच्या बोधामुळे सिद्धरामाच्या जीवनामध्ये अमूलाग्र व महत्वाचे बदल घडून आले हे आपण वर पाहिले आहे. कल्याणला गेल्यानंतर तिथे चन्नबसवण्णांकडून सिद्धरामांना लिंगदीक्षा झाली ही घटना अति महत्वाची आहे.[६०] तथापि सिद्धरामांच्या लिंगदीक्षेबाबत दुमत आहे. एक म्हणजे सिद्धरामांनी चन्नबसवण्णांना दीक्षा दिली आणि दुसरी म्हणजे चन्नबसवण्णांनी सिद्धरामांना दीक्षा दिली. पण आजच्या दृष्टीने विचार करता कोणती गोष्ट मानावी व त्याला आधार काय? सिद्धरामांनी चन्नबसवण्णांना दीक्षा दिली ही गोष्ट अलीकडील पुस्तकांमध्ये वाचायला मिळते. ही गोष्ट कितपत खरी आहे, हा गोंधळात टाकण्यासारखा विषय आहे. पण चन्नबसण्णांकडून सिद्धरामांनी दीक्षा घेतली ही गोष्ट स्वत: सिद्धराम आपल्या 'वचने बसवस्तोत्र त्रिविधी' आणि 'मिश्रस्तोत्र त्रिविधी' मध्ये सांगितल्याप्रमाणे त्यांच्या जीवनामध्ये निश्चितपणे घडली असेल असे म्हणता येईल. याबाबतील हरिहर व राघवांकाने मात्र मौनव्रत पाळलेले आहे.[६१] जर चन्नबसवण्णांकडून सिद्धरामांना दीक्षा दिली गेली असेल असे मानले तर त्यांची वचने, बसवस्तोत्र त्रिविध आणि मिश्रस्तोत्र त्रिविधी त्यांनीच रचली यामध्ये वद निर्माण होऊ शकतो. याबाबत हरिहर व राघवांकांनी जरी मौन पाळले असले तरी त्यांनी रचलेल्या त्रिविधीवरून चन्नबसवण्णांनीच त्यांना दीक्षा दिली असेल हे स्पष्ट होते.

एवढेच नव्हे तर सिद्धराज कल्याणाला गेल्याबाबतचीही दोन मते आहेत. कांहींचे मत असे की, सिद्धराम सोन्नलगी सोडून कोठेच गेले नाहीत आणि काहींचे मत तत्वप्रसारासाठी ते सर्वत्र संचार करीत होते. दुसरे मत बरोबर वाटते, कारण आजपर्यंत सापडलेल्या शिलालेखांवरुन ते संचार करीत असे स्पष्ट होते आणि ते कल्याणला गेल्याचा विषय ते स्वत: एका वचनातून व्यक्त करतात-

''येले येले लिंगवे मानंदे बरलिल्ला कल्याणक्के
येले येले लिंगवे नानंदू बरलिल्ला मार्गक्के
येले येले लिंगवे नानंदू चन्नमल्लिकार्जुनागलिल्ला
लिंगवे, लिंगवे, कपिलसिद्ध मल्लिकार्जुन''[६२]

अशाप्रकारे कल्याणच्या आध्यात्मिक वातावरणामध्ये सिद्धराम शिवयोगींनी आपल्या जीवनाचे काही दिवस घालविले. कल्याणमधील त्यावेळच्या वीरशैवांदोलनाच्या बसवण्णा, चन्नबसवण्णा, अक्कामहादेवी या शरणशरणीचा उल्लेख त्यांनी आपल्या वचनांतून केलेला आहे.[६३] वीरशैवांदोलनाच्या

वेळी कल्याणमधील वातावरण थोड्या कालावधीतच गोंधळून गेले, त्यावेळेस प्रभु बसवादी शरण शरणी तेथून निघून गेले. कल्याणमधल्या शरणांना मार्गदर्शी म्हणजे चन्नबसवण्णा होते हे 'कालज्ञान वचने' आणि 'निरंजनवश रत्नाकर' या ग्रंथांमुळे समजून येते.[६४]

सिद्धराम आणि अल्लमप्रभू कल्याणला बसवण्णांच्या महामनेत पोहोचले. बसवण्णा पूजागृहात इष्टलिंग पूजेत मग्न होते. बाहेर चन्नबसवण्णा आणि आप्पण्णांनी 'गुहेश्वर ' हे शब्द ऐकून प्रभूंना ओळखले पण बसवण्णा स्वत: स्वागताला बाहेर आले नाहीत हे बघून अल्लमप्रभूंना खूप राग आला. त्यांचे हे वागणे पाहून सिद्धराम आश्चर्यचकित झाले. कारण सोन्नलगीपासून कल्याणला येईपर्यंत ते फक्त बसवण्णा आणि कल्याणविषयी बोलत होते. पण आता मात्र हे वागणे त्यांना समजले नव्हते. इतक्यात चन्नबसवण्णा आणि इतर शरणांनी प्रभूच्या रागाचे कारण बसवण्णांना जाऊन सांगितले. तेव्हा बसवण्णा इतर शरणांसह प्रभूदेवासमोर नतमस्तक झाले आणि त्यांना नमस्कार केला. बसवण्णांचा कांतिमान देह, तेज:पुंज नयन, पांढरेशुभ्र धोतर नेसलेले, फिकट भगव्या रंगाचे उपरणे, देहावर विभूतीचे लेपन. प्रत्यक्ष सात्विकताच रुप धारण करुन भूवर उतरल्याचा भाव सिद्धरामांच्या मनी दाटला. आपली ही चूक बसवण्णांनी(प्रभूदेव वचन संपुट नं. १३३९) मध्ये वर्णिलेली आहे. तेव्हा बसवण्णांनी जाणले की, अल्लमप्रभुंबरोबर असलेले हे सिद्धरामच आहेत. महामनेच्या अंगणात अनेक शरणशरणी हात जोडून दिव्य दैवी पुरुषांच्यामध्ये चाललेली चर्चा ऐकत होते. बसवण्णा आणि सिद्धराम यांची भेट प्रभुंमुळे कल्याणमध्ये झाली याचा अर्थ सिद्धराम हे बसव समकालीन शरणांपैकी एक होते. सिद्धराम हे अनुभव मंटपाचे तिसरे उत्तराधिकारी होते हे अनेक ग्रंथ व अनेक लेखनावरून समजून येते.

सर्वसमान या भावनेवर तसेच सदाचार, शुद्ध आचार-विचारावर आधारलेला कल्याण मधील अनुभव मंटप म्हणज जेथे अनुभवी स्त्री-पुरुष, जात-पंथ-गण इत्यादी वर्णादी भाव झुगारून एकत्रित येत धार्मिक, सामाजिक, नैतिक विषयावर विधायक वाद-विवाद करून निष्कर्ष काढीत, ते निष्कर्षच आजच्या वीरशैव धर्माचे सिद्धांत होत.[६५] अनुभव मंटपातील सर्व शिवशरण व शरणींचे 'कायकवे कैलास' आणि समताभाव हे तत्व होते. अनुभव मंटपातील शरणांचा सत्संग घडावा म्हणून प्रभुदेवांनी सिद्धरामांना आपल्याबरोबर आणले होते. [६६]

वीरशैव किंवा लिंगायत धर्म आपल्या भारतातच नव्हे कदाचित विश्वाच्या कोणत्याही धर्मात संप्रदायाची स्थापना व रचना ह्या अनुभव मंटपासारख्या उदार, महान व वैज्ञानिक दृष्टिकोनातून झाल्या नसतील. विश्वकल्याणाचा विचार या अनुभव मंटपाने केला. ज्ञान व नवयुगाची प्रस्थापना व्हायची तर प्रत्येकाच्या अंत:करणात नवा विचार, नव्या प्रेरणा व चैतन्याची ज्योत पेटली पाहिजे. इह आणि पर या दोहोच्या प्राप्तीसाठी सहजयोग साध्य केला पाहिजे. अशी शिवशरणांची निष्ठा होती. तेथे उच्चनीचतेस

थारा नव्हता. कार्य हे शिवपूजनांचे प्रतीकच आहे. 'कष्टाळू जीवन हाच कैलास' म्हणजे 'कायकवे कैलास' अशी त्यांची श्रद्धा होती. शिवशरणांनी क्रांतिकारक परिवर्तन घडूवन आणले. अन्यायाने द्रव्य संपादन करू नये, गरजेपेक्षा अधिक धन साठवू नये, असा दंडक त्यांनी पाळला. समताभाव, समभाव, सेवाभाव व साम्यभाव यांतूनच त्यांचे कार्य होत असे. या अनुभव मंटपात स्त्रियाही सहभागी होत. त्या म्हणजे अक्कमहादेवी, निलांबिका, गंगाबिका, अवकनागम्मा, सत्यक्का, रेमेव्वा, लक्कम्मा, महादेवी अम्मा, बोंतादेवी, वीरगुडव्वा, कमलव्वा, संगव्वा इ. अनेक सदस्या तेथे उपस्थित असत. या मंटपातील चर्चेत अनेक राज्यातून अनेक राजे आले होते. मोळ्गी मारय्या (काश्मीरचा राजा) पत्नी समवेत आले होते. काश्मीरची राजकुमारी बोंतादेवी, उड्डुतडीहून अक्कमहादेवी, कारवार जिल्ह्यातून बनवासीहून अल्लमप्रभुदेव, कलिंगदेशातून एकांतरामय्या, सोन्नलगीहून सिद्धरामेश्वर असे शरणांचे आगमन कल्याणमध्ये झाले होते. सगळीकडून प्रथमच सर्व शरणशरणींचे आपल्या इष्टलिंगपूजेत मग्न होते. हे बघून अनुभव मंटपाच्या नित्य चर्चेत भाग घेतल्याने व शरणांच्या सहवासाने सिद्धरामांच्या मनातील संदेह व संशय एकेक विरत गेले. त्यांनी विश्व विभूती बसवण्णांचे भाचे वयाने लहान असले तरी चिन्मय ज्ञानी असलेल्या चन्नबसवण्णांकडून इष्टलिंग दीक्षा घेतली. कर्मयोगी सिद्धराम आता 'शिवयोगी' बनले असे 'शून्य संपादने' या ग्रंथात नमूद केले आहे.[६७] गुरु चन्नबसवण्णा विषयी आदर सिद्धराम वचनातून व्यक्त करतात.

हे गुरु । परमानंद । हे गुरु परमज्ञान ।
हे गुरु निर्मल तत्वबीज तूंचि ।
परम सत्पथ वाढुनि गुरु चन्नबसवण्णा ।
गुरु तुंची मज तारी योगिनाथा ।। [६८]

वर सांगितल्याप्रमाणे सिद्धरामांच्या दीक्षेबद्दल दुमत होते किंवा आहे असे म्हणतात. पण वरील वचनातून चन्नबसवण्णा हेच माझे गुरू असे स्पष्ट मत व्यक्त केले असल्याने दोन मतांपैकी चन्नबसवण्णांकडूनच सिद्धरामानी दीक्षा घेतली असावी हे स्पष्ट होते. तसेच गौरवपर अनेक वचन संग्रहातून प्राप्त होऊ शकतात. बसव माझा-माता पिता, मित्र, सखा, बंधु इत्यादी आणि त्यांच्यावरील निस्सीम भक्ती आणि प्रेम व्यक्त झाले आहे. बसव स्तोत्र ही वेगळी त्रिविधी असून त्यात १२४ पदे आहेत. ते सर्व कन्नड भाषेत आहेत.[६९] योगी असले तरी सिद्धरामांनी केलेल्या शरीर श्रमाबद्दल, कायक निष्ठेबद्दल, सोन्नलगीस क्षेत्राचे महत्व आणल्याबद्दल, त्यांची साकारात निष्ठा, आणि सर्वांभूती अनुकंपा याविषयी बसवण्णा त्यांची प्रशंसा करीत होते. शरणशरणी सर्व विषयावर चर्चा करीत होते. त्यामध्ये महत्वाचे म्हणजे सिद्धरामांनी इष्टलिंग धारण न केल्याविषयीचे शब्द त्यांच्या कानावर पडत होते. या विषयावर

शंका व्यक्त होऊन शरीरावर लिंग असल्याशिवाय शिवपथ साधना पूर्ण होत नाही (चेन्नबसवण्णा वचन सं.नं.८०१) असे म्हटले गेले. तेव्हा सिद्धराम सांगतात, अंगत्रयावर लिंगत्रय साधना करावी याविषयी माझी मान्यता आहे पण मी स्थिती, अवस्था ओलांडून फार दूर लांब गेलो आहे, साक्षात मल्लिकार्जुनच मला दीक्षा देऊन ज्ञान, प्रज्ञेची खूण, चिन्ह माझ्या मस्तकावर ठेवली आहे. म्हणून मला बाह्य चिन्ह किंवा खूण नको आहे. देह असेल तर लिंग हवे. पण देहच नाही असे असल्यावर लिंग कशाला ? असे म्हणून सिद्धराम,'बसवण्णाच माझी काया आणि प्राण प्रभुदेव आहे, चन्नबसवण्णा' असे सांगतात. हे वचन (सिध्यराम वचन संपुट नं. ९४१) मध्ये आहे.

तेव्हा,'सिद्धरामाची अवस्था फार उच्च आहे हे सर्व शरणशरणींना मान्य आहे, सर्वजण त्यांच्यासमोर नतमस्तक आहेत. पण त्यांनाही लिंगाची गरज आहे. तेव्हा त्यांनी शिवपूजा करावी' असे बसवण्णा, इतर शरणांना वाटत होते. अल्लमप्रभू, चन्नबसवण्णा आणि शरणांनी अनेक वचने सांगून इष्टलिंगाचे महत्व सिद्धरामांना पटवून सांगितले. सर्वांचे मत ऐकल्यानंतर, शरीरावर इष्टलिंग असणे अत्यंत अगत्याचे आहे तेव्हा प्रभूंनी सिद्धरामांच्या मनातील शंका (प्रभुदेव वचन सं.नं. ९९९)[७०] आपल्या वचनातून दूर करतात.

कल्याणाला आल्यापासून सिद्धरामांनी इष्टलिंगाचा प्रभाव त्याचे महत्व पाहिले होते. पण स्वत: इष्टलिंग धारण केलेच पाहिजे, असा भाव मनी उमटला नव्हता. तेव्हा वरील चर्चेवरून त्यांचे मन बुद्धी, चित्त सर्वच उजळले. अहंकार नाहीसा झाला. आणि सर्वांचे म्हणणे त्यांनी मान्य केले. आणि चन्नबसवण्णांपूढे 'शरणु शरणार्थी' म्हणून त्यांनी हात जोडून मान झुकविली.

कल्याणमधील अनुभव मंटपात एकापेक्षा एक ज्ञानी आणि योगी होते. पण सिद्धराम तर 'योगीकुल चक्रवर्ती' होते. मग त्यांना दीक्षा कोण आणि केव्हा देणार हे निश्चित झाले. या कार्यासाठी चन्नबसवण्णांनाच निवडले गेले. कारण चन्नबसवण्णा हे आचरणात स्वानुभवी, प्रसादात परिणामी बौद्धिक साम्राज्याने निरंकुश चक्रवर्ती, प्रचंड प्रतिभाशाली, शिवाय लिंगायत धर्मातील षट्स्थल ब्राह्मी होत. बसवण्णांची क्रांतिकारी दीक्षा चळवळ चन्नबसवण्णापासून प्रारंभ झाली.

दीक्षेचा दिवस निश्चित झाला तसतसा सिद्धरामांची उत्सुकता वाढत गेली. आत्तापर्यंत इष्टलिंग न धारण केल्यामुळे त्यांनी आपल्या वचनातून आता 'मी' इष्टलिंग धारण करणार असा निर्धार केला,

''सर्व प्रथमगण लिंगधारण करीत असता,  
मी का नको म्हटले हे माझे कर्माचे बंधन,  
की मायेचे जाल ? अरे कपिलसिद्ध मल्लिनाथय्या  
मी लिंगधारणा करणारच'' [७१]

**इष्टलिंग दीक्षा-** ब्राह्मी मुहूर्तावर प्रभुदेव, अक्कनागम्मा, बसवण्णा, निलंबिका, गंगाबिका वगैरे सर्व शरणांच्या सान्निध्यात, सर्व शरणांच्या समक्ष चेन्नबसवण्णांच्या समोर बसले होते. सिद्धरामांच्या ब्रह्मरंध्रातील चिन्मय जागृत करुन, चित्काल चैतन्यभरित असलेल्या इष्टलिंगात सामावून स्थूल, सूक्ष्म, कारण शरीरावर इष्टलिंग, प्राणलिंग, भावलिंग हे त्रिविध लिंग एकवटून चन्नबसवण्णांनी सिद्धरामांच्या करस्थळी इष्टलिंग प्रदान करून, त्यांच्या शिरावर कर ठेवून (मंत्र, वेधा, क्रिया) त्रिविधा दीक्षा दिली. त्याचवेळी सिद्धरामांच्या अंतरी धन्यतेचा भाव बचनाद्वारे निघाला तो असा -

''शुद्, सिद्ध, प्रसिद्ध जाणलो चन्नबसवण्णा
तुमच्या कडून कपिलसिद्ध मल्लिनाथा
चेन्नबसण्णा माझे गुरु होऊन आल्याने
माझ्या जन्माची कर्म निवृत्ती केली'' (सिद्धराम वचन सं.नं. ९६९)[७२]

तेव्हा सोड्डुळ बाचरस म्हणतात, ''योगीयांचा योगी शिवयोगी, देवासाक्षी, सिद्धराम एकटाच खरा योगी'' सिद्धरामेश्वरांना शिवयोगाचे स्वरुप 'पद मंत्रगौप्य' या ग्रंथातून चन्नबसवण्णांनी विवेचन पूर्ण बोध दिल्याचे दिसून येते. त्यानंतर एकमेकांच्या वचनातून एकमेकांची स्तुती विषय चर्चा तेथे चाललेली होती. ही चर्चा शशिकलाताई मडकी यांच्या शिवयोगी सिद्धराम चरित्रामृत' मध्ये आढळते.

शरणांची कल्याणमध्ये चाललेली सामाजिक व धार्मिक क्रांती सोन्नलगीतही घडावी आणि ते दुसरे कल्याणच व्हावे अशी इच्छा असल्याचे सांगितले. म्हणजे सिद्धराम कल्याणला गेले. तेथे अनुभव मंटपात उपस्थित राहिले. एवढेच नाही तर चन्नबसवण्णांकडून त्यांना लिंगदीक्षा झाली, चन्नबसवण्णा गुरु होते हे खालील वचनातून स्पष्ट होते,

''प्रभुदेवांच्या कृपेने आलो इथे,
इष्टलिंगाचे मर्म जाणलो, गुरु बसवण्णांची दया
चेन्नबसवण्णांची कृपा याहूनही
अधिक जाणून धन्य झालो
कपिलसिद्ध मल्लिकार्जुन

**चामलाराणी – अण्णा बोमय्यांना दीक्षा** - सिद्धराम परत आल्याचे कळल्यावर चामलाराणी दर्शनार्थ आल्या होत्या. सिद्धरामांनी आपले स्वानुभव सांगितले. ते ऐकून आपणही इष्टलिंग दीक्षा घ्यावी. योगीराज सिद्धरामांना आपल्या गुरुदेवांचे (चन्नबसवण्णा) कितीही वर्णन केले तरी कमीच वाटत होते. हे वर्णन (सिद्धराम वचन संपुट नं १३५१) मध्ये आले आहे. चामलाराणीच्या अपेक्षेप्रमाणे सिद्धरामांनी त्यांना आणि अण्णा बोमय्या व इतर आप्त शिष्यांना लिंगदीक्षा दिली. तसेच सर्वांना दीक्षा देऊ नये.

अपेक्षिलेल्या सर्वांनाच दीक्षा देऊ नये. ज्यांचे जीवन सात्विक असून सत्य आणि शुध्द कायक करतात, बोलण्यात, वागण्यात शुध्द आहे अशानाच इष्टलिंग दिक्षा द्यावी. असे सांगितले जाते.

**बसवण्णांचे-चन्नबसवण्णांचे सोन्नलिगीत आगमन** – सिद्धराम सोन्नलगीत परत आल्यावर मोठ्या उत्साहात त्यांचे स्वागत झाले. नंतर बसव आणि इतर शरणही सोन्नलगीत आले तेव्हा त्यांचे स्वागत मोठ्या उत्साह व आनंदात सिद्धरामांनी केले. कदाचित आजचे जोडबसवण्णा चौक हे बसवण्णा व चन्नबसवण्णा सोन्नलापुरास आल्याचे द्योतकच आहे कारण त्या जागेवर आजही दोन नंदीची स्थापन केलेली दिसून येते. असे मानले जाते सर्व शरण परत जाताना सोन्नलगीत सर्व कार्य चन्नबसव सांगत होते. तेव्हा सिद्धराम म्हणाले,

''माझ्या भक्तीची, शक्ती बसवण्णांची,
माझ्या ज्ञानाची शक्ती चेन्नबसवण्णांची
योगाची सिद्धी सिद्धरामांची,
आपल्या सानिध्यात कपिल सिद्ध मल्लिकार्जुना ।''
(सिद्धराम वचन सं.नं. ९२१)[७३]

**कल्याण क्रांती आणि कर्णदेवाचा राज्याभिषेक** - अनेक शिलालेख सध्या अनेक जिल्ह्यांतून- विजापूर, धारवाड, तुमकूर, चित्रदूर्ग शिमोगा येथून मिळाले आहेत. अजूनही मिळण्याची शक्यता असल्याचे संशोधकाचे मत आहे. सिद्धराम सोलापूरास (सोन्नलगी) परत आल्यानंतर कल्याणमध्ये अनेक भयानक घटना घडल्या होत्या. महार हरळय्या व ब्राह्मण मधुवय्या (मधुवरस) या उभयतानी इष्टलिंग दीक्षा घेऊन लिंगायत धर्म स्वीकारला होता. हरळय्याचा पुत्र शीलवंत आणि मधुवरसाची कन्या कलावतीचे लग्न ठरले होते. बसवतत्व नुसते साहित्यातच राहू नये,कार्यरत करावे म्हणून अनुभव मंटपातील लोकांनी या लग्नास संमती दिली. हे पाहून जाती व्यवस्थेचा व वर्णाश्रमाचा फायदा घेऊन ऐषारामाचे जीवन भोगत असलेल्या उच्च वर्णीयांचे, कर्मठ लोकांचे पित्त खवळले. बसवांची दृष्टी कालातीत व क्रांतिकारक होती. याची जाणीव बिज्जळ राजाला होती. पण परंपरावादी, बसवतत्व विरोधी कर्मठ लोक खवळले या लग्नामुळे राज्यात बंडाळी माजली. एखादे वेळी राज्य सुद्धा उलटून टाकण्यास कमी करणार नाही म्हणून राजाला भीती घातली. म्हणून राजाने हे लग्न होऊ नये, म्हणून फर्मान काढले. पण अनुभव मंटपात घेतलेला निर्णय मागे घेण्यास कुणीही तयार नव्हते. विवाह पार पडला. तेव्हा विरोधक राजावर दबाव आणू लागले. या लोकांच्या चहाडीला बळी पडून, राजाच्या मनात नसताना हरळय्या व मधुवरसांना कठीण शिक्षा द्यावी असे फर्मान काढले.[७४] असे कारण सांगण्यात येते. कल्याणचा राजा बिज्जळाच्या वधानंतर शिवशरण नाना दिशांना पांगले. बसवण्णा कुडल संगमास जाऊन ऐक्य पावले.

बिज्जलाचा मुलगा रायमुरारी सोविदेव याचे सैन्य शिवशरणांच्या मागे लागले. गणाचार करीत शिवशरण, अक्कनागम्मा आणि चन्नबसवण्णासह वचनांचे गठ्ठे घेऊन उळवीस निबिड अरण्यात पोचले.[७५] बिज्जलाचा भाऊ कर्णदेवाने कल्याणची गादी बळकावली. संतप्त शिवशरणांना शांत करण्यासाठी राज्याभिषेकासाठी पौरोहित्य करण्यास शिवायोगी सिद्धराम यावे अशी योजना करून जडजवाहिरासह, पालखी घेऊन दूतांना सोन्नलगीस सिद्धरामांना घेऊन येण्यासाठी पाठविले.[७६] आपला राज्याभिषेक सिद्धरामांच्या हस्ते व्हावा अशी कर्णदेवांनी योजना केली. सिद्धरामांनी जडजवाहिराचा त्याग तर केलाच शिवाय कल्याणला येण्यास मल्लिकार्जुनाची आज्ञा नाही असे सांगितले.[७७] जेथे थोड्याच दिवसापूर्वी अन्यायी शासकाकडून शिवशरणांचा नरमेध घडला तेथे सिद्धरामेश्वर कसे जातील ? फारच आग्रहावरून ते पालखीत बसले.... आणि सैनिकांनी बाहेरून कुलूप घातले. पालखी (मेणा) कल्याणकडे चालली, तिथे गेल्यावर उघडून पाहतात तर काय, मेण्यात कोणीही नव्हते. तो रिकामा होता ही गोष्ट जरी खरी वाटत नसली तरी ते सत्य आहे असे सांगितले जाते. (जगप्रसिद्ध परमहंस योगानंदजी यांनी आपल्या ''योगी कथामृत'' या ग्रंथात अशा प्रकारचे प्रसंग घडल्याचे नमूद केलेले आहे.)[७८]

काही दिवसापूर्वी कल्याणमध्ये अराजकता माजली. शरणांचा वध होऊ लागला. वचने नष्ट करण्यात येऊ लागले. म्हणजे तेव्हा कल्याणमध्ये अराजकस्थिती निर्माण झाल्याने सर्व शरणशरणी कल्याण सोडून जाऊ लागले.[७९] अशा भयंकर घटना घडल्याचे कळताच सिद्धराम क्षणभरही न थांबता कल्याणला आले तेव्हा तेथील परिस्थिती फारच विकोपास गेली होती. (सध्या अनुभव मंटपाच्या जवळच सिद्धरामांची गुहा आहे. कल्याणला आल्यानंतर ते तिथेच साधना करीत असत. सिद्धरामांच्या नेतृत्वात शेवटची तातडीची बैठक तेथेचे घेण्यात आली, असे संशोधकाचे मत आहे.)[८०] अक्कनागम्मा, चन्नबसवण्णा, गंगाबिका, कल्याणम्मा, ढोर कक्कय्या, मडिवाळ माचिदेव आदी शरण यांच्या वचनसाहित्याचे रक्षण करण्यासाठी सोलापूर मार्गे कारवार जिल्ह्यातील घनदाट जंगलात असलेल्या उळवीला जाण्याचे ठरले. तेव्हा सिद्धरामांवर कल्याणमधील सर्व जबाबदारी टाकण्यात आली.[८१] काही महिन्यानंतर चन्नबसवण्णा, अक्का नागाई व इतर शरणांना भेटण्याकरता सिद्धराम उळवीला गेले. (उळवीच्या मार्गावर हल्याळ जवळील जोइडा तालुक्यात सिद्धरामांचे पुरातन देवालय आहे. तेथे सिद्धराम थांबून पुढे गेल्याचा पुरावा आहे. तेथील काही खेड्यात फक्त लिंगायताचीच वस्ती आहे. तेथे दुसऱ्या कोणत्याही धर्माचे लोक नाहीत. एका गावाचे तर लिंगदूर असेच नाव आहे. 'शरणधर्म' या मासिकाचे संपादक श्री देसाई स्वामी यांनी आपल्या मासिकात वरील घटना संशोधन करून प्रसिद्ध केली आहे.)[८२]

अशा रीतीने, कल्याण मधील अनेक शरण शरणी एका गावात जन्मले, दुसरे गाव त्यांचे कार्यक्षेत्र बनले तर त्यांनी समाधी तिसऱ्याच कोणत्यातरी गावाला घेतली. पण सिद्धराम मात्र सर्व कार्य उरकून आपली जन्मभूमी सोन्नलगीतच परत आले. कल्याण येथील क्रांतीनंतर बसवण्णा, निलांबिका, चेन्नबसवण्णा आदी शरण लिंगैक्य झाल्यानंतर सिद्धराम काही वर्षे बसवादी शरणाच्या आदेशाप्रमाणे सोन्नलगीस म्हणजेच सोलापुरास दुसरे कल्याण बनविण्यात व्यग्र झाले. श्रीशैल, कदलीवन, उभवीला न जाता सिद्धेश सोन्नलापुरातच राहिले.[८३] पुढे योगसमाधी घेईपर्यंत ते सोन्नलगीत आपले कार्य करीत राहिले आणि अखेर त्यांनी सोन्नलगीतच समाधी घेतली. बसवण्णा आणि निलम्मा यांनी समाधी घेताना सिद्धराम सोन्नलगीत होते असे स्पष्ट मत करता येईल. कारण बसवण्णांनी समाधी घेतल्या नंतर निलम्मा (निलोचन) कल्याणमध्ये स्वत:च्या करस्थलामधील लिंगामध्ये विलीन झाली हे वचनातून समजते.[८४]

कल्याणमधील धार्मिक, सामाजिक जीवनामध्ये शरण शरणीचे कार्य अति उच्चकोटीचे मानले जाते. राजकीय जीवनावरही त्यांचा प्रभाव पडला होता, यात शंकाच नाही. कल्याणमधील बिज्जळ राजाच्या वधानंतर त्याचा भाऊ कर्णदेव आणि मुलगा सोईदेव, यांच्यामध्ये राजपदासाठी तंटे चालू होते असे राघवांकाने सिद्धराम चरित्रामध्ये सांगितले आहे. ज्यावेळेस सिद्धराम कल्याणला कर्णदेवाच्या राज्याभिषेकासाठी जाण्यास नकार देतात, तेव्हा कर्णदेव मंत्री आणि सोडूळ बाचिरसांना सिद्धरामांना घेऊन येण्यास पाठवितात. पण हे प्रयत्न निष्फळ ठरले असा सिद्धराम चरित्रामध्ये उल्लेख आहे.[८५] म्हणजे कलचुरी कर्णदेवाने सिद्धरामांना आपला राज्याभिषेक करण्यासाठी त्याकाळी याचना केली हा एक ऐतिहासिक प्रसंग मानावा लागेल.[८६]

यावरुन यावेळी सिद्धरामांनी आपल्या जीवनाच्या जवळ जवळ उत्तरार्धात पदार्पण केले असेल असे वाटते.

# समाधी

कल्याण मधील अराजकानंतर सर्व शरणांची पांगापांग झाली. विविध ठिकाणी त्यांच्या समाध्या आहेत. कल्याण मधील घटनेनंतर अनेक वर्षे सिद्धरामांनी कार्य केले आणि इ.स.११८० मध्ये सिद्धरामांनी समाधी घेतली. सिद्धरामांच्या जन्माबद्दलच्या तारखेत भिन्न मते असतील परंतु त्यांनी समाधी घेतल्याचा इत्यादी सनामध्ये मात्र कुठेही वेगवेगळी मते असलेली आढळत नाही.

कल्याणक्रांती आणि शरणशरणींच्या लिंगांग सामरस्यानंतर काही वर्षातच सिद्धरामांनी कल्लय्या आणि आण्णा बोम्मय्याला एकांतात राहण्याची इच्छा व्यक्त केली. त्यावेळेस अण्णाबोमय्या यांनी विचारले असता सिद्धराम म्हणतात, 'कलियुग फार वाईट आहे, लोक देवदानवांपेक्षाही सामर्थ्यवान आहेत, म्हणून या गावात एकांतात राहावे असा माझा विचार आहे.' कदाचित ऐहिक जीवनाच्या गुणावगुणापासून दूर होऊन एकांतवासात राहावे असे त्यांना वाटले असेल. हा विषय राघवांकानी एका पद्यात स्पष्टपणे मांडला आहे.[७९] तेव्हा लागलीच एक योगनाथाची गुहा एकांत स्थळात तयार केली.[८०] राघवांकाचे हे पद्यातून असलेले लिखाण एम. बी. कोट्टरशेट्टी सरांनी 'सिद्धराम शिवयोगी' या पुस्तकात (पान ८५) वर्णिले आहे. कल्लय्या, अण्णा बोम्मय्या व इतर शिष्यांना समाधीची बातमी कळल्यानंतर खूप दु:ख झाले. सर्वांच्या डोळ्यात पाणी होते आणि सर्वाची स्थिती केविलवाणी झाली होती हे पाहून हळव्या हृदयाच्या सिद्धरामांचे मन कळवळले. ते आपल्या भक्तांना उद्देशून म्हणाले, ''मी जरी जड देहाने तुम्हाला दिसत नसलो तरी जेव्हा माझे भक्त स्मरण करतील, ध्यान करतील तेव्हा त्यांच्या पाठीशी मी सदैव राहीन. माझ्या गावात राहणाऱ्यांना, माझ्यावर श्रद्धा ठेवणाऱ्यांना काही कमी पडणार नाही'' असे त्यांनी अभय दिले आणि तलावातील योगनाथांच्या ठिकाणी म्हणजे (सिद्धरामेश्वर मंदिराच्या मागच्या बाजूस पश्चिमेस मठाच्या उजव्या बाजूस मोठ्या कट्ट्यावर जी दोन लिंगे आहेत, तेथेच श्रीच्या योगाभ्यासाचे स्थान होय.) अशा प्रकारे शिष्यांना नित्यनेमाने पूजा करण्यास, नैवेद्य दाखवण्यास अन्नछत्र चालवण्यास, गंगास्नान करण्यास सांगितले 'सदाचाराची ' शिकवण दिली मनुष्याने गर्व सोडावा, नेहमी समाधानी वृत्ती ठेवावी, नम्र असावे, परमेश्वरावर श्रद्धा ठेवावी. कोणत्याही अन्य क्षेत्रास जाऊ नये. याप्रमाणे जो वागेल तो मल्लिकार्जुनाची कृपा संपादन करील. अशा अनेक प्रकारे शिष्यांना शिकवण देऊन सिद्धराम भल्या पहाटे मंदिरापुढे आले. तेव्हा त्यांचे शेवटचे दर्शन घेण्यास, त्यांना डोळे भरून पाहावयास भक्तांची गर्दी झाली. सोमवारी सूर्योदयापूर्वी सिद्धराम हळूहळू पाऊल टाकत समाधी मंदिरासमोर आले आणि त्यावेळेसचे हे वचन -

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

'आकाशातील विजेप्रमाणे, योग्यातील क्रोधाप्रमाणे,'
वेश्येच्या प्रेमाप्रमाणे, गुरुमूर्तीच्या पादोदकाप्रमाणे
कपिलसिद्ध मल्लिकार्जुनांच्या लीलेप्रमाणे माझ्या प्राणाचे ऐक्य,
तद्‌वत शब्दमुग्ध असे शिवशिवा.'[९]

सिद्धरामांच्या मुखातून 'शिवशिवा' हे शब्द ऐकत असताना भक्तांचे आतडे पिळवटून निघत होते. हुंदके आवरत नव्हते. सगळे डोळ्यात प्राण आणून एकटक पाहत होते. पूजेची तयारी केलेली होती. जमलेले भक्तगण श्वास रोखून हे विलक्षण दृश्य टक लावून पाहत होते. समाधी मंदिरातील एक पायरी सिद्धराम उतरताच एका भक्ता ने राहवल्यामुळे दु:खी व सद्‌गदित आवाजात सिद्धरामांचा जयजयकार केला. नंतर सर्वांनी जयजयकार केला. सर्वांनी आपले दु:ख आवरत आपल्या गुरूला शेवटचा निरोप दिला.[१०] अशा प्रकारे समाधी गुहेत गेलेल्या सिद्धरामांनी पद्मासनात बसून आपल्या डाव्या हातावर इष्टलिंग ठेवून, अनिमिष दृष्टी रोवून शिवयोगाची अत्युच्च स्थिती म्हणजे 'लिंगांगसामरस्य' साधले. शिवयोग समाधी म्हणजे संजीवनी समाधी घेतली. ज्योती कर्पूराच्या संयोगाप्रमाणे आराध्यदेव कपिलसिद्ध मल्लिकार्जुनाच्यात ते विलीन झाले.[११] ज्योतीचा स्पर्श म्हणजे 'उरी उंड कर्पुरदंते' असे होय. ते लिंगांग सामरस्य साधून परंज्योती स्वरूप परमात्म्यात एकरूप झाले. सिद्धरामानी केलेल्या अनेक कार्याची साक्ष आजही सोलापूरात आहे. समाधी घेण्याचे कारण आणि समाधी स्थळाचे स्थूल वर्णन राघवांककृत 'सिद्धराम चरित्र' ह्यात आलेले आहे. असा उल्लेख संशोधन तरंगाच्या तळटिपात आहे. 'श्री सिद्धेश्वरपुराण कथासार' संत यशवंत व राजय्यास्वामी वाडी सोलापूर. १८८८ नंतर या ग्रंथाच्या ३-४ आवृत्या निघाल्या आहेत. कन्नड भाषेत डी. एल. नरसिंहायार्च (प्रका.-जयनगर,म्हैसूर राघवांकरचित सिद्धराम चरित्र-१९८४) व वेंकणय्या टी. एस. कर्नाटक संघ, १९४१ व राघवांक विरचित- 'सिद्धराम चरित्रे ' संपा. शामराव आर. एस. कर्नाटक साहित्य परिषद बेंगळूर-१९७७) इत्यादी पुस्तकात वर्णन केलेले आहे.[१२] पण त्यात समाधिस्थळाचा बिनचूक असा निर्देश त्यांनी केलेला नाही. फक्त ही जागा तलावाच्या मध्यभागी होते एवढेच सुचवितात. राघवांकाचे 'सिद्धराम चरित्र' सर्वात आधीचे आहे. त्यांनी प्रत्यक्ष सोन्नलगीस भेट दिली नसेल. नाहीतर निश्चित स्थळ त्यांना माहित झाले असते. हा ग्रंथ राघवांकांनी १३ व्या शतकात म्हणजे सिद्धराम समाधीकाळानंतर १००-१२५ वर्षांनी लिहिला आहे. ते सिद्धरामांच्या समकालीन नव्हते. असे यावरून कळते. याचा उल्लेख 'सिद्धरामचरित्र' संपा. डी. एल. नरसिंहाचार्यांनी राघवांक ह्या कवी बद्दल व त्यांच्या कालाबद्दल एकवाक्यता नाही असे सांगतात.

# समाधी स्थळ

सिद्धरामांनी संजीवन समाधी घेतली यात शंका नाही पण आताचे सिद्धरामेश्वराचे मंदिर त्या पाठीमागे असणारी 'योगसमाधी' या दोन्हीपैकी एके ठिकाणी सिद्धरामांनी समाधी घेतली असावी असे सर्वांना वाटते. भाविकांना तर ही दोन्ही स्थळे वंद्य आहेत, यात शंका नाही. सिद्धरामाचे जीवन, कार्य व त्यांचे उपास्य दैवत कपिलसिद्ध मल्लिकार्जुनाचे मंदिर आणि त्यांनी घेतलेली संजीवन समाधी या साऱ्या



**(सिद्धरामेश्वरांची समाधी)**

गोष्टींचा साकल्याने विचार व अभ्यास केल्यानंतर असा प्रश्न निर्माण होतो की, सिद्धरामांचे आता जे समाधी स्थळ म्हणून प्रसिद्ध आहे त्याच ठिकाणी त्यांनी समाधी घेतली असेल का? सिद्धरामाच्या साऱ्या कर्तृत्वामध्ये त्यांचे योगी असणे ही फार महत्वाची गोष्ट आहे हे ते स्वतःच आपल्या एका वचनात सांगतात. 'योगी असावा तर माझ्यासारखा असावा.' [१३] या बद्दलची माहिती आपण या अगोदरच पाहिली आहे. या योग्याच्या समाधीबद्दल थोडी चर्चा पाहू.

तसे पाहिल्यास सिद्धरामांचे चरित्र, थोड्या अधिक प्रमाणात इतिहास आणि संस्कृतीला धरून का नसेना, आबालवृद्धांना माहिती असतेच. ते सोलापूरचे तत्कालीन सोन्नलगीचे-श्रीशैल यात्रा केलेले मल्लिकार्जुनाचे एकनिष्ठ व निस्सीम भक्त. स्थानिक लोकात समाजकार्य केलेले. तलावाची निर्मिती. प्रभुदेवाबरोबर भेट व कल्याण गमन. अनुभव मंटपातील उपस्थिती. शिवशरण शरणी यांच्या गाठीभेटी. शून्यसिंहासनाचे तृतीयाचार्य. अव्वल दर्जाचे योगी व श्रेष्ठ दर्जाचे वाङ्मय निर्माते असे त्यांच्या चरित्राचे विविध पैलू आहेत. कल्याण क्रांतीनंतर समग्र शिवशरण मंडळीची त्रेधा उडून पांगापांग झाली. आणिबाणीची परिस्थिती पाहून ती निरनिराळ्या ठिकाणी समाधिस्थ होऊ लागले. कारण तत्कालीन राज्यकर्त्यात ह्या शिवशरणाविरुद्ध प्रचंड प्रमाणात क्षोभ निर्माण झाला. त्या खवळलेल्या राजासमोर त्यांच्या जीविताची शाश्वती नव्हती. शेवटी शिवशरण ही सुद्धा माणसेच होती ना! अशा ह्या क्रांतीमध्ये सत्ताधारी कलचुरी राजा बिज्जळदेवाचा भाऊ कर्णदेव [१४] यशस्वी होऊन त्याची बाजू बळकट झाली.

स्वतःच्या राज्याभिषेकासाठी सिद्धरामांना कल्याणला नेण्याचा त्याचा प्रयत्न असफल झाला या सर्वाची माहिती आपण वर पाहिलेली आहे. सिद्धराम सर्वश्रेष्ठ योगी होते याची ग्वाही त्यांच्या वचनातून प्रत्ययास येते. अक्कमहादेवी, प्रभुदेव, चन्नबसव, बसवादी शिवशरणांनीही त्यांची मुक्त कंठाने प्रशंसा केली आहे.[१५] म्हणून तर सिद्धराम हे ''योगीकुलचक्रवर्ती'' होते. त्यांच्या या योगकर्तृत्वावर व्हावा तेवढा विचार व अभ्यास झालेला नाही असे वाटते.

सिद्धरामांपूर्वी कर्नाटक किंवा महाराष्ट्रात जिवंत समाधी घेतल्याचे दाखले इतिहासात मिळत नाहीत. ज्ञानदेवांची समाधी ही सिद्धरामानंतर सुमारे सव्वाशे वर्षानंतरची आहे. ज्ञानदेव हे सुद्धा योगीच होते. त्यांनीही आपले जिवितकार्य संपल्यानंतर आपले जीवन जिवंत समाधीनेच संपविले आहे. त्यांच्या समाधीच्यावेळी बरीच मंडळी हजर होती. त्यांचे सांग्रवर्णन आपल्याला नामदेवांच्या समाधीच्या अभंगातून मिळते. तसेच राघवांकानुसार सिद्धरामसमाधीच्या वेळी सुद्धा काही मंडळी समक्ष होती. ती मंडळी वचनकार होती. परंतु अद्यापि कोणाचीही समाधी प्रसंग वर्णनपर रचना उपलब्ध झालेली नाही. नामदेवाच्या समाधी अभंगानुसार ज्ञानदेवांनी आळंदीस सिद्धेश्वर मंदिरासमोरची जागा निवडली व त्याच ठिकाणी समाधी घेतली. सोलापूरचे सिद्धराम व आळंदीचे सिद्धेश्वर (मंदिर) यांचा नामसादृश्याशिवाय काही संबंध नाही हे नमूद करावयास हवे. महाराष्ट्र, कर्नाटकात अशा अनेक सिद्धेश्वरांची मंदिरे आहेत. हे महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केलेल्या 'Fairs and Festivals in Maharashtra (1969)' या बृहद्ग्रंथांवरून दिसून येते.

ज्ञानदेव हे नाथपंथीय होते. म्हणजे स्थूल मानाने शैवच. म्हणून त्यांनी समाधीसाठी सिद्धेश्वराचे सान्निध्य निवडले. तसेच आळंदी - सिद्धरामेश्वराचा परिसर हे पुरातन योगपीठ होते, हे नामदेवाच्या अभंगावरून विदित होतेच. ज्ञानदेव व सिद्धराम या दोन महाव्यक्तींमधले साम्य म्हणजे ते दोघेही योगी, ब्रह्मचारी आणि वाङ्मय निर्माते होते. दोन्ही व्यक्ती योगविद्येमध्ये निपुण होत्या हे उघड आहे. ज्ञानदेव तर नाथपंथीच होते. नाथपंथ म्हणजे योगीयांचे माहेरघरच. दोघांमधील योग हा एक दुवा धरून आपणांस असा तर्क करता येण्यासारखा आहे की, योगी मंडळी समाधी घेताना शिव मंदिराचे सान्निध्य निवडीत असावेत. याचे एक अत्यंत महत्वाचे उदाहरण म्हणजे त्र्यंबकेश्वर क्षेत्र होय. त्र्यंबकेश्वरी त्र्यंबकेश्वरांच्या सान्निध्यात विपुल प्रमाणात योगी जणांच्या समाध्या आपणांस पाहावयास मिळतात.[१६] शिवाय ज्ञानदेवांचे बंधू व गुरू निवृत्ती नाथांनीही तेथेच समाधी घेतल्याचे सर्वांना माहिती आहे. तथापि योगीजनांचा असाच नियम होता असे कटाक्षाने म्हणता येत नाही. पण तसा एक संकेत असावा असे मानण्यास काही हरकत नसावी.

योगीजनांचा समाधी संकेत हा पुरावा जमेस धरता योगीनाथ सिद्धरामांनीसुद्धा एखाद्या शिवमंदिराच्या परिसरातच समाधी घेतली असण्याची शक्यता नाकारता येणार नाही. आणि असेच जर घडले असेल तर सिद्धरामांनी दुसरे तिसरे शिवमंदिर शोधण्यास जाण्याची गरज नव्हती. कारण स्वतःच निर्माण केलेले कपिलसिद्धमंदिराचे मंदिर उभेच होते. या मंदिर निर्मितीची कथा राघवांकृत चरित्रात आली आहेच. याच कपिलसिद्ध मल्लिकार्जुन मंदिराच्या सान्निध्यात-स्पष्ट सांगावयाचे झाल्यास ठीक या मंदिरा समोरच त्यांनी समाधी घेतली असावी आणि हेच तत्कालीन योगीजनांच्या परंपरेस धरून होते. म्हणून सिद्धरामांच्या समाधीची मूळ जागा या कपिलसिद्ध मल्लिकार्जुन मंदिराच्या परिसरातच आहे हे स्पष्ट होते.[१७] सांप्रत सिद्धरामकालीन प्राचीन मल्लिकार्जुन मंदिर सोलापूरच्या किल्ल्यात दयनीय अवस्थेत अवशेषरूपात उभे आहे. त्याची ही आत्ताची स्थिती दक्षिणेस मुसलमानांचा प्रवेश झाल्यानंतर म्हणजे इ.स. १३१८ नंतर झालेली असणार हे उघड आहे. सिद्धराम इ.स. ११८० साली समाधिस्थ झाले.[१८] म्हणजे सुमारे १३८ वर्षे मंदिर समाधीची व्यवस्था, देखभाल झाली असावी. त्यानंतर मुसलमानांची आक्रमणे झाली व त्यात हिंदूंची पूज्यस्थाने नष्टभ्रष्ट झाली. त्याच झपाट्यात वरील दोन्ही स्थानांचा विध्वंस झालेला असणार. शिवाय त्या मंदिराभोवती चक्क किल्ला बांधलेला आहे. आजही तो किल्ला सोलापूरात उभा आहे. त्यांच्या बांधकामात हिंदू मंदिरांच्या ताशिव शिळा, तुळई, स्तंभ मोठ्या प्रमाणात वापरलेले आहेत. तर मग असे म्हणावे लागेल की, सिद्धरामांच्या समाधीची मूळ जागा किल्ल्यातील कपिलसिद्ध मल्लिकार्जुन मंदिरा समोरच असावी. ही जागा सध्या किल्ल्यातील आतील तटाखाली गेलेली आहे. जागेच्या प्रत्यक्ष निरीक्षणानंतर हे सर्व स्पष्ट होते.

सिद्धरामांची समाधी वरील जागीच असण्याचा अनुषंगिक आणखी एक पुरावा श्री. आनंद कुंभार यांना पाच ते सहा वर्षापूर्वी किल्ल्यातच उपलब्ध झाला आहे. किल्ल्याच्या पश्चिमेकडील बाहेरील तटात (सोलापूरच्या या किल्ल्यास दोन तट आहेत) आतल्या बाजूस एक शिलालेख आहे. तो यादव कालीन नागरी लिपीत व मराठी भाषेत कोरला आहे. दुर्दैवाने त्यातील कालोल्लेख अपूर्ण आहे. तो खंडित झालेला आहे. परंतु त्यावरील अक्षरांवरून, वळणांवरुन तो निर्विवादपणे यादवकालीन आहे. त्यातील मजकुराप्रमाणे कोण्या सुलेकार रायवरी दामोदर पंड्तिांनी रामनाथास एक कोटी नमस्कार केलेले आहेत. त्यात आलेला रामनाथ म्हणजे सिद्धरामच होय. हे इतर समकालीन लेखांवरुन सिद्ध झालेले आहे.[१९] आनंद कुंभारांच्या मते ही लेखशिला सिद्धरामांच्या मूळ समाधी जवळचीच असण्याची शक्यता आहे. ती शिळा मोडतोडीच्या वेळी स्थानभ्रष्ट होऊन तटाच्या बांधकामात येऊन बसली आहे. सांप्रत समाधीस्थाने म्हणून ओळखली जातात ती मुसलमानी आक्रमाणानंतर निर्माण झाली असावीत. कारण परंपरे शिवाय

**अमुकच ठिकाणी समाधी आहे याचा बळकट पुरावा तूर्त तरी उपलब्ध नाही. शिवाय राघवांकांनी समाधी म्हणजे तलावाचे मध्यभाग एवढाच उल्लेख केला आहे.**

समाधी म्हणजे आत्ताच्या तलावाचे मध्यभाग; पण हा तलाव किती प्रमाणात विस्तारीत होती किंवा किती प्रमाणात लहान होता, कोणत्या काळात तिचा आकार किती होता हे सांगणे जरा कठीणच आहे. सध्या उपलब्ध असलेला तलावाचा मध्यभाग म्हणजे सिद्धरामांचे मंदिर व योग समाधी हे तात्पुरते खरे आहे असे वाटते. कारण त्यात आधुनिकीकरण झाले आहे. तेथे एकही प्राचीन अथवा मध्ययुगीन खुण शिल्लक नाही. तरी सध्याची परिस्थिती पाहता राघवांकांच्या सांगण्याप्रमाणे तवालाचा मध्यभाग म्हणजे सिद्धरामांची समाधी असे मानावे लागेल.

## तळटिपा

| | | |
|---|---|---|
| १) | कोट्टरशेट्टी एम. बी., | सिद्धराम शिवयोगी, कन्नड अध्ययन पीठ, कर्नाटक विश्वविद्यालय धारवाड; १९७५ (पृ.क्र. ७९) |
| २) | नरसिंहाचार्य डी. एल. | सिद्धराम चरित्रे संग्रह, जयनगर, म्हैसूर; १९८४ (पृ.क्र. २२) |
| ३) | श्री. सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटी | श्री सिद्धरामेश्वर माहात्म्य, श्री सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटी, सोलापूर ; २००४ (पृ. क्र. २७) |
| ४) | कित्ता, कोट्टरशेट्टी | सिद्धराम शिवयोगी (पृ. क्र. ७९) |
| ५) | कित्ता, | (पृ. क्र. ७९) |
| ६) | मडकी शशिकला रा. | शिवयोगी सिद्धराम चरित्रामृत, राजशेखर चंद्रशेखर मडकी, बसवसेंटर, राजकला मार्ग, मंगळवार पेठ, सोलापूर; २००१ (पृ. क्र. ४९) |
| ७) | कित्ता, | (पृ. क्र. ४२,४३) |
| ८) | कित्ता, | (पृ. क्र. ६७) |
| ९) | कित्ता, | (पृ. क्र. ४१) |
| १०) | कित्ता, श्री सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटी | श्री सिद्धरामेश्वर माहात्म्य (पृ. क्र. ८९,९०,९१) |
| ११) | कित्ता, | (पृ. क्र.४१,४२) |
| १२) | कित्ता, मडकी शशिकला रा. | शिवयोगी सिद्धराम चरित्रामृत, (पृ. क्र. ४३) |
| १३) | बेटगिरी शिवशंकर | प्रदक्षिणा ६८ लिंगांची, दै. लोकमत, सोलापूर; २९/१२/२००४ |
| १४) | कित्ता, श्री सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटी | श्री सिद्धरामेश्वर माहात्म्य (पृ. क्र. ४६,४७,४८ वरील पानावर या कथा सिद्धराम चरित्रे (राघवांककृत) पुसतकात आढळते.) |
| १५) | कित्ता, मडकी शशिकला रा. | सिद्धरामेश्वर वचनांजली,बसवमहामने चॅरिटेबल ट्रस्ट,२०३५ बसव मंटप, राजाजी नगर, बेंगळूरु;१९९३ (पृ. क्र. २६) |
| १६) | कित्ता, मडकी शशिकला रा. | शिवयोगी सिद्धराम चरित्रामृत, (पृ. क्र. ७०) |

| | | |
|---|---|---|
| १७) | कित्ता, बेटगिरी शिवशंकर | प्रदक्षिणा ६८ लिंगांची, ३०/१२/२००४ |
| १८) | कित्ता, बेटगिरी शिवशंकर | ३१/१२/२००४ |
| १९) | कित्ता, बेटगिरी शिवशंकर | १/१/२००५ |
| २०) | कित्तां, श्री सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटी | श्री सिद्धरामेश्वर माहात्म्य (पृ. क्र. ४५,४६,४७) |
| २१) | थावरे दा. का. | शिवयोगी सिद्धरामेश्वर, प्रसाद प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे १९९१, (पृ. क्र. ९४) |
| २२) | कित्ता,बेटगिरी शिवशंकर | २/१/२००५ |
| २३) | कित्ता, | ३/१/२००५ |
| २४) | कित्ता, | ४/१/२००५ |
| २५) | कित्ता , | ५/१/२००५ |
| २६) | कित्ता , | ६/१/२००५ |
| २७) | कित्ता , | ७/१/२००५ |
| २८) | कित्ता, मडकी शशिकला रा. | शिवयोगी सिद्धराम चरित्रामृत, (पृ. क्र. ४७,४८) |
| २९) | कित्ता, | (पृ. क्र. ४८) |
| ३०) | कित्ता,बेटगिरी शिवशंकर | ८/१/२००५ |
| ३१) | कित्ता, | ९/१/२००५ |
| ३२) | कित्ता, | १०/१/२००५ |
| ३३) | कित्ता, | ११/१/२००५ |
| ३४) | कित्ता, | १२/१/२००५ |
| ३५) | कित्ता, | १३/१/२००५ |
| ३६) | कित्ता, | १४/१/२००५ |
| ३७) | कित्ता, मडकी शशिकला | शिवयोगी सिद्धराम चरित्रामृत, (पृ.क्र. ६०) |
| ३८) | कित्ता, | (पृ. क्र. ६१) |
| ३९) | कित्ता, | (पृ. क्र. ६१) |

| | | |
|---|---|---|
| ४०) | स्वामी (विभूतीमठ) ईश्वरय्या विरय्या | सोलापूर श्री महाशिवयोगी सिद्धरामेश्वर सचित्र चरित्र १९९३ (पृ. क्र.६७) |
| ४१) | कित्ता, | (पृ. क्र.६६) |
| ४२) | कित्ता, | (पृ. क्र.६८) |
| ४३) | कित्ता, नरसिंहाचार्य डी. एल. | सिद्धराम चरित्रे संग्रह (पृ.क्र. २८) |
| ४४) | कित्ता, स्वामी (विभूतीमठ) ईश्वरय्या | सोलापूर श्री महाशिवयोगी सिद्धरामेश्वर (सचित्र चरित्र)(पृ.क्र.६७) |
| ४५) | कित्ता, कोट्टरशेट्टी एम. बी. | सिद्धराम शिवयोगी (पृ. क्र. ७८) |
| ४६) | कित्ता, मडकी शशिकला रा. | शिवयोगी सिद्धराम चरित्रामृत, (पृ. क्र. ४६) |
| ४७) | कित्ता, | (पृ. क्र. ४७) |
| ४८) | कित्ता, स्वामी (विभूतीमठ) ईश्वरय्या | सोलापूर श्री महाशिवयोगी सिद्धरामेश्वर (सचित्र चरित्र) (पृ.क्र.५७,५८,५९) |
| ४९) | कित्ता, मडकी शशिकला रा. | शिवयोगी सिद्धराम चरित्रामृत, (पृ. क्र. ६८,६९) |
| ५०) | कित्ता, | (पृ.क्र. ७१) |
| ५१) | कित्ता, | (पृ.क्र. ७५,७६) |
| ५२) | कित्ता, | (पृ.क्र. ८१,८२) |
| ५३) | कित्ता, | (पृ.क्र. ८२) |
| ५४) | कित्ता, नरसिंहाचार्य डी. एल. | सिद्धराम चरित्रे संग्रह (पृ.क्र. २६,२७) |
| ५५) | कित्ता, थावरे दा. का. | शिवयोगी सिद्धरामेश्वर, (पृ. क्र. ८०,८१) |
| ५६) | कित्ता, मडकी शशिकला रा. | शिवयोगी सिद्धराम चरित्रामृत, (पृ. क्र.५२) |
| ५७) | लिगाडे जयदेवीताई (चन्नप्पा उत्तुंगीरचीत) | सिद्धरामांची त्रिविधी, कन्नड कोटी प्रकाशन, सोलापूर, १९५८ (पृ. क्र. प्रस्तावनेतील ५) |

| | | |
|---|---|---|
| ५८) | कित्ता, कोट्टरशेट्टी एम. बी. | सिद्धराम शिवयोगी (पृ. क्र. ८२) |
| ५९) | कित्ता, | (पृ. क्र. ८३) |
| ६०) | कित्ता, | (पृ. क्र. ८३) |
| ६१) | कित्ता, | (पृ. क्र. ८३) |
| ६२) | कित्ता, | (पृ. क्र.८३) |
| ६३) | कित्ता, | (पृ. क्र. ८३) |
| ६४) | कित्ता, | (पृ. क्र. ८४) |
| ६५) | कित्ता, मडकी शशिकला | वचनसुधा, राजशेखर चं. मडकी, बसवसेंटर, सोलापूर; १९८२ (पृ. क्र, प्रस्तावनेत ८) |
| ६६) | कित्ता, मडकी शशिकला रा. | सिद्धरामेश्वर वचनांजली, (पृ. क्र. प्रस्तावनेत ८) |
| ६७) | कित्ता, | (पृ. क्र. प्रस्तावनेत ८) |
| ६८) | लिगाडे जयदेवीताई (चन्नप्पा उत्तुंगीरचीत) | सिद्धरामांची त्रिविधी, (पृ. क्र. ३२) |
| ६९) | कित्ता, | (पृ. क्र. प्रस्तावनेतील ९) |
| ७०) | कित्ता, मडकी | शिवयोगी सिद्धराम चरित्रामृत, (पृ. क्र. ९७) |
| ७१) | कित्ता, | (पृ.क्र. १०२) |
| ७२) | कित्ता, | (पृ.क्र. १०३) |
| ७३) | कित्ता, | (पृ.क्र. ११४,११५) |
| ७४) | कित्ता, | (पृ.क्र. ११७) |
| ७५) | कित्ता, कोट्टरशेट्टी एम. बी. | सिद्धराम शिवयोगी (पृ. क्र. ८४) |
| ७६) | कोठावळे कुमार | गीत सिद्धेश्वर, संपदा, पत्रकार नगर, सोलापूर;१९९१ (पृ.क्र. ३७) |
| ७७) | कित्ता, नरसिंहाचार्य डी. एल. | सिद्धराम चरित्रे संग्रह (पृ.क्र. २७,२८) |
| ७८) | कित्ता, मडकी | शिवयोगी सिद्धराम चरित्रामृत, (पृ. क्र. १२०) |
| ७९) | कित्ता, कोट्टरशेट्टी एम. बी. | सिद्धराम शिवयोगी (पृ. क्र. ८४) |
| ८०) | कित्ता, मडकी | शिवयोगी सिद्धराम चरित्रामृत, (पृ. क्र. ११८) |
| ८१) | कित्ता, कोट्टरशेट्टी एम. बी. | सिद्धराम शिवयोगी (पृ. क्र. ८४) |

| | | |
|---|---|---|
| ८२) | कित्ता, मडकी | शिवयोगी सिद्धराम चरित्रामृत, (पृ. क्र. ११९) |
| ८३) | कित्ता, | (पृ. क्र. १२०) |
| ८४) | कित्ता, कोट्टरशेट्टी एम. बी. | सिद्धराम शिवयोगी (पृ. क्र. ८४) |
| ८५) | कित्ता, | (पृ.क्र. ८४) |
| ८६) | कित्ता, | (पृ.क्र. ८५) |
| ८७) | कित्ता, | (पृ.क्र. ८५) |
| ८८) | कित्ता, श्री सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटी | श्री सिद्धरामेश्वर माहात्म्य (पृ. क्र. ८६) |
| ८९) | कित्ता, मडकी | शिवयोगी सिद्धराम चरित्रामृत, (पृ. क्र. १२१) |
| ९०) | कित्ता, | (पृ. क्र. १२२) |
| ९१) | कित्ता, मडकी शशिकला रा. | सिद्धरामेश्वर वचनांजली, (पृ. क्र. १४) |
| ९२) | कुंभार आनंद | संशोधन तरंग, प्रभाकर देसाई सोलपूर; १९८० (पृ. क्र. १७३) |
| ९३) | हिरेमठ आर. सी. | सिद्धरामेश्वर वचनगळु, कर्नाटक विश्वविद्यालय, धारवाड, १९६८; (वचन क्र. ८८०) |
| ९४) | Desai P.B | Basaveshvare and His Times, Kannada Research Institute, Dharwad;1968 (Page No. 21) च्यामते कर्णदेव नावाचा बिज्जळदेवाचा भाऊ आढळत नाही. परंतु त्याच नावाचा एक नातू त्यास होता व तो बिज्जड देवाच्या हयातीतीच म्हणजे ११६७ साली काही काळ कारभार पहात असावा. |
| ९५) | कित्ता, कुंभार आनंद | संशोधन तरंग (पृ. क्र. १७३) |
| ९६) | ढेरे रा. चि. | त्र्यंबक मठिका, नवभारत मासिक, वाई; नोव्हें १९७५, ज्ञानेश्वर विशेषांक. |
| ९७) | कित्ता, कुंभार आनंद | संशोधन तरंग (पृ. क्र. १७१) |
| ९८) | कित्ता, कोट्टरशेट्टी एम. बी. | सिद्धराम शिवयोगी (पृ. क्र. ६३ ते ६८) |
| ९९) | कित्ता, कुंभार आनंद | संशोधन तरंग (पृ. क्र. १७१) |